यांचे म्हणणे आहे. याशिवाय संयुक्त राष्ट्रे संघटनेने स्थानिक स्वशासन संस्थांना घटनात्मक दर्जा द्यावा असे जे आवाहन केले होते त्याचा प्रभाव हे देखील त्या मागचे एक कारण असू शकते.

अशाप्रकारे १९९० नंतरच्या काळातील मुक्त वा बाजारपेठीय आर्थिक धोरणाचा प्रभाव आणि स्थानिक स्वशासन संस्थांना घटनात्मक दर्जा देण्यासंबंधी संयुक्त राष्ट्रे संघटनेने मंजूर केलेल्या ठरावाचा प्रभाव या दोहोंच्या संमिश्र प्रभावामुळे ७३ आणि ७४ रावी घटनादुरुस्ती झालेली आहे असे म्हणता येईल.

## ७३ रावी घटनादुरुस्ती

भारतात २ ऑक्टोबर १९५९ रोजी पंचायतराजची सुरुवात झाली. राष्ट्रीय स्तरापासून ग्रामस्तरापर्यंत लोकशाही विकेंद्रीकरण करणे हा पंचायतराज योजनेचा प्रमुख उद्देश होता. पंचायतराज संस्थांमधील दोष दूर करून त्यांचा विकास करण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने अनेक समित्या स्थापन केल्या. यामध्ये प्रामुख्याने १२ डिसेंबर १९७७ ची अशोक मेहता समिती, २५ मार्च १९८५ ची जी.व्ही. के. राव समिती, १९८६ ची डॉ. एल. एम. सिंघवी समिती इत्यादींचा आवर्जून उल्लेख करता येईल. राजकीय, प्रशासकीय व आर्थिक दृष्टीकोनातून पंचायतराज संस्था मजबूत केल्याशिवाय ग्रामीण भागाचा व पर्यायाने समाजाचा व राष्ट्राचा विकास होणार नाही असे तत्कालीन नेत्यांना वाटले. त्यांनी पंचायतराज घटनादुरुस्ती विधेयक संसदेत मांडले. परंतु राजीव गांधी यांच्या कार्यकाळात हे विधेयक संमत न होता ते पी.व्ही. नरसिंहराव सरकारच्या कार्यकाळात मंजूर होऊन २० एप्रिल १९९२ रोजी त्याचे कायद्यात रूपांतर झाले. यालाच ७३ रावी घटनादुरुस्ती अधिनियम असे म्हणतात.

**७३ राव्या घटनादुरुस्तीचे प्रमुख उद्देश :**

(१) पंचायतराज संस्थांना घटनात्मक वैधानिक आधार प्राप्त करून देणे.

(२) महिला, अनुसूचित जाती व जमाती आणि अन्य मागासवर्गीयांना पंचायतराज संस्थांमध्ये पुरेशे प्रतिनिधित्व मिळवून देणे.

(३) विभिन्न घटकराज्यांच्या पंचायतराज संस्थांमधील विविधता काही प्रमाणात कमी करून त्यांच्यात एकसूत्रता निर्माण करणे.

(४) लोकशाही नियोजनाचा लाभ सर्वसामान्य ग्रामीण जनतेपर्यंत पोहचविणे.

(५) विकास योजनांचा निधी मुख्य लाभार्थ्यांपर्यंत पोहचविणे.

(६) पंचायतराज संस्थांमध्ये अनियमितपणे होणाऱ्या निवडणुका टाळणे.

(७) पंचायतराज संस्थांना घटकराज्य सरकारकडून पुरेशा अधिकारासोबतच पुरेशा निधी उपलब्ध करून त्यांचे आर्थिक परावलंबित्व दूर करणे.

(८) पंचायतराज संस्थांचे राज्यीय प्रमुख आणि प्रशासकीय अधिकारी यांच्यात सामंजस्य व सहकार्याचा दृष्टिकोन निर्माण करणे.



**७३ राव्या घटनादुरुस्तीची काही ठळक वैशिष्ट्ये :**

**(१) संवैधानिक दर्जा :** या घटनादुरुस्तीमुळे राज्यघटनेच्या नवव्या भागाचा विस्तार करून त्यात कलम २४३ ऐ ते २४३ ओ नव्याने समाविष्ट करण्यात आले. या कलमांमधील विधायक तरतुदींमुळे पंचायतराज संस्थांना वैधानिक अधिकार प्राप्त होऊन त्यांना घटनात्मक स्थान मिळाले.

**(२) त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्था :** या घटनादुरुस्तीनुसार जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद, तालुका किंवा गट स्तरावर पंचायत समिती आणि ग्रामस्तरावर ग्रामपंचायत अशी त्रिस्तरीय व्यवस्थेची तरतूद करण्यात आली. ज्या घटकराज्याची एकूण लोकसंख्या २० लाखांपेक्षा कमी असेल त्यांना जिल्हा परिषद आणि ग्रामपंचायत असे दोनच स्तर ठेवण्याची मुभा देण्यात आली.

**(३) ग्रामसभा :** ग्रामसभा ही गावातील सर्व नागरिकांची मिळून तयार होईल. ग्रामसभा ही पंचायतराज व्यवस्थेचा आधारभूत घटक असेल. प्रत्येक गावासाठी ग्रामसभा अनिवार्य करून तिला जास्तीचे अधिकार देण्यासंबंधीचे निर्देश केंद्र सरकारने घटकराज्य विधिमंडळांना दिले.

**(४) समान कार्यकाळ :** पंचायतराजमधील तीनही स्तरांचा कार्यकाल सर्व घटकराज्यांमध्ये ५ (पाच) वर्षांचा असेल. पाच वर्षांचा कार्यकाल पूर्ण होण्याअगोदर एखादी संस्था बरखास्त केली जाऊ शकेल. मात्र बरखास्तीनंतर सहा महिन्यांच्या आत निवडणुका घेणे बंधनकारक असेल. नवनिर्वाचित संस्थेचा कार्यकाळ पूर्ण निर्धारित संस्थांच्या कार्यकालाइतकाच असेल.

**(५) राज्य वित्त आयोग :** घटकराज्याचा राज्यपाल या घटनादुरुस्तीच्या अंमलबजावणीपासून एका वर्षाच्या आत राज्य वित्त आयोगाचे गठन करेल. त्याचा कार्यकाल पाच वर्षांचा असेल. पाच वर्षांचा कार्यकाल संपल्यानंतर नवीन वित्त आयोगाचे गठन केले जाईल.

घटकराज्य सरकार आणि स्थानिक स्वशासन संस्थांमधील आर्थिक संबंध सुरळीत ठेवण्यासाठी राज्य वित्त आयोग कार्य करेल. राज्य वित्त आयोगाची तीन ठळक कार्ये पुढीलप्रमाणे असतील.

(१) घटकराज्य सरकार आणि पंचायत राज यांच्यामधील कराचा वाटा निश्चित करणे.

(२) अनुदानाच्या संदर्भात नियम निश्चित करणे.

(३) पंचायतराज संस्थांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी शिफारशी व सूचना करणे.

राज्य वित्त आयोग ही एक सल्लागार संस्था असेल. आयोग आपला अहवाल राज्यपालाकडे सादर करेल. राज्यपाल हा अहवाल राज्यविधिमंडळात सादर करतील.

**(६) राज्य निवडणूक आयोग :** प्रत्येक घटकराज्यात ग्रामीण व नागरी स्थानिक स्वशासन संस्थांच्या निवडणुका पार पाडण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाची स्थापना केली

Scanned with OKEN Scanner

जाईल. राज्य निवडणूक आयुक्ताची नियुक्ती राज्यपाल करेल. निवडणूक आयोगाची स्वायत्तता जपण्यासाठी आयुक्ताच्या कार्यकालात त्या पदाला हानी पोहचेल असे बदल करता येणार नाहीत.

**(७) पंचायतराज संस्थांचे लेखांकन व लेखापरीक्षण :** पंचायत राज संस्थांना नियमित लेखांकन व लेखा परीक्षण करावे लागेल. राज्यांच्या विधिमंडळानी पंचायतराज संस्था कशाप्रकारे हिशोब ठेवतील व त्याचे लेखा परीक्षण कसे करावेत यांची तरतूद करावी. प्रामुख्याने निश्चित, नियमबद्ध आणि नियमित लेखांकन व लेखापरीक्षण असावे अशी अपेक्षा या घटनादुरुस्तीने केली आहे.

**(८) आरक्षणाची तरतूद :** सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने पंचायतराज संस्थांमध्ये तीनही स्तरावर आरक्षणाची तरतूद केली आहे. असे आरक्षण पदाधिकारी व सदस्य अशा दोन्ही पातळीवर असेल. महिला, अनुसूचित जाती व जमाती आणि अन्य मागासवर्गीय अशा तीनही दुर्बल घटकांसाठी आरक्षणाची तरतूद असेल.

**(९) केंद्रशासित प्रदेशाबाबत तरतूद :** या घटनादुरुस्तीतील सर्व तरतुदी घटकराज्याबरोबरच सर्व केंद्रशासित प्रदेशांना लागू असतील. ज्या केंद्रशासित प्रदेशात विधिमंडळ अस्तित्वात आहे तेथे विधिमंडळ कायदा पारित करेल व जेथे विधिमंडळ नाही तेथील प्रशासकीय प्रमुख राष्ट्रपतीच्या आदेशानुसार या तरतुदींची अंमलबजावणी करेल.

**(१०) काही प्रदेशांना सूट :** दुर्गम व पर्वतीय क्षेत्र म्हणून मिझोराम, मेघालय व नागालँड या तीन राज्यांना या घटनादुरुस्तीतून सूट देण्यात आली आहे. ३७० व्या कलमामुळे या तरतुदीपासून जम्मू-काश्मीर हे राज्यही मुक्त आहे. पश्चिम बंगालमधील दार्जिलिंग जिल्ह्यातील काही भाग व इतर ठिकाणच्या अनुसूचित क्षेत्रांनाही ही घटनादुरुस्ती लागू होत नाही.

## ७४ रावी घटनादुरुस्ती

७३ राव्या घटनादुरुस्तीने ग्रामीण स्वशासन संस्थांना घटनात्मक दर्जा मिळवून दिला. तर ७४ व्या घटनादुरुस्तीने नागरी स्वशासन संस्थांना घटनात्मक दर्जा मिळवून दिला. ७४ रावे घटनादुरुस्ती विधेयक हे देखील राजीव गांधी, व्ही.पी. सिंग व चंद्रशेखर पंतप्रधान असताना मंजूर होऊ शकले नाही. शेवटी ते पी.व्ही. नरसिंहराव पंतप्रधान असातान २२ डिसेंबर १९९२ रोजी लोकसभेत व २३ डिसेंबर १९९२ रोजी राज्यसभेत मंजूर झाले. २० एप्रिल १९९३ रोजी या विधेयकावर राष्ट्रपतींची स्वाक्षरी झाली आणि त्याची अंमलबजावणी १ जून १९९३ पासून करण्यात आली. सर्व घटकराज्ये व केंद्रशासित प्रदेशांना या घटनादुरुस्तीतील तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी एक वर्षाची म्हणजे ३१ मे १९९४ अखेरपर्यंतची मुदत देण्यात आली होती.

**७४ राव्या घटनादुरुस्तीची काही ठळक वैशिष्ट्ये :**

**(१) संवैधानिक दर्जा :** या घटनादुरुस्तीनुसार भारतीय संविधानात 9A या भागाचा नव्याने समावेश करण्यात आला. या भागात कलम २४३ (P) ते कलम २४३ (2-G) मध्ये नागरी



स्थानिक स्वशासन संस्थांविषयी आवश्यक त्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्यामुळे नागरी स्वशासन संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला आहे.

**(२) कार्यसूचीसाठी नवीन परिशिष्ट :** या घटनादुरुस्तीने भारतीय संविधानात १२ वे परिशिष्ट जोडण्यात आले आहे. या परिशिष्टात नागरी स्वशासन संस्थांना करावी लागणाऱ्या १८ कार्यविषयांची सूची दिली आहे.

**(३) नागरी स्वशासन संस्थांची रचना :** ७४ राव्या घटनादुरुस्तीने नागरी भागासाठी खालील तीन प्रकारच्या नागरी स्वशासन संस्था स्थापन करता येतील.

**(अ) नगर पंचायत :** मूलतः ग्रामीण असणारे परंतु शहरी क्षेत्रात परिवर्तित होत असणाऱ्या संक्रमण अवस्थेतील क्षेत्रासाठी नगर पंचायत स्थापन केली जाईल.

**(ब) नगर परिषद :** लहान नागरी क्षेत्रासाठी नगर परिषद स्थापन केली जाईल.

**(क) महानगरपालिका :** मोठ्या नागरी क्षेत्रांसाठी महानगरपालिका स्थापन केली जाईल.

वरीलप्रमाणे नागरी स्वशासन संस्थांची स्थापन करताना राज्यपाल निश्चित तरतुदींचा अर्थ लावून तसा आदेश कार्यान्वित करतील.

**(४) नगरपालिकांची रचना :** नगरपालिका क्षेत्राचे भौगोलिकदृष्ट्या वार्डात विभागणी करून प्रत्येक वार्डातून एक सदस्य प्रत्यक्ष पद्धतीने निवडला जाईल. याशिवाय राज्यविधिमंडळाने ठराव मंजूर केल्यास पुढील सदस्यांना नगरपालिकेत प्रतिनिधित्व मिळू शकेल.

(१) नगरपालिका प्रशासनात विशेष अनुभव असणारी व्यक्ती.

(२) नगरपालिका क्षेत्रातून प्रतिनिधित्व करणारे लोकसभा व राज्यसभा सदस्य.

(३) नगरपालिका क्षेत्रातून प्रतिनिधित्व करणारे विधानसभा व विधान परिषद सदस्य.

(४) कलम २४३ (S) मधील उपकलम ५ अन्वये स्थापन झालेल्या वॉर्ड समितीचे अध्यक्ष.

**(५) प्रभाग समितीची रचना :** भारतीय संविधानातील २४३ (S) नुसार तीन लाख किंवा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या नगरपालिका क्षेत्रातील दोन किंवा त्यापेक्षा अधिक वार्डासाठी एका प्रभाग समितीची स्थापना केली जाईल. राज्याचे विधिमंडळ या समितीमधील सदस्यांच्या जागा भरण्याची पद्धती निश्चित करेल.

**(६) आरक्षण धोरण :** पंचायतराज संस्थांप्रमाणेच नागरी स्वशासन संस्थांमध्ये देखील महिला, अनुसूचित जाती व जमाती आणि अन्य मागासवर्गीय लोकांसाठी आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. हे आरक्षण पदाधिकारी आणि सदस्य अशा दोन्ही पातळीवर असेल. अनुसूचित जाती व जमातींना लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण असेल त्यापैकी १/३ पेक्षा कमी नाही इतके महिला आरक्षण दिले जावे. अन्य मागासवर्गाच्या संदर्भात आरक्षणाचा तपशील

Scanned with OKEN Scanner

राज्यविधिमंडळ निश्चित करेल. त्यापैकी १/३ पेक्षा कमी नाही इतके महिला आरक्षण असे... तसेच एकूण पदाच्या १/३ पेक्षा कमी नाही इतके महिला आरक्षण निश्चित केले जाईल.

(७) **नागरी स्वशासन संस्थांचा कार्यकाल :** सर्व नागरी स्वशासन संस्थांचा कार्यकाल निवडणुकीनंतरच्या पहिल्या बैठकीपासून पाच वर्षांचा राहील. मात्र त्यापेक्षा कमी कालावधीत त्यांना बरखास्त केले जाऊ शकेल. बरखास्तीनंतर सहा महिन्यांच्या आत निवडणुका घेणे बंधनकारक राहील.

(८) **नागरी स्वशासन संस्थांची कर व निधी आकारण्याची शक्ती :** नागरी स्वशासन संस्थांना कर व निधी उभारण्याची शक्ती प्रदान करण्याचा अधिकार राज्याच्या विधिमंडळाला असेल. या संस्था कर निधी, टोल, फीस अशा विविध माध्यमातून पैसा उभा करू शकतील.

(९) **वित्त आयोग :** नागरी स्वशासन संस्थांची आर्थिक स्थिती सुधारणे, त्यांच्यासाठी अनुदानाची व्यवस्था करणे, तसेच राज्यसरकार आणि नागरी स्वशासन संस्था यांच्यातील कर, ड्युटीज्, टोल, फीस यांच्या वितरणासंबंधी शिफारशी व सूचना करण्याची जबाबदारी राज्य वित्त आयोगाची असेल. असा वित्त आयोग घटकराज्याचे राज्यपाल गठीत करतील. त्याचा कार्यकाल पाच वर्षांचा असेल. प्रत्येक पाच वर्षांनंतर नवीन वित्त आयोग गठीत केला जाईल.

(१०) **नागरी संस्थांच्या लेख्याचे लेखापरीक्षण :** नागरी स्वशासन संस्थांचे लेखांकन निश्चित करणे, त्या लेख्यांचे लेखा परीक्षण करणे या बाबींसंबंधीची तरतूद राज्य विधिमंडळ निश्चित करेल. असे लेखा परीक्षण नागरी स्वशासन संस्थांना नियमितपणे करावे लागेल.


(११) **निवडणूक आयोग :** नागरी स्वशासन संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेला मार्गदर्शित व नियंत्रित करण्याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर असेल. मतदार याद्या तयार करण्यापासून, निवडणूक निकाल जाहीर करण्यापर्यंत निवडणूकविषयक सर्व कार्यांची जबाबदारी निवडणूक आयोगावर असेल. राज्य निवडणूक आयुक्ताची नियुक्ती राज्यपाल करतील.

(१२) **काही प्रदेशांना सूट :** भारतातील अनुसूचित क्षेत्रे, दुर्गम भाग आणि पश्चिम बंगालमधील दार्जिलिंगचा भाग या क्षेत्रासाठी ७४ राव्या घटनादुरुस्तीतील तरतुदी लागू असणार नाहीत.

**७३ राव्या घटनादुरुस्तीमुळे पंचायतराज व्यवस्थेत घडून आलेले प्रमुख महत्त्वपूर्ण बदल :**

(१) **त्रिस्तरीय व्यवस्थेला घटनात्मक दर्जा :** पंचायरातज व्यवस्था ही त्रिस्तरीय असेल. हाच आकृतीबंध संपूर्ण देशभर निर्माण करण्याचे बंधन घटकराज्यांवर राहील. गावतपाळीवर, विकासगटाच्या पातळीवर व जिल्हा पातळीवर प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे या संस्था स्थापन केल्या जातील. प्रत्येक स्तरावर मतदारसंघ निर्माण करून प्रातिनिधिक लोकशाहीचे तत्त्व मुळापर्यंत रूजविण्याचा प्रयत्न या घटनादुरुस्तीने केला आहे.






(२) **ग्रामसभेला घटनात्मक दर्जा :** या घटनादुरुस्तीने ग्रामसभेला पंचायतराज योजनेचा आत्मा (Life Line) असा दर्जा व अधिकार मिळवून दिले. हे अधिकार किती महत्त्वपूर्ण आहेत हे गडचिरोली जिल्ह्यात आदिवासींची बहुसंख्यात्मक वस्ती असणाऱ्या गावांमधील घटनेने सिद्ध केले. त्यांनी 'दारूला गावबंदी' हे आंदोलन सुरू करून ग्रामसभेला गावामधील देशी दारूची दुकाने बंद करण्याबाबतचा ठराव मंजूर करण्यास भाग पाडले. ग्रामसभेने मंजूर केलेल्या ठरावामुळे दारू विकण्याचे परमीट असणारे दुकान बंद करण्याचा निर्णय घेणे राज्यशासनाला भाग पडले. केंद्रामध्ये लोकसभा व घटकराज्यामध्ये विधानसभा यांना जे स्थान आहे ते गावतपाळीवर ग्रामसभेला या घटनादुरुस्तीने मिळवून दिले आहे. ग्रामसभेत गावातील सर्व प्रौढ मतदारांना सहभागी होण्याचा अधिकार या घटनादुरुस्तीने मिळवून दिला.

(३) **कार्यकाळ :** ७३ रावी घटनादुरुस्ती होण्यापूर्वी घटक राज्यातील सत्तारूढ मंत्रिमंडळ पंचायतराज संस्थांच्या निवडणुकीबाबत निर्णय घेण्यास टाळाटाळ करीत असे. दुष्काळ, महापूर, राज्यात कोठेतरी घडलेल्या सांप्रदायिक दंगली यासारख्या कोणत्या तरी कारणाचे निमित्य सांगून पंचायतींच्या निवडणुका सतत पुढे ढकलण्याचा निर्णय सत्तारूढ मंत्रिमंडळ घेत असे हे १९८० च्या दशकात अनेक घटक राज्यांमधील जनतेने प्रत्यक्ष अनुभवले आहे. या घटनादुरुस्तीने

पंचायतराज संस्थांच्या नियमित निवडणुका घेणे राज्यशासनावर बंधनकारक झाले आहे. या वर्षांचा कार्यकाल पूर्ण होण्यापूर्वी कोणत्याही स्तरावरील पंचायतीचे विसर्जन झाले असेल तर सहा महिन्यांच्या आत त्या पंचायतीसाठी पुन्हा नव्याने निवडणुका घेणे हे राज्यसरकारांसाठी आता घटनात्मकदृष्ट्या बंधनकारक झाले आहे.

(४) **राज्य निर्वाचन आयोग :** घटकराज्यातील पंचायतराज संस्थांच्या निवडणुका निःपक्षपद्धतीने आणि स्वच्छ वातावरणात पार पाडण्यासाठी एक निर्वाचन आयोग गठीत करणे ही घटक राज्यसरकारची घटनात्मक जबाबदारी राहील असे ७३ राव्या घटनादुरुस्तीने निश्चित केले आहे. निर्वाचन आयोगाच्या रचनेसंबंधीचा तपशील तयार करण्याची जबाबदारी राज्य विधिमंडळावर सोपवून देण्यात आली आहे. मतदार यादी तयार करणे, मतदारसंघ तयार करणे, इत्यादी निवडणूक संबंधीचे सर्व कार्य करण्याची जबाबदारी राज्य निर्वाचन आयोगाची असेल असे या घटनादुरुस्तीने निश्चित केले आहे.

राज्य निर्वाचन आयोगाचे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी आणखी एक महत्त्वाची तरतूद करण्यात आली आहे. ती म्हणजे या आयोगाने केलेल्या कार्यात न्यायालय कसलाही हस्तक्षेप करू शकणार नाही. उच्च न्यायालयांच्या न्यायाधीशांना बडतर्फ करण्यासाठी जी पद्धती व नियम लागू पडतात ती पद्धती व नियम राज्य निर्वाचन आयोगाच्या सदस्यांना बडतर्फ करण्यासाठी लागू राहील असे या घटनादुरुस्तीने निश्चित केले. राज्य निर्वाचन आयोगाची निर्मिती आणि त्यांचे स्वातंत्र्य अबाधित ठेवणे ही ७३ राव्या घटनादुरुस्तीने घडवून आणलेली एक महत्त्वपूर्ण बाब आहे.

(५) **समाजातील दुर्बल घटकांसाठी आरक्षण :** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, मागासवर्गीय जाती आणि महिला हे भारतीय समाजातील महत्त्वाचे दुर्बल घटक आहेत. सत्ता संरचनेत सहभागी होण्यापासून ते नेहमीच म्हणजे शतकानुशतकांपासून वंचित राहिले आहेत. पंचायतराज संस्थेत या दुर्बल घटकांना प्रतिनिधित्व मिळावे यासाठी या घटनादुरुस्तीने आरक्षणाची तरतूद केली आहे. प्रत्येक स्तरावरील पंचायतीच्या एकूण जागांपैकी ३३ टक्के म्हणजे १/३ जागा महिलांसाठी राखीव असतील. आता म्हणजे २००९ मध्ये ही तरतूद ५० टक्क्यांपर्यंत वाढविण्याचे केंद्र शासनाने निश्चित केले आहे. गावातील प्रभागातून जेवढ्या लोकसंख्येमागे एक प्रतिनिधी निवडून येत असेल तेवढ्या लोकसंख्येचा आधार अशा जाती व जमातींसाठीच्या राखीव जागांना लागू असेल.

गावात एकूण लोकसंख्येच्या २५ टक्के लोकसंख्या अनुसूचित जातीची असेल तर पंचायतीमध्येही त्यांची सभासद संख्या २५ टक्के एवढी असेल. याच पद्धतीने अनुसूचित जमातींचे प्रमाण असेल असे ७३ राव्या घटनादुरुस्तीने निश्चित केले आहे. याशिवाय तीनही स्तरांवरील पंचायतीच्या अध्यक्षपदांसाठीही राखीव जागांची तरतूद केली आहे. अन्य मागासवर्गासाठी पंचायतीमध्ये राखीव जागा ठेवण्याचा अधिकार राज्यशासनाला देण्याची तरतूद ७३ राव्या घटना दुरुस्तीत करण्यात आली आहे.



तक्ता क्र. १

संपूर्ण भारताच्या पंचायतराज संस्थांमधील नेतृत्वाची स्थिती दर्शविणारा तक्ता

(२००५–२००६)

| पंचायतीचा स्तर | एकूण संख्या | निर्वाचित सदस्य | स्त्रिया शे.प्र. | अनुसूचित जाती शे.प्र. | अनुसूचित जमाती शे.प्र. |
|---|---|---|---|---|---|
| जिल्हा परिषद | ५३७ | ११८३५ | ४१ | १८ | ११ |
| पंचायत समिती | ६०९६ | ११००७० | ४३ | २२ | १३ |
| ग्रामपंचायत | २३४६७६ | २०७३७१५ | ४० | १६ | ११ |

(६) **पंचायतींचे अधिकार व कार्ये :** ७३ राव्या घटना दुरुस्तीने पंचायतीचे अधिकार, कार्य व त्यांचे उत्तरदायित्व निश्चित करण्यासंबंधी तरतूद केली आहे. पंचायतींना स्थानिक स्वशासन संस्था म्हणून कार्य करता यावे या दृष्टीने त्यांना सत्ता व अधिकार देण्याची या घटना दुरुस्तीमुळे राज्यविधिमंडळांना अधिसत्ता प्राप्त झाली आहे. केंद्र सूची, राज्य सूची, समवर्ती सूची यांच्याप्रमाणेच राज्यघटनेच्या अकराव्या परिशिष्टात पंचायती संस्थांवर सोपविता येतील अशी २९ विषयांची एक सूची ७३ राव्या घटना दुरुस्तीन्वये समाविष्ट करण्यात आली आहे. केंद्र आणि राज्यसरकार यांच्यामध्ये जसे अधिकार व सत्तेचे विभाजन आहे तसेच राज्यसरकार आणि पंचायती संस्था यांच्यामध्ये अधिकारांचे विभाजन या घटनादुरुस्तीमुळे झाले आहे.

(७) **राज्य वित्त आयोग :** ७३ राव्या घटनादुरुस्तीच्या अंमलबजावणीपासून म्हणजे दिनांक २५.४.१९९३ पासून एक वर्षाच्या आत राज्य वित्त आयोगाची निर्मिती करण्याची जबाबदारी घटकराज्य सरकारवर टाकण्यात आली आहे. हा वित्त आयोग राज्याच्या महसूलापैकी किती वाटा आणि तो कोणत्या पद्धतीने पंचायतराज संस्थांना द्यावा यासंबंधीच्या शिफारशी सादर करेल. पंचायतराज संस्थांनीही कोणकोणते कर लावावेत यासंबंधी देखील आयोग शिफारशी करेल. ७३ राव्या घटनादुरुस्तीने पंचायतराज संस्थांना आर्थिक बाबतीत स्वायत्तता मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

## • अभ्यासार्थ प्रश्न

**दीर्घोत्तरी प्रश्न :**

(१) स्थानिक स्वशासनाचा अर्थ लिहा. स्थानिक स्वशासनाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

(२) स्थानिक स्वशासनाची व्याख्या करा. स्थानिक स्वशासनाच्या मर्यादा लिहा.

(३) स्थानिक स्वशासनाचे महत्त्व विशद करा.

(४) भारतातील स्थानिक स्वशासनाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आढावा घ्या.

(५) स्वातंत्र्यप्राप्तीच्या काळातील ग्रामीण आणि नागरी स्वशासन संस्थांच्या स्थितीचे वर्णन करून स्वातंत्र्योत्तर काळात त्यांना प्राप्त झालेल्या नवीन रूपाचे स्पष्टीकरण करा.

Scanned with OKEN Scanner

(६) ७३ राव्या घटनादुरुस्तीची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट करून तिची ठळक वैशिष्ट्ये लिहा.
(७) ७४ राव्या घटनादुरुस्तीची ऐतिहासिक पार्श्वभूचमी स्पष्ट करून तिची ठळक वैशिष्ट्ये लिहा.
(८) ७३ राव्या घटनादुरुस्तीमुळे पंचायतराज व्यवस्थेत घडून आलेले महत्वपूर्ण बदल स्पष्ट करा.

लघुत्तरी प्रश्न :
(१) नागरिकांची सनद आणि स्थानिक स्वशासन
(२) प्राचीन काळातील ग्रामपंचायत
(३) ब्रिटिश राजवटीच्या काळातील स्थानिक स्वशासन
(४) स्थानिक स्वशासन संस्था आणि भारतीय संविधान
(५) भारतातील ग्रामीण स्थानिक स्वशासनाची संरचना
(६) भारतातील नागरी स्थानिक स्वशासनाची संरचना
(७) बळवंतराय मेहता समिती
(८) ग्रामीण विकासासाठीचा सामुदायिक विकास कार्यक्रम आणि पंचायतराज योजना
(९) अशोक मेहता समिती
(१०) स्थानिक स्वशासन संस्थांचे राजकीय पदाधिकारी आणि प्रशासकीय अधिकारी यांच्यातील संबं

अतिसंक्षिप्त प्रश्न :
(१) त्रिस्तरीय शासनव्यवस्था
(२) स्वायत्त व्यवस्था – स्थानिक स्वशासनाच्या वैशिष्ट्यांचा अर्थ
(३) स्थानिक स्वशासन संस्था आणि जनतेचे सहभागित्व
(४) लोकशाही विकेंद्रीकरणाच्या तत्वाचा अर्थ
(५) स्थानिक स्वशासन–लोकशाही व्यवस्थेचा आधारस्तंभ
(६) नागरिकांच्या सनदेचे महत्व
(७) नागरिकांच्या सनदेला महाराष्ट्र शासनाने दिलेले व्यवहार्य रूप
(८) स्थानिक स्वशासनाचे कल्याणकारी राज्याच्या निर्मितीतील योगदान
(९) प्राचीन भारतातील पंचायतींचे सुवर्णयुग
(१०) लॉर्ड रिपन – आधुनिक भारतीय स्वशासनाचा जनक

# २.
# ग्रामीण स्थानिक स्वशासन
## (Rural Local Self Government)

*प्रास्ताविक*

*(१) **ग्रामपंचायत :** स्थापना, रचना, सदस्यत्वासाठीची पात्रता, आरक्षण, निवडणूक पद्धती, कार्यकाल, पदाधिकारी व त्यांच्यासाठीचे आरक्षण, सरपंच व उपसरपंचाचा कार्यकाल व त्यांचेवरील अविश्वासाचा ठराव, ग्रामपंचायतीच्या सभा, सरपंचाची कार्ये, अधिकारी व नोकरवर्ग, ग्रामपंचायतीची कार्ये व अधिकार, ग्रामपंचायतीचे स्थान व महत्त्व*

*(२) **पंचायत समिती :** स्थापना, रचना, सदस्यत्वासाठीची पात्रता, आरक्षण, निवडणूक पद्धती, कार्यकाल, पदाधिकारी व त्यांच्यासाठीचे आरक्षण, सभापती व उपसभापतीचा कार्यकाल व त्यांचेवरील अविश्वासाचा ठराव, सभा, सभापतीचे अधिकार व कार्ये, अधिकारी व नोकरवर्ग, पंचायत समितीची कार्ये व अधिकार, पंचायत समितीचे स्थान व महत्त्व*

*(३) **जिल्हा परिषद :** स्थापना, रचना, सदस्यत्वासाठी पात्रता, आरक्षण, निवडणूक पद्धती, कार्यकाल, सभा, पदाधिकारी व त्यांच्यासाठीचे आरक्षण, अध्यक्ष व उपाध्यक्षाचा कार्यकाल व त्यांचे वरील अविश्वासाचा ठराव, अध्यक्षाचे अधिकार व कार्ये, अधिकारी व नोकरवर्ग, जिल्हा परिषदेची कार्ये व अधिकार, समिती व्यवस्था, जिल्हा परिषदेचे स्थान व महत्त्व.*

*(४) **ग्रामसभा :** रचना, बैठक, गणसंख्या, ग्रामसभेची पूर्वतयारी, विषयपत्रिका, ग्रामसभेचे अधिकार व कार्ये, स्थान व महत्त्व.*

***ग्रामीण विकासात ग्रामीण स्वशासनाची भूमिका :***

*प्रास्ताविक, विकासाचा अर्थ, ग्रामीण विकासाचे प्रश्न, विकास योजनांची निर्मिती व अंमलबजावणी, ग्रामीण विकासात पंचायतराज संस्थांची भूमिका, ग्रामीण विकास कार्यक्रमाचे टीकात्मक परीक्षण.*

*अभ्यासार्थ प्रश्न.*



Scanned with OKEN Scanner

लोकशाही शासनव्यवस्थेत स्थानिक स्वशासनाचे महत्त्व अनेक दृष्टीने आहे. उदा. या संस्था नागरिकांना राज्यकारभार चालविण्याचे शिक्षण वा प्रशिक्षण देणाऱ्या पाठशाळा असतात. त्या स्थानिक नेतृत्वाचा विकासही घडवून आणतात. याशिवाय आदर्श नागरिक घडविण्याच्या प्रक्रियेत त्यांचा महत्त्वपूर्ण वाटा असतो. म्हणून लॉर्ड ब्राईसने म्हटले आहे की, "लोकशाहीची पाठशाळा आणि तिच्या यशाची ग्वाही ही स्थानिक प्रशासनाच्या व्यवस्थेत असते."

जिल्हाधिकारी हे पद, जिल्हाधिकाऱ्याचे कार्यालय, जिल्ह्यांची निर्मिती आणि जिल्हाधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली असणारी प्रशासन यंत्रणा या सर्वांची उभारणी स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश राज्यकर्त्यांनीच केलेली आहे. महसूल वसूली आणि कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात न्याय प्रशासन या दोन उद्दिष्टांची पूर्ती करण्यासाठी ब्रिटिशांनी जिल्हा प्रशासन यंत्रणा निर्माण केलेली आहे हे स्वातंत्र्य आंदोलनाच्या लढ्यात सहभागी झालेल्या राष्ट्रीय नेत्यांच्या लक्षात आले होते. कारण जिल्ह्यातील विशेषतः ग्रामीण जनतेच्या विकास कार्याकडे ब्रिटिशांनी उभ्या केलेल्या प्रशासकीय यंत्रणेने पूर्णतः दुर्लक्ष केले होते. त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे ब्रिटिशांनी जिल्ह्या-जिल्ह्यात उभ्या केलेल्या प्रशासकीय यंत्रणेत जनतेच्या सहभागाला थोडासा देखील वाव नव्हता. म्हणूनच १९४८ मधील स्थानिक स्वराज्य मंत्र्यांच्या परिषदेत भाषण करताना पं. नेहरूंनी 'लोकशाही व्यवस्थेत सत्ता ही तळागाळापर्यंत विकेंद्रीत करण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादित केले होते.' स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या पहिल्या दशकातच जिल्हा, तालुका आणि गावापर्यंत सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याची व्यवस्था असणारी पंचायतराज योजना भारतीय नेत्यांनी अंमलात आणली. "स्थानिक स्वशासन व्यवस्था कमकुवत असेल अशा देशामध्ये शासनव्यवस्थेचा कोणताही प्रकार असला तरीही तो स्थिर व बळकट होऊ शकत नाही" असे महत्त्वपूर्ण राज्यशास्त्रीय तत्त्व हॅमिल्टनने प्रतिपादित केले आहे. आजच्या काळातील पंचायतराज योजनेकडे पाहिले की भारतीय नेत्यांना हॅमिल्टनने प्रतिपादित केलेल्या तत्त्वांचे महत्त्व पूर्णपणे उमजले होते असे म्हणावेसे वाटते.

प्रांत (घटकराज्य), प्रांतामधील विभाग, जिल्हा, तालुका अशी प्रशासनाची उतरंड स्वातंत्र्यपूर्व काळातील ब्रिटिश राजवटीतच निर्माण झालेली होती. परंतु ब्रिटिशांना प्रशासनाच्या सर्व पातळ्यांवर निर्वाचित प्रतिनिधींची मंडळे असणारी लोकशाही व्यवस्था निर्माण करण्याची आवश्यकता वाटली नाही. स्वातंत्र्योत्तर काळातच ती वाटली. राज्यसरकारापेक्षा खालच्या पातळीवर सत्तेचे विकेंद्रीकरण करणे ही स्वातंत्र्योत्तर काळात भारताची निकडीची गरज झाली होती. कारण ही गरज पूर्ण केल्याशिवाय भारतात लोकशाही शासनव्यवस्थेची पाळेमुळे पक्की रूजू शकणार नाहीत अशी तत्कालीन राष्ट्रीय नेत्यांची धारणा झाली. अशाप्रकारे स्थानिक स्वशासन संस्था हा लोकशाही विकेंद्रीकरणातील सर्वात महत्त्वाचा घटक आहे. लोकशाही शासनव्यवस्थेचे यशापयश हे प्रामुख्याने स्थानिक स्वशासनाच्या अंमलबजावणीवर अवलंबून असते. म्हणूनच "स्थानिक शासन हे लोकशाहीचा कणा आहे" असे विल्यम रॉकसनने म्हटले आहे.



प्रशासनात संघटनात्मक रचना आणि दुसरे म्हणजे आर्थिक संसाधनांची निश्चितता ही दोन्ही घटक तत्त्वे अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. या दोन घटक तत्त्वांचा सुयोग्य असा मेळ बसण्यावरच प्रशासनाची कार्यक्षमता अवलंबून असते. हे सर्व मान्य केले तरीही कोणत्याही प्रकारच्या शासनपद्धतीत शासकीय कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये स्थानिक स्तरावरच्या लोकांचे सहकार्य आणि त्यांचा सातत्यपूर्ण असा सहभाग हा घटक देखील अत्यंत महत्त्वाचा आहे. स्थानिक लोकांच्या शासकीय कार्यामधील सहभागाचा परिणाम प्रशासनाची कार्यक्षमता उंचावण्यावर तर होतो. याशिवाय शासकीय कार्यात स्थानिक स्तरावरच्या लोकांच्या सहभागाचा परिणाम हा आर्थिक व सामाजिक बदल घडवून आणण्यामध्येही होत असतो. उदा. देशाची जनता उपासमाराला बळी पडू नये म्हणून अन्नधान्याच्या आयातीला सर्वोच्च प्राधान्य देणे भारत सरकारला भाग पडले होते. स्थानिक लोकांच्या सहकार्याने आणि सहभागाने राबविण्यात आलेल्या 'हरितक्रांती' या शासकीय कार्यक्रमाने एक दशकातच भारत सरकारची वर उल्लेखित स्थितीतून सुटका केली. राष्ट्रीय आणि प्रांतीय पातळीवरील शासकीय कार्यामधील सहभागापेक्षाही स्थानिक पातळीवरील शासकीय कार्यात लोकांचा सहभाग हा अधिक स्वाभाविक असतो. कारण स्थानिक शासन हे जनतेच्या घरांमधील उंबरठ्यापर्यंत येऊन पोहचले असते.

## प्रास्ताविक

भारताने स्वातत्र्योत्तर काळातील विकास कार्यात लोकसहभाग आणि लोकशाही विकेंद्रीकरण या दोहोंचे महत्त्व योग्य प्रकारे उमजून घेतले आणि त्याप्रमाणे केलेली कृती केली म्हणजे त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्था होय. १९५० च्या दशकात आफ्रिका आणि आशिया खंडातील अनेक देशांमध्ये लिखित संविधाने आणि लोकशाही शासनव्यवस्था असणाऱ्या राजवटी निर्माण झाल्या. परंतु १५-२० वर्षांच्या अल्प काळात अनेक आशियायी आणि आफ्रिकन देशांमध्ये राज्यक्रांती होऊन लोकशाही शासनव्यवस्था असणाऱ्या राजवटी कोसळून पडल्या आणि संविधाने निकालात निघाली. परंतु असे भारतात घडले नाही. अनेक आफ्रिकन व आशियायी देशांच्या तुलनेत भारतातील लोकशाही शासनव्यवस्था ही अधिक स्थिर असल्याचे दिसून येते. याचे रहस्य लोकशाही विकेंद्रीकरणातून निर्माण झालेल्या स्थानिक स्वशासनाच्या व्यवस्थेत दडलेले आहे असे अनेक विचारवंतांचे म्हणणे आहे.

भारत हा खेड्यांचा देश आहे. पंचायत हा भारतीय खेड्यांमधील शासनव्यवस्थेचा कणा आहे हे अनेक शतकांच्या इतिहासावरून स्पष्ट होते. प्रत्येक भारतीय खेडे हे आत्मनिर्भर वा स्वयंपूर्ण असे गणराज्य व्हावे असे महात्मा गांधीचे स्वप्न होते. त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात म्हणजे इ.स. १९०९ पासून 'ग्राम स्वराज्य' ही संकल्पना भारतीय जनमानसात रूजविण्याचे प्रयत्न केले. ग्रामीण समुदायासाठीच्या रचनात्मक कार्यक्रमात त्यांनी व्यसनमुक्ती, स्त्री शिक्षण आणि प्रभावी व प्रबळ अशी स्त्री संघटना, जलस्त्रोतांचा शोध आणि समान जलवाटप पद्धतीची निर्मिती, जनसामान्यांना आरोग्यसेवेची सुलभ उपलब्धता यासारखी सूत्रे प्रत्येक खेड्यात राबविण्याचा

Scanned with OKEN Scanner

आग्रह धरला. ते स्वतः स्थानिक स्वशासन संस्थांकडे 'स्थानिक स्वराज्य संस्था' या दृष्टीने बघत होते. 'स्वराज्य' हा शब्द गांधीवादी मूल्ये व आदर्श दर्शवितो.

स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने ग्रामीण समुदायाच्या पुनर्रचनेचा व विकासाचा कार्यक्रम हाती घेतला. परंतु हा कार्यक्रम पूर्णतः गांधीवादी विचारसरणीवर आधारित नाही. तसेच गांधीवादी विचारसरणी पूर्णपणे फेटाळूनही लावली नाही वा अमान्य केली नाही. हे वास्तव कोणीही नाकारू शकत नाही. त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्थेचा प्रारंभ हा महात्मा गांधीचे स्वप्न साकारण्याच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल आहे. ग्रामीण समुदायाची पुनर्रचना करण्याच्या कार्यात ग्रामीण जनतेला सहभागी करून घेण्याची ग्वाही पंचायतराज योजनेने दिलेली आहे असेही म्हणता येईल. २४ एप्रिल १९९३ हा पंचायत राज व्यवस्थेच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वपूर्ण दिवस ठरला. कारण या दिवसापासून ७३ राव्या घटनादुरुस्ती अन्वये त्रिस्तरीय पंचायत राज संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला. पंचायतराज संस्थेतील तीनही संस्था आणि ग्रामसभा यांची रचना, अधिकार, कार्ये यांची ओळख आपणास या प्रकरणात करून घ्यावयाची आहे. तसेच ग्रामीण विकासामधील पंचायतराज व्यवस्थेची भूमिका देखील आपणास या प्रकरणात समजून घ्यावयाची आहे.

## (१) ग्रामपंचायत
## (Gram Panchayat)

ग्रामपंचायत हा लोकशाही विकेंद्रीकरणातील सर्वात खालचा स्तर होय. ग्रामपंचायत ही पंचायतराज व्यवस्थेतील तळपातळीवरील संस्था आहे. ग्रामपंचायत हा ग्रामीण स्वशासनातील अंतीम घटक आहे. पंचायत समिती व जिल्हा परिषद यांच्या तुलनेत ग्रामपंचायती ह्या अधिक प्राचीन आहेत. उदा. महाराष्ट्रात १९५८ च्या मुंबई ग्रामपंचायत अधिनियमानुसार ग्रामपंचायतीची स्थापना करण्यात आलेली आहे. ७३ राव्या घटनादुरुस्तीमुळे ग्रामसभेचे स्थान व अधिकारक्षेत्र हे ग्राम पंचायतींपेक्षाही अधिक महत्त्वाचे झाले आहे. ग्रामसभेची कार्यकारी समिती अथवा ग्रामसभेचे कार्यकारी मंडळ असे ग्रामपंचायतीचे स्थान ७३ राव्या घटनादुरुस्तीने निर्माण केले आहे असे म्हणता येईल.

स्थापना : भारतातील प्रत्येक खेड्यामध्ये ग्रामपंचायत नाही. कारण ग्रामपंचायतीची स्थापना करताना लोकसंख्या, भौगोलिक रचना, उत्पन्न इत्यादी घटकांचा विचार केला जातो. उदा. महाराष्ट्र सरकारने सपाट भूप्रदेशातील ज्या गावाची लोकसंख्या ६०० असेल तेथे ग्रामपंचायतीची स्थापना केली जाईल. परंतु डोंगराळ वा दुर्गम प्रदेशातील वाड्या अथवा वस्त्यासारख्या गावाची लोकसंख्या ३०० असेल तर तेथे ग्रामपंचायतीची स्थापना महाराष्ट्र राज्य सरकार करू शकते. ग्रामपंचायतीची स्थापना करण्याबाबत अन्य घटकराज्यांचे लोकसंख्या आणि भौगोलिक रचनेबाबतचे निकष वेगवेगळे आहेत. आजमितीस भारतात २,१८,११६ इतक्या ग्रामपंचायती आहेत. तर खेड्यांची संख्या ५.८ लाख इतकी आहे. यावरून दोन-तीन छोट्या गावांची मिळून देखील ग्रामपंचायत स्थापन केली जाते हे स्पष्ट होते. अशा ग्रामपंचायतींना 'ग्रुपग्रामपंचायत' असे संबोधिले जाते.



**ग्रामपंचायतीची रचना :**

ग्रामपंचायतीची एकूण सदस्यसंख्या लोकसंख्येच्या आधारावर ठरविण्यात येते. उदा. महाराष्ट्रात १५०० पर्यंत लोकसंख्या असल्यास ग्रामपंचायतीची एकूण सदस्यसंख्या सात असते. दोन हजारपर्यंत लोकसंख्या असल्यास नऊ, तीन हजारपर्यंत ११, चार हजारपर्यंत १३, पाच हजारापर्यंत १५ आणि पाच हजारापेक्षा अधिक असल्यास १७ एवढी निश्चित करण्यात आली आहे.

**ग्रामपंचायत सदस्यत्वासाठीच्या पात्रता व अटी :**

महाराष्ट्रात ग्रामपंचायत सभासदांना पंच असे म्हणतात. पंचांना ग्रामपंचायत निवडणूक लढविण्यासाठी काही प्रमुख पात्रता आवश्यक असतात त्या खालीलप्रमाणे :

(१) तो भारताचा नागरिक असावा.

(२) ग्रामपंचायत क्षेत्रातील मतदार यादीत त्याचे नाव नोंदलेले असावे.

(३) त्याचे वय २१ वर्षे पूर्ण असावे.

(४) तो ग्रामपंचायत किंवा जिल्हा परिषदेच्या करांचा थकबाकीदार नसावा.

(५) तो केंद्र, राज्य अथवा स्थानिक शासनात शासकीय नोकर नसावा.

(६) तो वेडा व दिवाळखोर नसावा.

(७) तो शासकीय नोकरीतून गैरवर्तनाच्या कारणावरून बडतर्फ केलेला नसावा. असल्यास पुढील पाच वर्षे तो निवडणूक लढविण्यास अपात्र मानला जातो.

(८) त्याला न्यायालयाने एखाद्या अपराधाबद्दल दोषी ठरवून सहा महिन्यांपेक्षा जास्त कैदेची शिक्षा दिली असेल तर शिक्षा संपल्यापासून पाच वर्षे ते निवडणूक लढविण्यास अपात्र मानला जातो.

(९) त्याला राज्य विधिमंडळाच्या निवडणुकीसाठी कोणत्याही कायद्याने अपात्र घोषित केलेले नसावे.

(१०) ग्रामपंचायतीची जागा ज्या वर्गासाठी राखीव असेल त्या वर्गाचा तो उमेदवार असावा.

(११) १२ सप्टेंबर २००१ नंतर तिसरे अपत्य झालेली व्यक्ती अपात्र असेल.

**ग्रामपंचायतीतील आरक्षण :**

ग्रामपंचायतीतील सदस्यांच्या आरक्षणाचे स्वरूप खालीलप्रमाणे असते.

ग्रामपंचायतीतील सदस्यांच्या आरक्षणाचे स्वरूप खालीलप्रमाणे असते.
(१) अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी गावामधील लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण दिले जाते. अनुसूचित जाती व जमातीसाठी जेवढ्या जागा राखीव ठेवल्या जातात त्यापैकी १/३ पेक्षा कमी नाही इतके आरक्षण त्याच प्रवर्गातील महिलांसाठी दिले जाते.

(२) अन्य मागास वर्ग (OBC) : गावात म्हणजे ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात वास्तव्य करणाऱ्या अन्य मागास वर्गामध्ये समावेश असणाऱ्या सर्व जातींना ग्रामपंचायतीच्या एकूण

सभासदसंख्येमध्ये २७ टक्के जागा राखीव असतात. त्यापैकी १/३ पेक्षा कमी नाही इतके आरक्षण त्याच प्रवर्गातील महिलांसाठी दिले जाते.

(३) **महिला वर्ग :** ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात राहणाऱ्या सर्व महिलांसाठी एकूण सभासदसंख्येमध्ये १/३ म्हणजे ३३ टक्के जागा महिलांसाठी राखीव असतात. अशाप्रकारे वेगवेगळ्या वर्गांसाठी ग्रामपंचायतीमध्ये राखीव जागा ठेवल्या जातात. राखीव प्रभाग निश्चित करण्याचा किंवा आळीपाळीने ते प्रभाग बदलण्याचा अधिकार राज्यसरकारच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यास असतो. ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत अनुसूचित जाती-जमाती व इतर मागास वर्गासाठी राखीव असलेल्या जागांवर त्याच जातीतील स्त्री-पुरुषांना निवडणूक लढविता येते; परंतु खुल्या वर्गातील सर्वसाधारण जागांवर अनुसूचित जाती-जमाती व इतर मागासवर्गातील उमेदवार निवडणूक लढवू शकतात. थोडक्यात ते राखीव मतदारसंघ आणि खुले मतदारसंघ अशा दोन्हीही ठिकाणी निवडणूक लढवू शकतात.

**निवडणूक पद्धती व निवडणूक यंत्रणा :** ग्रामपंचायतीच्या सर्व सभासदांची निवड गावातील १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या सर्व स्त्री-पुरुष प्रौढ नागरिकांकडून गुप्त मतदान पद्धतीनुसार होते. ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत भाग घेण्यासाठी त्याचे नाव गावाच्या मतदार यादीत असणे आवश्यक असते.

१९९२ मधील ७३ राव्या घटनादुरुस्तीनंतर स्थानिक स्वशासन संस्थांच्या निवडणुकीचे संचालन करण्यासाठी राज्य निर्वाचन आयोग गठीत करण्यात आला आहे. राज्य निर्वाचन आयोगावरच ग्रामपंचायतीसाठीच्या निवडणुकीचे संचालन करण्याची जबाबदारी असते. राज्य निर्वाचन आयोग जिल्हा आणि तालुका स्तरावर आपली निवडणूक यंत्रणा उभी करतो. त्या यंत्रणेचा प्रमुख जिल्हाधिकारी असतो. जिल्हा निर्वाचन अधिकारी म्हणून जिल्ह्यातील ग्रामपंचायतीच्या निवडणुका घेण्याची जबाबदारी त्याच्यावर असते. तालुका स्तरावर तहसीलदार हा निवडणूक यंत्रणेचा प्रमुख म्हणून निवडणूकविषयक कार्ये पाहतो. ग्रामपंचायतीची निवडणूक जाहीर होण्यापूर्वी प्रत्येक गावातील मतदारांची यादी आणि त्या गावातील वॉर्डाची व प्रभागाची यादी तहसीलदार कार्यालयात प्रसिद्ध केली जाते. गावाच्या लोकसंख्येनुसार वॉर्ड व प्रभाग पाडले जातात. साधारणतः एका प्रभागातून दोन ते तीन सदस्य निवडले जातात.

ओबीसी, एससी, एसटींसाठी राखीव असलेल्या वॉर्डात त्याच जातींच्या उमेदवारास उभे राहता येते. सर्वसाधारण वॉर्डात सर्वसाधारण उमेदवारास तसेच इतर जाती-जमातींच्या उमेदवारास उभे राहता येते. मात्र राखीव जागांवर विशिष्ट अटी पूर्ण करणारी व्यक्तीच उभी राहू शकते. महिला राखीव वॉर्डात केवळ महिलाच उभ्या राहू शकतात. मात्र सर्वसाधारण वॉर्डातही महिला उभ्या राहू शकतात.

उमेदवारी अर्ज कायद्याने ठरवून दिलेल्या नमुन्यात आणि व्यवस्थित भरलेला असणे आवश्यक आहे. अपूर्ण आणि खोटी माहिती असलेले अर्ज फेटाळले जातात. उमेदवारी अर्ज हा संबंधित निवडणूक अधिकाऱ्याकडे मोफत मिळतो. ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी सर्वसाधारण



उमेदवारास पाचशे रुपये तर राखीव जागांवरील उमेदवारास अडीचशे रुपये अनामत रक्कम भरावी लागते. ग्रामपंचायत निवडणूक झाल्यानंतर निवडून आलेल्या सदस्यांची यादी जिल्हाधिकारी प्रसिद्ध करतात.

**ग्रामपंचायत निवडणूक पद्धतीमधील काही महत्त्वपूर्ण बदल :**

ग्रामपंचायतीची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना आता यापुढे एकाच प्रभागातून निवडणूक लढविता येणार आहे. तशा आशयाचा आदेश राज्य निवडणूक आयोगाने दिला आहे.

राखीव जागेवर एखाद्या उमेदवाराने अर्ज भरून पुन्हा त्याने सर्वसाधारण जागेवर अर्ज दाखल केला असेल तर अशा उमेदवापराचा सुरूवातीचा म्हणजे पहिला उमेदवारी अर्ज ग्राह्य धरला जाणार असून, अन्य प्रवर्गातील उमेदवारी अर्ज आपोआपच बाद होणार आहे. त्याचप्रमाणे जर सर्वसाधारण जागेवर निवडणूक लढविणाऱ्याने जर दोन ठिकाणी अर्ज भरले असतील तर संबंधित उमेदवाराने प्रथम जो अर्ज दाखल केला असेल तोच अर्ज ग्राह्य धरण्यात येणार असून बाकी अर्ज बाद ठरविण्यात येणार आहेत असे स्पष्टपणे या आदेशात नमूद करण्यात आले आहे. हा बदल होण्याची दोन प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे :-

पहिले म्हणजे या नवीन बदलामुळे ग्रामपंचायतीचा वॉर्ड या छोट्या आकाराच्या मतदार संघातील निवडणूक उमेदवारांची भाऊगर्दी कमी होते. दुसरे म्हणजे एखादा उमेदवार दोन वॉर्डातून निवडून आला तर त्याने एका वार्डातून राजीनामा दिल्यानंतर पुन्हा नव्याने पोटनिवडणूक घेणे टाळता येते.

निवडणूक आयोगाने अर्ज दाखल करण्याच्या संख्येवरही मर्यादा घातली आहे. त्यानुसार आता एक उमेदवार एका जागेसाठी चार उमेदवारी अर्ज दाखल करू शकतो त्यापेक्षा जास्त अर्ज दाखल केल्यास त्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच तो अर्ज माघारीत धरला जाणार नाही. उमेदवाराने जर दोन प्रभागात अर्ज दाखल केले असतील तर ते सर्व अर्ज माघारीत धरले जाणार असल्याचे निवडणूक आयोगाच्या आदेशात म्हटले आहे.

**ग्रामपंचायत निवडणूकीसाठीच्या मतपत्रिका आता वेगवेगळ्या रंगात :** ग्रामपंचायत निवडणुकीसाठी निश्चित केलेल्या मतपत्रिकेच्या नमुन्यात उमेदवाराच्या आरक्षणाची वर्गवारी कोणतीही असली तरी अनुसूचित जाती/जमाती मागासवर्ग, महिला आणि सर्वसाधारण उमेदवारांसाठी एकच मतपत्रिका वापरली जायची. त्यामुळे मतदारांना उमेदवारांच्या आरक्षणाची वर्गवारी कळून येत नसे. ग्रामीण भागातील बराचसा समाज हा अजूनही अशिक्षित असल्यामुळे बाद मतांचे प्रमाणही मोठे असायचे. त्यामुळे मतदारांना आरक्षणाची वर्गवारी कळावी यासाठी निवडणूक आयोगाने मतपत्रिकेच्या स्वरुपात बदल केला आहे. त्यानुसार वेगवेगळ्या रंगात मतपत्रिका तयार केल्या आहेत.

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार अनुसूचित जातीच्या आरक्षित जागेसाठीच्या मतपत्रिकेचा रंग फिकट गुलाबी, अनुसूचित जमातीसाठी मतपत्रिका फिकट हिरव्या रंगाची तर

Scanned with OKEN Scanner

मागासप्रवर्गाच्या आरक्षित जागेसाठी फिकट पिवळ्या रंगाची मतपत्रिका असेल. सर्वसाधारण जागेसाठीच्या मतपत्रिका या पांढऱ्या रंगात असणार आहेत.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीमधील महिलांसाठी राखीव व मागास प्रवर्गामधील महिलांसाठी राखीव जागेकरीता तसेच सर्वसाधारण वर्गातील महिलांसाठी (खुला वर्ग) राखीव जागेसाठी त्या त्या वर्गानुसार निश्चित केलेल्या रंगाची मतपत्रिका असेल. अशावेळी महिलांसाठी राखीव असे ठळक अक्षरात मतपत्रिकेवर निश्चित केलेल्या जागी छापलेले असेल.

मतदान प्रक्रियेसाठी जर इलेक्ट्रॉनिक यंत्राचा वापर झाल्यास आरक्षित जागेनुसार असलेल्या विशिष्ट रंगातच मतदान यंत्रावर उमेदवारांची नावे असतील. इलेक्ट्रॉनिक यंत्रावर प्रथम अनुसूचित जाती (पुरुष), अनुसूचित जमाती (पुरुष), मागासप्रवर्ग पुरुष व सर्वसाधारण वर्ग (खुला वर्ग) पुरुष अशा क्रमाने व नंतर त्याच क्रमाने (आरक्षित जागेसाठीच्या) महिलांची नावे असतील.

अनुसूचित जातीसाठी गुलाबी, मागास प्रवर्गासाठी पिवळा तर सर्वसाधारण गटासाठी पांढऱ्या रंगाची मतपत्रिका मशिनवर असेल.

**ग्रामपंचायतीचा कार्यकाल :**

१९९२ पूर्वी भारतातील विविध घटकराज्यांमध्ये ग्रामपंचायतीच्या कार्यकालात भिन्नता होती. राजस्थान, ओरिसा व आंध्र प्रदेश राज्यांमध्ये ग्रामपंचायतीचा कार्यकाल ३ वर्षांचा होता. गुजरात, पश्चिम बंगाल व आसाम राज्यांत तो ४ वर्षांचा होता. महाराष्ट्र, केरळ, तामिळनाडू, पंजाब व मध्यप्रदेश या राज्यांमध्ये तो पाच वर्षांचा होता. १९९२ च्या ७३ व्या घटनादुरुस्तीनुसार देशातील सर्व राज्यांमध्ये ग्रामपंचायतीचा कार्यकाल पाच वर्षांचा करण्यात आला आहे.

ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर जिल्हाधिकाऱ्याने निश्चित केलेल्या दिवशी ग्रामपंचायतीच्या सर्व निर्वाचित सभासदांची एक सभा बोलावली जाते. ही सभा तहसीलदार किंवा त्याने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याकडून बोलावली जाते. या सभेस ग्रामपंचायतीची पहिली सभा म्हणतात. या सभेच्या दिवसापासून ग्रामपंचायतीचा पाच वर्षांचा कार्यकाल सुरू होतो. हा कार्यकाल संपण्यापूर्वी ग्रामपंचायत बरखास्त करण्याचा अधिकार राज्य सरकारला असतो; परंतु ग्रामपंचायत बरखास्त केलेल्या दिवसापासून सहा महिन्यांच्या आत नव्याने ग्रामपंचायतीच्या निवडणुका घेणे राज्य सरकारवर नवीन कायद्याने बंधनकारक आहे.

ग्रामपंचायत सभासदांचा कार्यकाल ग्रामपंचायतीच्या कार्यकालाएवढा म्हणजे पाच वर्षांचाच असतो. ग्रामपंचायतीच्या पहिल्या सभेपासून तो गणला जातो. ग्रामपंचायत सभासदांचा कार्यकाल पाच वर्षांचा असला तरी तो संपण्यापूर्वी सभासद स्वेच्छेने राजीनामा देऊ शकतात. ते आपला राजीनामा सरपंचाकडे लिखित स्वरूपात देत असतात. आपले कर्तव्य पालन न करणे, गैरवर्तणूक करणे अशा कारणासाठी ग्रामपंचायत सभासदाचे सभासदत्व रद्द होऊ शकते. तसे घडल्यास म्हणजे सभासदत्व रद्द झालेला सभासद पुढील पाच वर्षांसाठी ग्रामपंचायत सभासद होण्यास अपात्र समजला जातो.



**ग्रामपंचायतीचे पदाधिकारी व त्यांच्यासाठीचे आरक्षण :**

ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीत निवडून आलेल्या सभासदांची नावे जिल्हाधिकारी जाहीर करतो. या सर्व निर्वाचित सभासदांची पहिली सभा ग्रामपंचायत कार्यालयात तहसीलदार बोलावतो. ग्रामपंचायतीच्या पहिल्या सभेत ग्रामपंचायतीच्या दोन पदाधिकाऱ्यांची निवड केली जाते. ते म्हणजे सरपंच आणि उपसरपंच होय. सरपंच हा ग्रामपंचायतीचा राजकीय प्रमुख असतो. सरपंचपदासाठी आरक्षण असते तर उपसरपंचपद खुले असते. म्हणजे उपसरपंच पदासाठी आरक्षण नसते. सरपंच आणि उपसरपंच निवड बैठकीचा म्हणजे ग्रामपंचायतीच्या पहिल्या सभेचा अध्यक्ष तहसीलदार असतो. तोच सरपंच आणि उपसरपंचाचा निवडणूक कार्यक्रम जाहीर करून निर्वाचन अधिकारी म्हणून काम पाहतो.

सरपंच आणि उपसरपंचाची निवडणूक ग्रामपंचायतीच्या कार्यालयात आणि निर्वाचन अधिकाऱ्याने घोषित केलेल्या दिवशी दुपारी दोन वाजता होते. निवडणुकीच्या वेळेपूर्वी दोन तास अगोदर सरपंच आणि उपसरपंच दासाठी इच्छुक असणाऱ्या उमेदवारांना अर्ज करता येतो. आलेल्या अर्जांची छाननी करून निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नावे निर्वाचन अधिकारी वाचून दाखवतो. उमेदवारांना आपली उमेदवारी मागे घेण्याची संधी दिली जाते. यानंतर एकच उमेदवार राहिल्यास तो सरपंच म्हणून बिनविरोध निवडून आल्याचे घोषित केले जाते. एकापेक्षा जास्त उमेदवार असल्यास निवडणूक घेतली जाते. ही निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने होते. ग्रामपंचायतीचे सर्व निर्वाचित सदस्य सरपंच आणि उपसरपंचाला मतदान करतात. प्रथम सरपंचाची निवड होते आणि त्यानंतर उपसरपंचाची. या निवडणुकीत सरपंचपदासाठी विविध वर्गाला पुढीलप्रमाणे आरक्षण असते. म्हणजे सरपंचाचे पद ज्या वर्गातील जातीसाठी राखीव असेल त्याच वर्गातील उमेदवारास ते प्राप्त होऊ शकते.

**(१) अनुसूचित जाती–जमाती :** राज्याच्या एकूण लोकसंख्येत अनुसूचित जाती–जमातीचे प्रमाण जेवढे असेल त्या प्रमाणात त्यांना राखीव जागा दिल्या जातात. राज्यातील सरपंचाच्या एकूण पदसंख्येत जेवढी पदे अनुसूचित जाती–जमातींच्या लोकांसाठी राखीव ठेवली जातात त्यामध्ये एक तृतीयांश सरपंचाची पदे त्यांच्याच जातीतील महिलांसाठी राखीव ठेवली जातात. सरपंचपदासाठी हे आरक्षण सोडत म्हणजे लॉटरी पद्धतीने आणि आळीपाळीने सर्व ग्रामपंचायतींसाठी निश्चित केले जाते.

**(२) इतर मागास वर्ग :** महाराष्ट्रामध्ये ग्रामपंचायतींच्या सरपंचांची एकूण पदे जेवढी असतील त्यामध्ये २७ टक्के सरपंचाची पदे राज्यातील वास्तव्य करणाऱ्या अन्य मागासवर्ग प्रवर्गातील जातींच्या लोकांसाठी राखीव असतात. अशाप्रकारे राखीव ठेवण्यात आलेल्या सरपंचाच्या पदांमध्ये एक तृतीयांश पदे याच प्रवर्गातील जातींच्या महिलांसाठी राखीव असतात. सरपंच पदासाठीचे हे आरक्षण सोडत पद्धतीने आणि आळीपाळीने सर्व ग्रामपंचायतींसाठी निश्चित केले जाते.

Scanned with OKEN Scanner

(३) महिला वर्ग : राज्यातील सर्व महिलांसाठी राज्यांतील एकूण सरपंच पदसंख्येच्या एक तृतीयांश पदे राखीव असतात. यामध्ये अनुसूचित जातीतील महिला, अनुसूचित जमातीतील महिला, इतर मागासवर्ग प्रवर्गातील महिला आणि उर्वरित खुल्या सर्वसाधारण गटातील महिला यांचा समावेश होतो. म्हणजेच राज्यातील एकूण सरपंचाच्या पदांपैकी सर्व वर्गातील महिलांना एक तृतीयांशपेक्षा जास्त आरक्षण नसते.

**सरपंच आणि उपसरपंचाचा कार्यकाल व त्याचेवरील अविश्वास ठराव :**

सरपंच व उपसरपंचाचा कार्यकाल पाच वर्षांचा आहे. अविश्वासाचा ठराव, राजीनामा, मृत्यू इत्यादी कारणांमुळे सरपंचाचे पद रिक्त झाल्यास उर्वरित कालावधीसाठी सरपंचाची निवड केली जाते. उपसरपंचाच्या बाबतही अशीच प्रक्रिया असते.

ग्रामपंचायत सरपंच आणि उपसरपंचाचा कार्यकाल पाच वर्षांचा असला तरी हा कार्यकाल संपण्यापूर्वी ग्रामपंचायतीचे निर्वाचित सभासद त्यांच्यावर अविश्वासाचा ठराव मांडू शकतात. कायद्याने मिळालेल्या अधिकारांचा गैरवापर करणे, कर्तव्य पालन न करणे, ग्रामपंचायतीची बैठक न बोलावणे, ग्रामपंचायतीने संमत केलेल्या ठरावांची अंमलबजावणी न करणे अशा किंवा इतर कोणत्याही कारणांसाठी सरपंच व उपसरपंचावर अविश्वासाचा ठराव मांडण्याचा अधिकार १९५८ च्या मुंबई ग्रामपंचायत कायद्यातील कलम ३५ नुसार ग्रामपंचायत सभासदांना आहे.

ग्रामपंचायतीच्या एकूण निर्वाचित सभासदांपैकी एक तृतीयांश सभासदांनी सरपंच किंवा उपसरपंचावरील अविश्वास ठरावाची नोटीस स्वतःच्या सहीनुसार तहसीलदाराकडे द्यावी लागते. या ठरावाची नोटीस मिळाल्यापासून सात दिवसांच्या आत तहसीलदार ग्रामपंचायत सभासदांची विशेष सभा बोलावतात. या सभेचा अध्यक्ष तहसीलदार किंवा त्याने नियुक्त केलेला आधिकारी असतो. या बैठकीत अविश्वासाच्या ठरावावर चर्चा होते. एकूण ग्रामपंचायत सभासदांपैकी दोन तृतीयांश सभासदांनी हा ठराव संमत केल्यास सरपंच किंवा उपसरपंचाला राजीनामा द्यावा लागतो. हा ठराव फेटाळला गेल्यास त्या दिवसापासून बारा महिन्यापर्यंत सरपंच किंवा उपसरपंचावर अविश्वास ठराव मांडता येत नाही. सरपंचपदावर महिला असेल तर त्यांच्यावर अविश्वास ठराव पास होण्यासाठी ३/४ बहुमत आवश्यक असते.

गैरवर्तन, भ्रष्टाचार किंवा शासकीय आदेशांचे पालन न करणे अशा कोणत्याही कारणासाठी सरपंच आणि उपसरपंचाला पदावरून काढून टाकण्याचा अधिकार जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीला असतो; परंतु यापूर्वी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने सरपंच व उपसरपंच चौकशी करून त्यासंबंधीचा अहवाल स्थायी समितीकडे सादर करणे आवश्यक असते.

**ग्रामपंचायतीच्या सभा :**

ग्रामपंचायतीची सभा बोलावण्याचा अधिकार सरपंचाला असतो. सरपंचाच्या गैरहजेरीत उपसरपंच सभा बोलावू शकतो. ग्रामपंचायतीची दरमहा किमान एक सभा व्हावी लागते. आवश्यकता असल्यास जास्तीची सभा सरपंच बोलावू शकतो. ग्रामपंचायत सभेचा अध्यक्ष



सरपंच असतो. सरपंचाच्या गैरहजेरीत उपसरपंच ग्रामपंचायत सभेचे अध्यक्षपद भूषवितो. सरपंच आणि उपसरपंच दोघेही एकाच वेळी गैरहजर असतील आणि सभेची गणपूर्ती (कोरम) झालेली असेल तर प्रथम सभेला हजर असलेल्या सभासदांमधून एकाकडे सभेची सूत्रे सोपविण्याची वैधानिक तरतूद केली आहे. याशिवाय सरपंच आणि उपसरपंच यांच्या अनुपस्थितीत सभेची सूत्रे आपल्या हाती घेण्याचा अधिकार ग्रामसेवकाला मिळाला आहे.

**सरपंचाची कार्ये :**

सरपंच हा ग्रामपंचायतीचा कार्यकारी प्रमुख आहे. प्रमुख कार्ये पुढीलप्रमाणे आहेत.

(१) ग्रामपंचायतीची बैठक बोलावून तिचे अध्यक्षस्थान भूषविणे. (२) ग्रामपंचायतीच्या बैठकीतील कामकाजाचे स्वरूप निश्चित करणे व बैठकीचे नियमन करणे. (३) ग्रामपंचायतीचा अर्थ संकल्प तयार करून त्यास सभेची मान्यता मिळविणे. (४) ग्रामपंचायतीचे अधिकारी व नोकरवर्ग यांच्या कार्यावर देखरेख व नियंत्रण ठेवणे. (५) गावाच्या विकासासाठी योजना तयार करणे व त्याला सभेची मान्यता मिळविणे. (६) ग्रामपंचायत क्षेत्रातील नागरिकांकडून करांची वसूली करणे व त्यावर देखरेख ठेवणे. (७) ग्रामपंचायतींद्वारे होणाऱ्या सर्व व्यवहारासंबंधीच्या कागदपत्रावर सह्या करणे आणि ती कागदपत्रे सुरक्षित ठेवणे. (८) गावात शांतता टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करणे.

सरपंच्याच्या अनुपस्थितीत उपसरपंच ही सर्व कामे पाहतो.

**ग्रामपंचायतीचे अधिकारी व नोकरवर्ग :**

ग्रामसेवक हा ग्रामपंचायतीचा सचिव असतो. सरपंच व उपसरपंच यांच्या अनुपस्थितीत ग्रामपंचायतीचा सचिव अध्यक्षपद भूषवितो. तो जिल्हा परिषद सेवेतील वर्ग 'क' दर्जाचा कर्मचारी असतो. मोठ्या ग्रामपंचायतीत ग्रामसेवकास ग्रामविकास अधिकारी असे संबोधले जाते. **ग्रामसेवक** हा ग्रामपंचायत प्रशासनाचा प्रमुख असतो. तो ग्रामपंचायतीच्या कार्यालयीन प्रशासनासाठी जबाबदार असतो. ग्रामसेवकाची निवड ही जिल्हा निवड समितीमार्फत होते, तर त्याची नियुक्ती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करतो. त्याच्यावर प्रशासकीय दृष्टिकोनातून गटविकास अधिकारी तर राजकीय दृष्टिकोनातून सरपंच यांचे नियंत्रण असते.

**ग्रामसेवकाची ठळक कार्ये पुढीलप्रमाणे आहेत.**

(१) **वैधानिक अधिकारांचा वापर** : ग्रामसेवकास कायद्यानुसार सोपविण्यात आलेली जबाबदारी पार पाडावी लागते. कायदा हा त्याच्या अधिकार व कार्याचा मूळ आधार असतो.

(२) **सभांना उपस्थिती** : ग्रामसेवक ग्रामपंचायत व ग्रामसभांची पत्रे पाठवितो. तसेच तो या सभांना सचिव म्हणून उपस्थित राहतो. सभेतील कामकाजाची नोंद घेणे ही त्याची जबाबदारी असते.

(३) **माहिती मागविणे** : ग्रामपंचायतीत इतर कनिष्ठ कर्मचारी असल्यास त्यांच्याकडून माहिती, विवरण, हिशेब व अहवाल मागविण्याचा अधिकार ग्रामसेवकास असतो.

Scanned with OKEN Scanner

(४) **स्पष्टीकरण मागविणे :** ग्रामसेवक हा ग्रामपंचायत कामकाज व कार्यपद्धती याबाबतीत कनिष्ठ कर्मचारी आणि असल्यास ग्रामनोकर यांच्याकडून स्पष्टीकरण मागवू शकतो.

(५) **देखरेख व नियंत्रण :** ग्रामसेवक हा ग्रामपंचायत कामकाज व कर्मचारी यांच्यावर देखरेख व नियंत्रण ठेवतो. त्याच्या मार्गदर्शनाखाली इतर कर्मचारी कार्य करीत असतात.

(६) **विकास योजना :** राज्यशासनाने विकासविषयक कार्यक्रमांबाबत ग्रामपंचायतीवर सोपविलेली जबाबदारी आणि विकास योजनांची अंमलबजावणी करण्याच्या संदर्भात जिल्हा परिषद व पंचायत समितीने काढलेल्या आदेशांचे त्वरीत आणि प्रभावी पद्धती क्रियान्वय करण्यात ग्रामसेवकाची प्रमुख भूमिका असते.

(७) **कागदपत्रे व दस्तऐवज :** ग्रामसेवक हा ग्रामपंचायतीची कागदपत्रे व दस्तऐवज सांभाळतो. आलेल्या पत्रांना उत्तर देणे, हीही त्याची जबाबदारी असते.

(८) **वित्तीय अधिकार :** ग्रामपंचायतीचे अधिकोषातील (बँकेतील) मुख्य खाते हे संयुक्त असते. ते सरपंच आणि ग्रामसेवक यांचे मिळून असते. ग्रामपंचायतीसाठी इतरही योजनानिहाय खाते उघडावी लागतात. ग्रामसेवक हा सरपंचाच्या सल्ल्याने या निधीतून पैसे काढतो व त्याचे वितरण करतो.

(९) **हिशेब व अभिलेख :** ग्रामसेवक हा हिशेब व अभिलेख तपासण्याबाबतच्या नोंदी ठेवतो. तसेच ग्रामपंचायतीच्या खरेदी-विक्रीवर लक्ष ठेवतो. ग्रामपंचायतीचा हिशेब प्रतिमाह सरपंचास दाखविणे अनिवार्य असते.

(१०) **अर्थसंकल्प तयार करणे :** ग्रामसेवक हा ग्रामपंचायतीचा अर्थसंकल्प तयार करतो. ग्रामपंचायतीच्या अर्थसंकल्पातील अनियमितता व दोषासाठी ग्रामसेवकास जबाबदार धरले जाते.

(११) **नोंदणीविषयक कर्तव्य :** ग्रामपंचायत हद्दीतील जन्म, मृत्यू, विवाह इ. विषयक नोंदी ठेवणे ही ग्रामसेवकाची जबाबदारी असते.

अशाप्रकारे ग्रामसेवक हा ग्रामपंचायत प्रशासनातील महत्त्वाचा दुवा असतो. ग्रामपंचायतीचे तांत्रिक व विकासविषयक कार्ये पार पाडण्यामध्ये त्याची भूमिका महत्त्वाची असते. ग्रामपंचायतीच्या नियमबाह्य बाबी त्याच्यामुळे जिल्हा परिषदेला समजतात. अर्थात ग्रामपंचायतीत तो सचिव या भूमिकेबरोबरच तो जिल्हा परिषदेचा प्रतिनिधीही असतो.

**ग्रामपंचायतीची कार्ये व अधिकार :**

ग्रामपंचायत ही 'पंचायतराज' मधील महत्त्वपूर्ण संस्था असून तिच्याकडे या व्यवस्थेतील काही कार्ये सोपविण्यात येतात. ग्रामपंचायतीच्या कामाची ऐच्छिक आणि अनिवार्य अशा दोन भागात विभागणी करता येते. अनिवार्य कार्ये ही ग्रामपंचायतीला पार पाडावीच लागतात. ऐच्छिक कार्याबाबत तशी सक्ती करता येत नाही. ग्रामपंचायतीकडे अनिवार्य आणि ऐच्छिक या दोन्ही प्रकारांची खालील कामे सोपविण्यात आली आहेत.



(१) **कृषी :** शेती उत्पादनात वाढ करण्यासाठी जमीन सुधारणांची अंमलबजावणी करून धान्य कोठारांची निर्मिती करणे. कंपोस्ट खताची निर्मिती करणे तसेच पडीक जमीन लागवडीखाली आणून पिकांसंबंधी प्रयोग करणे. सुधारित बियाणांच्या उपयोग करण्याला प्रोत्साहन देणे. आधुनिक शेती अवजारांची व्यवस्था करणे आणि सुधारित शेती करण्यासाठी प्रोत्साहित करणे. ही सर्व कार्ये करण्याची जबाबदारी ग्राम पंचायतीची असते.

(२) **पशुसंवर्धन :** गावामधील पशुधनाची काळजी घेणे. संकरीत गुरांच्या पैदासीसाठी प्रयत्न करणे दुग्धोत्पादनास प्रोत्साहन देणे. जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय करणे. ही ग्रामपंचायतीची जबाबदारी होय.

(३) **समाजकल्याण :** दारूबंदीस प्रोत्साहन देणे. गावातील जुगार व अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी प्रयत्न करणे. महिला आणि बालकल्याणाच्या योजना लाभार्थींपर्यंत पोहोचविणे. ही सर्व ग्रामपंचायतीची कार्ये आहेत.

(४) **शिक्षण :** प्राथमिक तसेच माध्यमिक शिक्षणाची सोय करणे. ग्रामशिक्षण समितीद्वारे गावाचा शैक्षणिक विकास साधणे ही ग्रामपंचायतीची जबाबदारी असे.

(५) **आरोग्य :** गावाच्या आरोग्याची जबाबदारी ग्रामपंचायतीवर आहे. सार्वजनिक विहीरी, गटारे, तसेच गावाचा परिसर स्वच्छ ठेवून साथींच्या रोगांना आळा घालणे. शासनाच्या आरोग्य विषयक योजना गावपातळीवर राबविणे. उदा. लसीकरण, सार्वजनिक स्वच्छतागृहांची उभारणी, प्रसूती आणि बालसंगोपनाबाबत उपाय योजना करणे. गावातील जनतेस शुद्ध पाणीपुरवठा करणे. स्मशान भूमीच्या जागेची व्यवस्था करणे. ही सर्व कार्ये ग्रामपंचायतीद्वारे पार पाडली जातात.

(६) **रस्ते बांधणी :** गावातील रस्ते, पूल, साकव यांची बांधकामे करून दळणवळणाची सोय करणे, तसेच सांडपाणी वाहून नेणारी गटारे, सार्वजनिक बगिचे, क्रीडांगणे, ग्रामसचिवालये आदींची बांधकामे करणे. ही सर्व ग्रामपंचायती कार्ये होय.

(७) **ग्रामोद्योग आणि सहकार :** ग्रामोद्योगांना प्रोत्साहन देऊन स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे तसेच त्या उद्योगांचे संवर्धन करणे. गावात विविध प्रकारच्या सहकारी सोसायट्या, पतपेढी यांची स्थापना करण्यासाठी पुढाकार घेणे.

(८) **प्रशासन :** ग्रामपंचायत ही त्रिस्तरीय शासनव्यवस्थेतील सर्वात शेवटची कडी होय. गावामधील ग्रामपंचायतीनंतर वा ग्रामपंचायतीच्या खाली शासकीय यंत्रणेचा कोणताही स्तर नाही. यामुळे गावामधील शासनाची सर्व प्रशासनाविषयक कार्ये ग्रामपंचायतीलाच करावी लागतात. उदा. जमीन महसूलाबाबतची कागदपत्रे अद्यायावत करणे, गावातील सार्वजनिक मालमत्तांची उदा. रस्ते, ओढे, नाले, विहीरी, सार्वजनिक जागा, धर्मशाळा, शाळांच्या इमारती, स्मशानभूमी आदींची नोंद ठेवणे. जिल्हा परिषदेने वर्ग केलेल्या मालमत्तेची नोंदणी ग्रामपंचायतीला करावी लागते. तसेच गावाच्या हद्दीत बांधण्यात आलेल्या घरांची नोंद ठेवावी लागते. कोंडवाडा,

Scanned with OKEN Scanner

वाहनतळ, बाजार, जत्रा यांचे व्यवस्थापन ठेवणे हे काम पंचायतीस पार पाडावे लागते. गावातील जन्म, मृत्यू आणि विवाहाची अद्यायावत नोंद ठेवणे हे ग्रामपंचायतीचे परम कर्तव्य आहे. तसेच पंचायतीला वेळोवेळी मिळालेल्या बक्षिसाची नोंद, शासनाचे आदेश, विविध दस्तऐवजांची नोंद तसेच गावातील अतिक्रमणे हटविण्याचे कामही प्रशासनास करावे लागते. तसेच बांधकामांवर नियंत्रण ठेवावे लागते.

नागरी भागात नगरपालिका अथवा महानगरपालिका यांचेवर स्थानिक रहिवाशांना सेवासुविधा पुरविण्याची जी जबाबदारी आहे तीच जबाबदारी ग्रामस्थांना मूलभूत व जीवनावश्यक सेवासुविधा पुरविण्याबाबत ग्रामपंचायतींची आहे. सर्व ग्रामीण आणि नागरी स्वशासन संस्थांजवळ असणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या या दृष्टीने तुलना केली तर सर्वात कमी कर्मचारी ग्रामपंचायतींजवळ आहे. सर्व स्थानिक स्वशासन संस्थामध्ये आर्थिक व्यवहाराची एकूण उलाढाल या दृष्टीने सर्वात लहान अर्थसंकल्प (बजेट) ग्रामपंचायतींचा आहे. यामुळेच ग्रामपंचायती ग्रामस्थांना अनेक मूलभूत स्वरूपाच्या सेवासुविधा देऊ शकत नाहीत.

**पंचायतराज योजनेत ग्रामपंचायतीचे स्थान व महत्त्व :**

सत्ता, अधिकार आणि आर्थिक स्थिती या तीनही दृष्टीने ग्रामपंचायतीपेक्षा जिल्हा परिषद आणि पंचायत समिती या दोन्ही संस्था निःसंशयपणे सुस्थितीत आहेत. म्हणून पंचायतराज योजनेत ग्रामपंचायतींचे स्थान दुय्यम आहे असे म्हणतात येत नाही. कारण ग्रामपंचायती कार्यक्षमतेने चालल्या तरच पंचायतराज योजना यशस्वी होऊ शकते. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद यांच्यावर सोपविण्यात आलेल्या एकूण विषयांची संख्या आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांची संख्या या दृष्टीने तुलना केली तर या संदर्भात दिसून येणारे वास्तव (reality) पुढीलप्रमाणे आहे.

७३ राव्या घटनादुरुस्तीनुसार २९ विषयांची जबाबदारी जिल्हा परिषदेवर सोपविण्यात आली आहे. यापैकी केवळ १८ विषयांची जबाबदारी जि.प. कडे सोपविण्याबाबत महाराष्ट्र विधिमंडळाने विधिनियम केला आहे. पंचायत समितीवर २८ विषयांची आणि ग्रामपंचायतीवर ३१ विषयांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. सर्वात कमी संख्येतील सनदी सेवक वर्ग ग्रामपंचापयतीकडे आहे. त्यातही सामान्यपणे तो गावात राहत नाही. आजुबाजूच्या शहरात राहून खेड्यामध्ये नोकरीसाठी येणेजाणे करतो. गावकऱ्यांना त्यांच्या गरजेच्या वेळी सनदी सेवक वर्ग उपलब्ध होत नाही. ज्या सेवासुविधा ग्रामपंचायतीद्वारे ग्रामस्थांना पुरविल्या जातात, त्यांचा दर्जा अत्यंत सुमार आहे. चांगल्या सेवासुविधा आपल्याही ग्रामपंचायतींकडून मिळाव्या अशी अपेक्षा ग्रामस्थांमध्ये निर्माण झालेली आहे. हा दूरदर्शनचा प्रभाव देखील असू शकतो. त्यांच्या अपेक्षांची पूर्ती न होण्याचा परिणाम ते शहरांमध्ये स्थलांतरीत होण्याची प्रक्रिया गतिमान होण्यावर झाला आहे. शहरांची आणि शहरांमधील झोपडपट्टींची बेसुमार वाढ थांबविण्यासाठी ग्रामस्थांना ग्रामपंचायतींकडून मिळणाऱ्या सेवासुविधांचा दर्जा सुधारणे ही २१व्या शतकातील भारताची गरज आहे.



## (२) पंचायत समिती
## (Panchayat Samiti)

पंचायत समिती हा त्रिस्तरीय पंचायतराज व्यस्थेतील मधला स्तर आहे. पंचायत समितीचे कार्यक्षेत्र जिल्हा परिषदेसारखे मोठे वा विशाल नाही. तसेच ते ग्रामपंचायतीसारखे एखाद्या विशिष्ट गावापुरतेही मर्यादितही नाही. तालुका किंवा विकास गट या स्तरावर कार्य करणारी पंचायतराज संस्था म्हणजे पंचायत समिती होय. ग्रामस्तरावरील ग्रामपंचायत आणि जिल्हा स्तरावरील जिल्हा परिषद या दोन संस्थांना जोडणारा दुवा म्हणून पंचायत समिती ओळखली जाते.

**स्थापना :** अनेक घटकराज्यांमध्ये पंचायत समिती ही पंचायतराज संस्था असली तरीही ती विभिन्न घटकराज्यात वेगवेगळ्या नावाने संबोधिली जाते. उदा. उत्तरप्रदेशात क्षेत्रसमिती, मध्यप्रदेशात जनपद पंचायत, केरळमध्ये ब्लॉक पंचायत, गुजरातमध्ये तालुका परिषद, तामिळनाडूमध्ये पंचायत युनियन कौन्सिल, तर अरूणाचल प्रदेशात अंचल समिती या नावाने ती सबोधिली जाते. संपूर्ण भारतात विकास गट वा तालुका या स्तरावर कार्यरत असणाऱ्या ६०९६ पंचायत समित्या आहेत. महाराष्ट्रात ३५४ तालुके असले तरीही एकूण पंचायत समित्या ३४९ आहेत. पुणे, नागपूर, ठाणे व उल्हासनगर हे चार तालुके पूर्णतः शहरी असल्यामुळे तेथे पंचायत समित्या स्थापन केल्या नाहीत.

**पंचायत समितीची रचना :**

पंचायत समितीमध्ये खालीलप्रमाणे चार प्रकारचे सदस्य असू शकतात.

(१) प्राथमिक सदस्य (Primary members)
(२) सहयोगी सदस्य (Associate members)
(३) स्वीकृत सदस्य (Co-opted members)
(४) पदसिद्ध सदस्य (Ex-officio members)

प्रत्येक घटकराज्यात पंचायत समितीच्या रचनेचा आराखडा हा त्या त्या घटकराज्याच्या विधिमंडळाद्वारे निश्चित केला जातो. उदा. पंजाब राज्यातील पंचायत समितीमध्ये पुढील चार प्रकारचे सदस्य आहेत.

(१) जनप्रतिनिधी म्हणजे प्रत्यक्ष जनतेद्वारे निर्वाचित सदस्य
(२) ग्रामपंचायतींच्या सरपंचाचे प्रतिनिधी
(३) त्या त्या क्षेत्रातील विधानसभा सदस्य
(४) त्या त्या क्षेत्रातील विधान परिषद सदस्य

महाराष्ट्र राज्यात 'महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम १९६१' नुसार पंचायत समितीची रचना पुढीलप्रमाणे केली जाते.

पंचायत समितीत प्रत्यक्ष पद्धतीने सदस्य निवडले जातात. पंचायत समितीसाठीचा मतदारसंघ हा जिल्हा परिषदेसाठीच्या मतदारसंघापेक्षा अर्ध्याने (निम्म्याने) लहान असतो. जिल्हा परिषदेसाठीच्या एका मतदारसंघाचे दोन समान भागात विभाजन केले की पंचायत समितीचे दोन

Scanned with OKEN Scanner

मतदारसंघ निर्माण होतात. पंचायत समितीच्या रचनेचे तेच आधारभूत तत्त्व आहे. कोणत्याही पंचायत समितीची एकूण सदस्यसंख्या ही त्या भागात वा क्षेत्रात जिल्हा परिषदेचे किती मतदारसंघ आहेत यावर अवलंबून असते. महाराष्ट्रात सुमारे १७५०० ते २०००० लोकांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी पंचायत समितीचा एक मतदारसंघ निर्माण केला जातो. गटविकास अधिकारी (Block Development Officer) हा पंचायत समितीचा पदसिद्ध सदस्य असतो.

**पंचायत समितीच्या सदस्यत्वासाठीच्या पात्रता व अटी :**

(१) उमेदवार हा भारताचा नागरिक असावा.

(२) त्याचे वय २१ वर्षे पूर्ण असावे.

(३) पंचायत समितीच्या मतदार यादीत त्याचे नाव असावे.

(४) अशी व्यक्ती शासकीय सेवेत पगारदार नसावी.

(५) ती व्यक्ती दिवाळखोर किंवा वेडी असू नये.

(६) पंचायत समितीच्या व्यवहारात आर्थिक हितसंबंध असणारी व्यक्ती अपात्र असेल.

(७) न्यायालयाने सर्वसाधारण किंवा अस्पृश्यता कायद्याखाली विहित तरतुदीनुसार शिक्षा ठोठावल्यास अशा व्यक्तीस शिक्षा होऊन संपूर्ण पाच (५) वर्षे लोटले नसतील, तर ती व्यक्ती अपात्र असेल.

(८) दिनांक १२ सप्टेंबर, २००१ नंतर तिसरे अपत्य झाल्यास अशी व्यक्ती अपात्र असेल.

(९) राज्य विधिमंडळाच्या निवडणुकींसाठी निश्चित केलेल्या इतर सर्व अटी पंचायत समितीस निवडणुकीसाठी लागू असतील.

**पंचायत समितीतील आरक्षण :**

पंचायत समितीतील पदाधिकाऱ्यांचे आरक्षण निश्चित करताना जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांची संख्या गृहीत धरली जाते. परंतु पंचायत समिती सदस्यांचे आरक्षण निश्चित करताना केवळ त्या पंचायत समिती क्षेत्राचाच विचार केला जातो. पंचायत समितीमध्ये खालीलप्रमाणे सदस्यांचे आरक्षण दिले जाते.

(१) अनुसूचित जाती (SC) व अनुसूचित जमाती (ST) साठी लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण दिले जाते. या आरक्षणापैकी १/३ पेक्षा कमी नाही इतके आरक्षण त्याच प्रवर्गातील महिलांसाठी असते.

(२) अन्य मागासवर्ग (OBC) साठी २७ टक्के आरक्षण दिले जाते. या आरक्षणापैकी १/३ पेक्षा कमी नाही इतके आरक्षण त्याच प्रवर्गातील महिलांसाठी असेल.

(३) **महिला वर्ग :** पंचायत समितीतील एकूण पदांच्या (संख्येच्या) १/३ पेक्षा कमी नाही इतके आरक्षण सर्वसाधारण महिलांसाठी असते. म्हणजे ३३ टक्के जागा महिलांसाठी राखीव असतात.



**निवडणूक पद्धती व निवडणूक यंत्रणा :**

पंचायत समितीच्या सर्व सदस्यांची निवड पंचायत समिती मतदारसंघात राहणाऱ्या आणि १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या सर्व स्त्री पुरुष प्रौढ नागरिकांकडून होते. निवडणुकीत सहभागी होण्यासाठी त्याचे नाव त्या मतदारसंघाच्या मतदार यादीमध्ये असणे आवश्यक असते. पंचायत समितीची निवडणूक लढविण्यासाठी सर्वसाधारण उमेदवारास ७५० रुपये आणि राखीव जागेवरील उमेदवारास ५०० रुपये अनामत रक्कम म्हणून भरणे आवश्यक असते.

राज्य निवडणूक आयोगावरच पंचायत समितीसाठीच्या निवडणुकीचे संचालन करण्याची जबाबदारी असते. राज्य निवडणूक आयोगाद्वारे जिल्हा व तालुका स्तरावर निवडणूक यंत्रणा तयार केली जाते व त्या यंत्रणेद्वारे पंचायत समितीसाठीच्या निवडणुकीचे नियंत्रण व संचालन केले जाते. सामान्यपणे तालुका स्तरावरील निवडणूक यंत्रणेचा प्रमुख असणारा तहसिलदारावर पंचायत समितीच्या निवडणुकीची जबाबदारी असते.

**पंचायत समितीचा कार्यकाल :**

पंचायत समितीचा कार्यकाल पाच वर्षाचा आहे. हा कार्यकाल सार्वत्रिक निवडणुकीनंतर होणाऱ्या पंचायत समितीच्या पहिल्या सभेपासून गणला जातो. पंचायत समितीचा कार्यकाल पाच वर्षांचा असला तरी पंचायत समिती कायद्यातील तरतुदी व शासनाच्या आदेशाचे उल्लंघन यासारख्या गंभीर कारणासाठी राज्य सरकार पंचायत समिती बरखास्त करू शकते. परंतु पंचायत समिती बरखास्त केल्यानंतर सहा महिन्यांच्या आत पंचायत समितीच्या नव्याने निवडणुका घेणे राज्यशासनावर बंधनकारक आहे.

पंचायत समितीप्रमाणेच पंचायत समितीच्या सर्व सदस्यांचा कार्यकाल पाच वर्षांचा आहे. परंतु आपला कार्यकाल संपण्यापूर्वीच स्वेच्छेने राजीनामा देऊन ते पदमुक्त होऊ शकतात. सदस्य आपला राजीनामा सभापतीकडे देत असतात. पंचायत समितीचा एखादा सदस्य पंचायत समितीच्या परवानगीशिवाय सतत सहा महिने पंचायत समितीच्या सभांना गैरहजर असेल तर त्याचे सभासदत्व रद्द होते. तसेच एखाद्या सदस्याने गैरवर्तन, भ्रष्टाचार, कर्तव्यपालनात कसूर केला असेल तर अशा सदस्याला पदावरून काढण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे.

**पदाधिकारी व त्यांचेसाठीचे आरक्षण :**

पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर जिल्हाधिकाऱ्यांकडून किंवा त्याने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याकडून पंचायत समितीची पहिली सभा बोलावली जाते. या सभेत पंचायत समितीचे निर्वाचित सदस्य आपल्यापैकी एकाची सभापती म्हणून तर दुसऱ्या एकाची उपसभापती म्हणून निवड करतात. ही निवड प्रत्यक्ष गुप्त मतदान पद्धतीनुसार होते. सभापती किंवा उपसभापतींच्या निवडणुकीत उमेदवारांना समान मते पडल्यास सभेचा अध्यक्ष असणारा निर्वाचन अधिकारी चिठ्ठ्या टाकून निर्णय देतो.

Scanned with OKEN Scanner

**सभापतीपदासाठी राखीव जागा :**

पंचायत समितीच्या उपसभापतीपदासाठी आरक्षण नसते. सभापतीपदासाठी विशि वर्गांसाठी पुढीलप्रमाणे आरक्षण असते.

(१) **अनुसूचित जाती–जमाती वर्ग :** राज्यातील एकूण लोकसंख्येमध्ये अनुसूचि जाती–जमातीची लोकसंख्या विचारात घेऊन त्यानुसार सभापतीची काही पदे या वर्गासाठी राखीव ठेवण्यात येतात. अनुसूचित जाती–जमातीसाठी राखीव ठेवलेल्या सभापतीपदापैकी १/३ पदे या वर्गातील महिलांसाठी राखीव असतात.

(२) **इतर मागासवर्ग :** राज्यातील एकूण पंचायत समिती सभापतीपदांपैकी २७ टक्के पदे इतर मागासवर्गातील लोकांसाठी राखीव असतात. या २७ टक्के पदांपैकी १/३ पदे या प्रवर्गातील महिलांसाठी राखीव असतात.

(३) **महिला वर्ग :** राज्यातील पंचायत समित्यांच्या एकूण सभापतीपदांपैकी १/३ पदे महिलांसाठी राखीव असतात. यामध्ये अनुसूचित जाती–जमाती, इतर मागासवर्ग आणि खुल्या गटातील सर्व महिलांचा समावेश होतो. म्हणजेच सभापतींच्या एकूण पदांपैकी सर्व वर्गातील महिलांना मिळून १/३ पेक्षा जास्त पदे राखीव नसतात.

राज्यातील पंचायत समित्यांमध्ये सभापतीपदासाठी असणारे आरक्षण राज्य निर्वाचन आयोग आळीपाळीने सर्व पंचायत समित्यांना लागू करीत असतो.

**सभापती व उपसभापतीचा कार्यकाल आणि त्यांचेवरील अविश्वासाचा ठराव :**

पंचायत समितीच्या सभापती आणि उपसभापतीचा कार्यकाल निश्चित करण्याचा अधिकार राज्य सरकारला असतो. सध्या सभापती आणि उपसभापतीचा कार्यकाल अडीच वर्षांचा आहे. त्यांनी पद धारण केल्या दिवसापासून तो गणला जातो.

आपला कार्यकाल संपण्यापूर्वीच उपसभापती सभापतीकडे तर सभापती जिल्हा परिषद अध्यक्षाकडे लेखी स्वरूपात राजीनामा देऊ शकतो. तसेच पंचायत समितीचे निर्वाचित सदस्य सभापती व उपसभापतीवर अविश्वास ठराव संमत करून त्यांना पदावरून दूर करू शकतात. यासाठी एकूण निर्वाचित सदस्यांपैकी १/३ सदस्यांना जिल्हाधिकाऱ्यांकडे सभापती व उपसभापतीविरुद्ध अविश्वास ठराव मांडण्याची मागणी करावी लागते. यानंतर जिल्हाधिकारी पंचायत समितीची विशेष सभा बोलावतो. या सभेत अविश्वास ठरावावर चर्चा होते. एकूण निर्वाचित सदस्यांच्या २/३ सदस्यांनी बहुमताने हा ठराव संमत केल्यास सभापती व उपसभापतीला पदत्याग करावा लागतो. या पदावर महिला असेल तर अविश्वासाचा ठराव मंजूर करण्यासाठी ३/४ बहुमत आवश्यक असते.

सभापती व उपसभापती पंचायत समितीच्या परवानगीशिवाय सतत ३० दिवस गैरहजर असतील तर त्यांचे पद रिक्त होते. तसेच गैरवर्तणूक, भ्रष्टाचार, कर्तव्यपालनात केलेली कसूर अशा कोणत्याही कारणासाठी त्यांना पदावरून काढण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे.



पदावरून काढलेले सभापती व उपसभापती उर्वरित काळात परत या पदावर निवडणूक लढविण्यासाठी अपात्र मानले जातात.

**पंचायत समितीच्या सभा :**

(१) **सर्वसाधारण सभा (प्रथम सभा) :** पंचायत समितीच्या सभापती आणि उपसभापतींच्या निवडीसाठी निवडणुकीनंतर प्रथम सर्वसाधारण सभा बोलविली जाते. ही सभा जिल्हाधिकारी वा त्याने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली घेतली जाते. सदर बैठकीसाठी १० (दहा) दिवसांची नोटीस देणे आवश्यक असते. पंचायत समितीतील या व इतर सर्व प्रकारच्या सर्वसाधारण सभेसाठी एकूण सदस्यसंख्येच्या १/३ सदस्यसंख्या गणपूर्तीसाठी आवश्यक असते.

(२) **सर्वसाधारण सभा (नियमित) :** पंचायत समितीची महिन्यातून एकदा सभा घेणे बंधनकारक असते. म्हणजेच एका वर्षात १२(बारा) सभा घेतल्या जातात. या सभांच्या अध्यक्षस्थानी पंचायत समिती सभापती असतो व त्याच्या अनुपस्थितीत उपसभापती त्याचा कार्यभार सांभाळतो. सर्वप्रकारच्या सर्वसाधारण सभांसाठी गट विकास अधिकारी हा सचिव म्हणून कार्यरत असतो. या सभेसाठी सदस्यांना किमान १० (दहा) दिवस अगोदर नोटीस द्यावी लागते.

(३) **विशेष सर्वसाधारण सभा :** एकूण सभासदांच्या १/५ पेक्षा कमी नाही इतक्या सभासदांनी लेखी विनंती केल्यास पंचायत समितीचे सभापती विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करू शकतात. या बैठकांची नोटीस किमान ७ दिवस अगोदर द्यावी लागते. सभेच्या अध्यक्षस्थानी पंचायत समितीचा सभापती असतो. मात्र, अशी सभा सभापतीवरील अविश्वास ठरावासाठी असल्यास जिल्हाधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली सभा घेतली जाते.

(४) **सरपंच परिषद :** तालुक्यातील ग्रामपंचायतींशी योग्य समन्वय राहावा, यासाठी पंचायत समितीत सरपंच परिषदेची स्थापना केली जाते. फिरत्या पद्धतीने सरपंच परिषदेत १/५ सरपंचाची निवड एका वर्षासाठी केली जाते. उपसभापती हा सरपंच परिषदेचा पदसिद्ध अध्यक्ष असतो, तर ग्राम विस्तार अधिकारी सचिव असतो. प्रत्येक वर्षी सरपंच परिषदेचे नव्याने गठण केले जाते.

(५) **आमसभा :** पंचायत समितीच्या कामकाजाचा आणि विकास कार्याचा वार्षिक आढावा घेण्यासाठी प्रत्येक वर्षी आमसभा घेतली जाते. आमसभा ही पंचायत समितीच्या सभापतीद्वारे बोलविली जाते. या आमसभेत पंचायत समितीचे पदाधिकारी, ग्रामसेवक, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, प्राध्यापक यांनाही निमंत्रित केले जाते. आमसभेचा अध्यक्ष त्या क्षेत्रातील आमदार असतो, तर सचिव तहसीलदार असतो. पंचायत समितीने आपली आमसभा जिल्हा परिषदेच्या आमसभेपूर्वी एक महिना अगोदर घ्यावी व आमसभेत घेतलेले निर्णय व सूचना जिल्हा परिषदेला कळविणे आवश्यक असते.

Scanned with OKEN Scanner

**सभापतीचे अधिकार व कार्ये :**

(१) पंचायत समितीच्या सभा बोलावून सभांचे अध्यक्षस्थान भूषविणे आणि सभांच्या कामकाजाचे नियमन व नियंत्रण करणे.

(२) पंचायत समितीच्या सभेत पारित झालेल्या ठरावांची अंमलबजावणी गटविकास अधिकाऱ्याकडून करवून घेणे.

(३) पंचायत समितीचे दप्तर (अभिलेख) व हिशेब पाहणे.

(४) पंचायत समितीच्या अधिकाऱ्याकडून त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामकाजाची माहिती मागविणे.

(५) पंचायत समितीद्वारे पंचायत क्षेत्रात हाती घेतलेल्या कामांना भेटी देणे व त्यांची पाहणी करणे.

(६) पंचायत समितीच्या क्षेत्रात जिल्हा परिषदेने सुरू केलेल्या कामाचे पर्यवेक्षण करणे.

(७) पंचायत समिती क्षेत्रातील लोकांकडून आलेल्या तक्रारींची दखल घेणे आणि गटविकास अधिकाऱ्यामार्फत त्या दूर करणे.

(८) पंचायत समितीद्वारे हाती घ्यावयाची विकासकामे व योजनांबाबत शासनाने दिलेल्या आदेशांचे पालन करणे.

(९) पंचायत समितीच्या हितासाठी खाजगी मालमत्ता संपादन करणे अथवा पंचायत समितीच्या मालमत्तेचा लिलाव करणे.

(१०) शासकीय अनुदानातून हाती घ्यावयाच्या विकासकामासंबंधी शासकीय नियम व मार्गदर्शक तरतुदींचे पालन करणे.

सभापतीच्या गैरहजेरीत त्याचे कामकाज उपसभापती सांभाळतो.

**पंचायत समितीचा अधिकारी – गटविकास अधिकारी :**

पंचायत समितीच्या प्रशासकीय कार्याची जबाबदारी सांभाळणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यास गटविकास अधिकारी म्हणतात. तो पंचायत समितीचा कार्यकारी प्रमुख म्हणून ओळखला जातो. महाराष्ट्रात गटविकास अधिकाऱ्याची निवड दोन पद्धतीने केली जाते. यामधील पहिली पद्धती म्हणजे गटविकास अधिकाऱ्याची काही पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे होणाऱ्या स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून भरली जातात दुसरी पद्धती म्हणजे काही पदे पंचायत समितीअंतर्गत कार्य करणाऱ्या विस्तार अधिकाऱ्यांना पदोन्नती देऊन भरली जातात. गटविकास अधिकाऱ्याची नेमणूक करण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे. ज्या पंचायत समितीच्या विकास गटाची लोकसंख्या एक लाखापेक्षा कमी आहे त्या पंचायत समितीमध्ये वर्ग–२ चा राजपत्रित अधिकारी गटविकास अधिकारी म्हणून काम पाहतो. एक लाखापेक्षा अधिक लोकसंख्या असणाऱ्या विकास गटातील पंचायत समितीसाठी वर्ग–१ चा राजपत्रित अधिकारी गटविकास अधिकारी म्हणून काम पाहतो.



**गटविकास अधिकाऱ्याचे अधिकार व कार्ये :**

गटविकास अधिकाऱ्याला पुढील प्रकारची कार्ये करावी लागतात-

(१) पंचायत समितीने पारित केलेल्या ठरावांची अंमलबजावणी करणे.

(२) गटपातळीवर विस्तार अधिकाऱ्यांच्या सहकार्याने विकास प्रशासनाची जबाबदारी पार पाडणे.

(३) पंचायत समितीच्या बैठकीला उपस्थित राहणे व बैठकीत झालेल्या निर्णयांची नोंद घेणे.

(४) पंचायत समितीतील वर्ग - ३ आणि वर्ग - ४ च्या कर्मचाऱ्यांची अनुपस्थिती रजा मंजूर करणे.

(५) पंचायत समितीत कार्य करणाऱ्या अधिकाऱ्याकडून त्यांच्या कामाची माहिती, तक्ते, अहवाल व वित्तीय लेखा मागविणे.

(६) पंचायत समितीचा पदसिद्ध सचिव म्हणून पंचायत समितीचे सर्व कागदपत्रे, दस्तऐवज आपल्या ताब्यात ठेवणे.

(७) पंचायत समितीसाठी मंजूर झालेल्या अनुदानामधून विकास कार्यावर पैसा खर्च करणे.

(८) पंचायत समितीतील प्रशासकीय कर्मचाऱ्यांच्या कार्यांचे पर्यवेक्षण करणे, त्यांच्यावर देखरेख व नियंत्रण ठेवणे.

(९) पंचायत समितीच्या बैठकीत होणाऱ्या चर्चेत सहभाग घेणे; परंतु ठरावावर होणाऱ्या मतदानात भाग न घेणे.

(१०) शासनाच्या आदेशाप्रमाणे पंचायत समितीसाठी खाजगी जमीन मालमत्ता संपादन करणे किंवा पंचायत समितीची मालमत्ता विक्री करणे.

(११) पंचायत समितीच्या कार्याचा अहवाल वेळोवेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास पाठविणे.

**पंचायत समितीची कार्ये व अधिकार :**

**(१) कृषी :** खरीप आणि रब्बी पिकांच्या मोहिमा यशस्वी करून सुधारित शेती पद्धतीला प्रोत्साहन देणे. सुधारीत शेतीपद्धतीचे प्रात्याक्षिक करून तिचा प्रचार आणि प्रसार करणे. शेतीच्या आधुनिक अवजारांचा प्रसार करणे, बियाणे, शेती अवजारे, रासायनिक खते, यांचे वाटप करून आधुनिक शेतीस प्रोत्साहन देणे. शेतीमालाच्या साठवणुकीसाठी गोदामे बांधणे, फळे, भाज्या यांच्या उत्पादनासाठी प्रोत्साहन देणे.

थोडक्यात शासनाच्या कृषीविषयक विविध योजना या पंचायत समितीमार्फतच राबविल्या जातात.

**(२) पशुसंवर्धन :** गावांमध्ये पशु वैद्यकीय केंद्र उभारणे, संकरीत जनावरांचा प्रसार करणे, दुग्धव्यवसायास तसेच शेळी, मेंढी पालन यांस प्रोत्साहन देणे. स्वयंरोजगार योजनेंतर्गत

Scanned with OKEN Scanner

लाभार्थ्यांची शिफारस पशुसंवर्धन खात्यास करणे. जनावरांची प्रदर्शने भरविणे. आरोग्य केंद्राची व्यवस्था करणे. संकरीत जनावरांच्या पैदाशीसाठी प्रयत्न करणे.

(३) आरोग्य : ग्रामीण भागात वैद्यकीय सहाय्य केंद्र सुरू करणे. साथीच्या रोगांना आळा घालणे. वैद्यकीय बाबींचा प्रचार करणे. आरोग्य विषयक शासनाच्या विविध योजना राबविणे. प्रसुती-शिशू कल्याण केंद्राची सोय करणे. औषध पुरवठा करणे. ही सर्व कार्ये पंचायत समितीला पार पाडावी लागतात.

(४) बांधकाम : ग्रामीण पाणी पुरवठा योजना राबविणे. ग्रामीण भागात रस्ते बांधणी करून त्याची देखभाल करणे. पूल, साकव बांधणे. त्या क्षेत्रातील शासकीय कार्यालयाच्या इमारतींचे बांधकाम करणे.

(५) शिक्षण : प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी पंचायत समितीवर आहे. शाळेच्या इमारती, शैक्षणिक साहित्य, क्रीडांगणाची सोय करणे, साक्षरता प्रचाराचे कार्यक्रम राबविणे, प्रौढशिक्षण योजना कार्यान्वित करणे. इत्यादी शिक्षणविषयक कार्ये पंचायत समिती करते.

(६) सहकार : सहकारी चळवळीची वाढ करून तिच्या विकासासाठी प्रयत्न करणे, विविध प्रकारच्या सहकारी समित्या स्थापन करण्यास प्रोत्साहन देणे. सामूहिक विकासाचा कार्यक्रम राबविणे.

(७) समाजकल्याण : मागासवर्गियांचा आर्थिक व शैक्षणिक विकास करणे. त्यांचा आर्थिक विकास होण्यासाठी त्यांना शेती व कुटिरोद्योगांसाठी कर्ज उपलब्ध करून देणे. महिला आणि बालकल्याणाचा कार्यक्रम राबविणे. अस्पृश्यतेचे निवारण करून आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देणे. भटक्या विमुक्तांना कपडे पुरविणे, समाज मंदिरे, संस्कार केंद्रे, करमणूक केंद्रे स्थापन करणे. बालवाड्यांची सोय करणे, औषधांसाठी अनुदान देणे, कुटिरोद्योगांना प्रोत्साहन देणे. ही सर्व समाज कल्याणविषयक कार्ये पंचायत समिती करते.

(८) समाजशिक्षण : करमणूकीच्या कार्यक्रमाद्वारे जनतेचे प्रबोधन करणे. जत्रा, प्रदर्शनात दारूबंदी, कुष्ठरोग निर्मूलन, एडस्, हुंडाबळी सारखे कार्यक्रम सादर करून जनतेस शिक्षित करणे, सामूहिक मनोरंजन केंद्रे, प्रौढ साक्षरतेची केंद्रे चालविणे, चलत चित्रपटाच्या प्रदर्शनाची सोय करणे इत्यादी.

याशिवाय जंगलाचा विकास, कुरणे विकसित करणे, गावठाणे वसविणे, जुन्या गावठाणांची सुधारणा, सामाजिक वनीकरण, उद्याने, धर्मशाळा बांधणे, सरपंचाची संमेलने भरविणे, स्वयंरोजगाराचे कार्यक्रम राबविणे ही सर्व कार्ये पंचायत समिती करते. ही सर्व कार्ये करण्यासाठी पंचायत समितीला जिल्हा परिषदेकडून अनुदान मिळते. जिल्हा परिषदेने आपली काही कार्ये पंचायत समितीला सोपविली असल्यास त्या कार्याचा पूर्ण खर्च पंचायत समितीला अनुदानाच्या स्वरूपात मिळतो. याशिवाय पंचायत समितीला जमीन महसूलावरील वाढीव उपकरांचा काही हिस्सादेखील मिळतो.



**पंचायतराज योजनेत पंचायत समितीचे स्थान व महत्त्व :**

पंचायतराज योजनेत ग्रामपंचायत आणि जिल्हा परिषद या दोघांना स्वतंत्र अस्तित्व आहे. पंचायत समितीची स्थिती तशी नाही. कारण पंचायत समित्या या जिल्हा परिषदेचा एक घटक (भाग) म्हणून काम पाहतात. महाराष्ट्रात पंचायत समिती ही जिल्हा परिषदेची केंद्रिय समिती म्हणून कार्य करते. या अर्थाने त्यांना पूर्णतः स्वतंत्र अस्तित्व नाही असे म्हणता येते. ७३ व्या घटनादुरुस्तीनंतर पंचायत समित्यांना काही प्रमाणात स्वतंत्र अस्तित्व देण्याचा प्रयत्न केला आहे. जमिन महसूलावरील वाढीव उपकराचा काही हिस्सा हेच पंचायत समितीच्या उत्पन्नाचे मुख्य साधन आहे.

महाराष्ट्र राज्यातील पंचायत समित्यांचे स्वतःचे उत्पन्न अगदीच अल्प आहे. त्यांना प्रामुख्याने जिल्हा परिषदेकडून प्राप्त होणाऱ्या अनुदान आणि निधीवर अवलंबून राहावे लागते. जिल्हा परिषदांना मिळणाऱ्या निधींमध्ये वाढ झाल्याशिवाय पंचायत समित्यांचे उत्पन्न वाढू शकत नाही. महाराष्ट्रात काही मोठ्या गावामधील ग्रामपंचायतीचे एकूण उत्पन्न एका पंचायत समितीच्या एकूण उत्पन्नापेक्षाही अधिक आहे. म्हणून पंचायत समितीचे मुख्य कार्य जिल्हा परिषदेच्या मदतीने आणि पुरस्काराने सुरू करण्यात आलेल्या योजना राबविणे व त्यावर देखरेख ठेवणे एवढेच आहे असे म्हटले जाते.

## (३) जिल्हा परिषद
## (Zilla Parishad)

**स्थापना :** त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्थेत सर्वात वरच्या स्तरावर जिल्हा परिषद आहे. जिल्हा हा विकासाचा केंद्रबिंदू मानला जातो. यामुळे जिल्हा परिषदांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होणे स्वाभाविक ठरते. राज्य प्रशासनाचा एक घटक म्हणून नवीन जिल्हा निर्माण करण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे. राज्यशासनाप्रमाणेच केंद्रीय सरकारच्या प्रशासनाचा पायाभूत क्षेत्रीय घटक म्हणूनही जिल्हाच ओळखला जातो. भारतात जिल्हा परिषदेला विभिन्न घटकराज्यांमध्ये वेगवेगळ्या नावाने संबोधिले जाते. उदा. तामीळनाडू व कर्नाटकमध्ये जिल्हा विकास परिषद, आसाममध्ये महकमा परिषद, गुजरातमध्ये जिल्हा पंचायत या नावाने संबोधिले जाते. संख्यात्मकदृष्ट्या भारतात ५३७ तर महाराष्ट्रात ३३ जिल्हा परिषदा आहेत. बृहन्मुंबई आणि मुंबई उपनगर हे दोन जिल्हे शहरी जिल्हे असल्यामुळे तेथे जिल्हा परिषदा नाहीत.

वैधानिक दृष्टिने जिल्हा परिषदेला निगम असा दर्जा लाभला आहे. निगम हा दर्जा प्राप्त झाल्यामुळे जिल्हा परिषदेला स्वतःची संपत्ती ठेवणे, तिचा व्यय करणे, व्यापारी करार करणे इत्यादी अधिकार असतात. जिल्हा परिषदेला कायदेशीर अस्तित्व प्राप्त झाले असल्यामुळे ती इतरांवर किंवा इतर तिच्यावर दावा दाखल करू शकतात. महाराष्ट्रात सर्व जिल्ह्यांमध्ये १ मे १९६२ रोजी जिल्हा परिषदेची स्थापना करण्यात आली आहे.

**जिल्हा परिषदेची रचना :**

१९९० मधील विधिनियमातील दुरुस्तीनुसार महाराष्ट्रात जिल्हा परिषदेची निर्वाचित सदस्यसंख्या किमान ५० आणि कमाल ७५ करण्यात आली आहे. राज्य निर्वाचन आयोग

Scanned with OKEN Scanner

लोकसंख्येच्या आधारे जिल्हा परिषदेचे समान मतदारसंघ तयार करतो. प्रत्येक मतदारसंघ साधारणतः ३५००० लोकसंख्येचा असतो. प्रत्येक मतदारसंघातून एका जिल्हा परिषद सदस्यांची निवड केली जाते.

निर्वाचित सदस्यांशिवाय काही स्वीकृत सदस्यही जिल्हा परिषदेत पूर्वी घेतले जात असत. परंतु आता स्वीकृत सदस्य घेण्याची पद्धती बंद करण्यात आली आहे. जिल्ह्यामधील सर्व पंचायत समितीचे सभापती हे त्या जिल्ह्यामधील जिल्हा परिषदेचे पदसिद्ध सभासद असतात. मात्र त्यांना मतदानाचा अधिकार नसतो. मुख्य कार्यकारी अधिकारी हा देखील जिल्हा परिषदेचा पदसिद्ध सदस्य असतो तो जिल्हा परिषदेचा पदसिद्ध सचिव म्हणून कार्य करतो.

**सदस्यत्वासाठीच्या पात्रता व अटी :**

जिल्हा परिषदेच्या निवडणुकीला उभे राहण्यासाठी खालील पात्रता व अटी पूर्ण कराव्या लागतात.

(१) उमेदवार हा भारताचा नागरिक असावा.

(२) त्याचे वय २१ वर्षे पूर्ण असावे.

(३) जिल्हा परिषदेच्या मतदार यादीत त्याचे नाव असावे.

(४) अशी व्यक्ती शासकीय सेवेत नसावी.

(५) ती व्यक्ती दिवाळखोर किंवा वेडी असू नये.

(६) जिल्हा परिषदेच्या व्यवहारात आर्थिक हितसंबंध असणारी व्यक्ती अपात्र असेल.

(७) न्यायालयाने सर्वसाधारण किंवा अस्पृश्यता कायद्याखाली विहित शासकीय तरतुदींनुसार शिक्षा ठोठावल्यास व शिक्षा संपून ५ वर्षे पूर्ण झाली नसतील, तर ती व्यक्ती अपात्र असेल.

(८) दिनांक १२ सप्टेंबर२००१ नंतर तिसरे अपत्य झाल्यास अशी व्यक्ती अपात्र असेल.

(९) राज्य विधिमंडळाच्या निवडणुकीसाठी निश्चित केलेल्या सर्व अटी जिल्हा परिषदेच्या निवडणुकीस लागू असतील.

**जिल्हा परिषदेतील आरक्षण :**

जिल्हा परिषद अध्यक्षांचे आरक्षण ठरविताना संपूर्ण महाराष्ट्रातील जिल्हा परिषदांचा विचार केला जातो, तर सदस्यांचे आरक्षण निश्चित करताना केवळ एका जिल्हा परिषदेला गृहीत धरले जाते. जिल्हा परिषदेत सदस्यांचे खालीलप्रमाणे आरक्षण दिले जाते.

(१) **अनुसूचित जाती व जमातीसाठी** त्या जिल्ह्यातील त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणावरून आरक्षण ठरविले जाते आणि अशा आरक्षण राखीव जागा वेगवेगळ्या जि.प. मतदारसंघास (गटास) आळीपाळीने नेमून देण्यात येतात. या जागांपैकी १/३ जागा याच प्रवर्गातील महिलांसाठी राखीव ठेवण्यात येतात.

(२) **इतर मागासवर्गीयांसाठी** २७% जागा राखीव ठेवण्यात येतात. या जागांपैकी १/३ पेक्षा कमी नाही इतक्या जागा त्याच प्रवर्गातील महिलांसाठी असेल.



(३) **महिला :** एकूण पदाच्या १/३ पेक्षा कमी नाही इतके आरक्षण सर्वसाधारण गटातील महिलांसाठी असते.

**निवडणुक पद्धती :** राज्य निवडणूक आयोग राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या निवडणुका घेत असतो. जिल्हा परिषदेच्या मतदारसंघाची निर्मिती करून मतदारांच्या याद्या अद्ययावत करणे, राखीव मतदारसंघ घोषित करणे, निवडणुका घेऊन निकाल घोषित करणे इत्यादी कार्ये राज्य निवडणूक आयोग पार पाडीत असतो.

जिल्हा परिषदेचा प्रत्येक सदस्य एका मतदारसंघातून निवडला जातो. जिल्हा परिषदेच्या मतदारसंघास 'गट' असे संबोधले जाते. सदस्यांची निवड प्रौढ व प्रत्यक्ष मतदानाने होते. मतदार याद्या तयार करणे, मतदारसंघ निश्चित करणे, निवडणूक प्रक्रिया राबविणे आणि निकाल जाहीर करणे ही राज्य निवडणूक आयोगाची जबाबदारी असते. जिल्हा परिषदेची निवडणूक लढविण्यासाठी सर्वसाधारण उमेदवारास १००० रु. आणि राखीव जागेवरील उमेदवारास ५०० रु. अनामत रक्कम ठेवावी लागते.

**जिल्हा परिषदेचा कार्यकाल :** जिल्हा परिषदेचा कार्यकाल पहिल्या बैठकीपासून पाच वर्षांचा असेल. काही कारणास्तव जिल्हा परिषदेची मुदत पूर्ण होण्यापूर्वी बरखास्ती झाली तर सहा महिन्यांच्या आत निवडणूका घेणे बंधनकारक असते. जिल्हा परिषदेच्या निवडणुका झाल्यानंतर जिल्हा परिषदेच्या पहिल्या सभेपासून पाच वर्षांचा कार्यकाल गणला जातो.

**जिल्हा परिषदेची बरखास्ती :** 'महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम - १९६१' मधील कलम २६० नुसार आर्थिक दिवाळखोरी किंवा प्रशासन व्यवस्था कोलमडल्याच्या कारणावरून राज्य सरकार जिल्हा परिषदेला बरखास्त करू शकते.

जिल्हा परिषदेचा एखादा सदस्य जिल्हा परिषदेच्या पूर्व परवानगीशिवाय सतत सहा महिने गैरहजर राहिल्यास त्याचे सदस्यत्व रद्द होते. नियमबाह्य वर्तन किंवा कार्य करणाऱ्या एखाद्या सभासदाविरुद्ध जिल्हा परिषदेतील उपस्थित सभासदांपैकी २/३ बहुमताने ठराव पास करून त्याला पदावरून काढण्याची शिफारस राज्यसरकारला करू शकते. यानंतर राज्यसरकार त्या सभासदाला पदमुक्त करते.

**जिल्हा परिषदेतील सभा :**

**(१) सर्वसाधारण सभा (प्रथम म्हणजे पहिली सभा) :** जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्षांच्या निवडीसाठी परिषदेच्या निवडणुकीनंतर प्रथम सर्वसाधारण सभा बोलविली जाते. ही सभा जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली होते. सदर बैठकीसाठी १५ दिवस अगोदर नोटीस द्यावी लागते. सर्वप्रकारच्या सर्वसाधारण सभांसाठी सदस्यसंख्येच्या १/३ सदस्य संख्या गणपूर्तीसाठी आवश्यक असते.

**(२) सर्वसाधारण सभा (नियमित सभा) :** जिल्हा परिषदेची सर्वसाधारण सभा तीन (३) महिन्यांतून एकदा घेणे बंधनकारक आहे. म्हणजेच वर्षात अशा चार सभा घेतात. या

Scanned with OKEN Scanner

सभांच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद अध्यक्ष असतो. जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांच्या अनुपस्थितीत उपाध्यक्ष सभेचे अध्यक्षपद धारण करतात. या सभेसाठीही सदस्यांना १५ दिवस अगोदर नोटीस द्यावी लागते.

(३) **विशेष सर्वसाधारण सभा :** जिल्हा परिषदेचे अध्यक्ष आवश्यक तेव्हा एकूण सभासदांच्या १/५ पेक्षा कमी नाही इतक्या सभासदांनी लेखी विनंती केल्यास विशेष सभेचे आयोजन करू शकतात. विनंतीपासून ७ दिवसांच्या आत विशेष सर्वसाधारण सभेची पूर्वसूचना दिली जाते. अशी नोटीस बैठकीच्या किमान १० दिवस अगोदर द्यावी लागते. सभेच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद अध्यक्ष असतो; परंतु अशी सभा जिल्हा परिषद अध्यक्षावरील अविश्वास ठरावासाठी बोलविली असल्यास ती जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली घेतली जाते.

(४) **समिती सभा :** जिल्हा परिषदेतील स्थायी समिती आणि विषय समित्या यांच्या सभा प्रत्येक महिन्यात होतात. त्या त्या समितीचे सभापती सभेचे अध्यक्ष असतात. सदस्यांना नियमित होणाऱ्या मासिक बैठकीसाठी ७ दिवसांची पूर्वसूचना दिली जाते. मात्र, विशेष सभा बोलविल्यास ३ दिवसांची पूर्वसूचना द्यावी लागते.

(५) **आमसभा :** जिल्हा परिषदेच्या कारभाराचा व विकास कार्याचा वार्षिक आढावा घेण्यासाठी प्रत्येक वर्षी आमसभा घेतली जाते. या आमसभेसाठी खासदार, आमदार, जिल्हा परिषद व पंचायत समितीचे पदाधिकारी व सदस्य आणि जिल्हा पातळीवरील सर्व अधिकाऱ्यांना बोलवावे लागते. आमसभा ही जिल्हा परिषदेची वैधानिक सभा नसून ती अनौपचारिक सभा असते. या सभेच्या अध्यक्षस्थानी कोण असावे याबाबत जिल्हा परिषद अध्यक्ष निर्णय घेतो.

**जिल्हा परिषदेचे पदाधिकारी व त्यांच्यासाठीचे आरक्षण :**

अध्यक्ष व उपाध्यक्ष हे जिल्हा परिषदेचे दोन प्रमुख राजकीय पदाधिकारी आहेत. जिल्हा परिषद अध्यक्षाचा दर्जा हा राज्यमंत्रिमंडळातील उपमंत्र्याच्या बरोबरीचा आहे असे मानले जाते. यावरून जिल्हा परिषद अध्यक्षाचे पद हे किती मानाचे आहे हे स्पष्ट होते. जिल्हा परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुका झाल्यानंतर जिल्हाधिकारी एक विशिष्ट तारीख निश्चित करून जिल्हा परिषदेची पहिली बैठक बोलावतात. या बैठकीचे अध्यक्ष स्वतः जिल्हाधिकारी किंवा त्यांनी निवड केलेला उपजिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी असतो. जिल्हा परिषदेच्या या पहिल्या बैठकीतच अध्यक्ष व उपाध्यक्षांची निवड केली जाते. ही निवड सर्व निर्वाचित सदस्य गुप्त मतदान पद्धतीने करतात. अध्यक्ष आणि उपाध्यक्षाच्या निवडणुकीत समसमान मते पडली तर निवड बैठकीचा अध्यक्ष चिट्ठ्या टाकून निर्णय देतो. या निवडणुकीत विधिग्राह्यतेबाबत काही विवाद निर्माण झाल्यास तीस दिवसांच्या मुदतीत विभागीय आयुक्ताकडे न्याय मिळण्यासाठी अर्ज करता येतो. जिल्हा परिषद अध्यक्ष आणि उपाध्यक्षाला सलग दोनवेळेपेक्षा ज़ास्त वेळा अध्यक्ष व उपाध्यक्षपदाची निवडणूक लढविता येत नाही.

उपाध्यक्षपदासाठी आरक्षण नाही. अध्यक्षपदासाठी विविध वर्गांना आरक्षण देण्यात येते ते पुढीलप्रमाणे :



(१) **अनुसूचित जाती-जमाती वर्ग :** राज्यातील अनुसूचित जाती-जमातींची लोकसंख्या विचारात घेऊन त्यांना जिल्हा परिषदेच्या एकूण अध्यक्षपदांपैकी लोकसंख्येच्या प्रमाणात जागा राखीव ठेवल्या जातात. या राखीव ठेवलेल्या जागांपैकी १/३ जागा याच वर्गातील महिलांसाठी राखीव असतात.

(२) **इतर मागासवर्ग प्रवर्ग :** राज्यातील एकूण जिल्हा परिषद अध्यक्षपदांपैकी २७ टक्के पदे इतर मागासवर्गातील लोकांसाठी राखीव असतात. या राखीव ठेवलेल्या जागांपैकी १/३ जागा याच वर्गातील महिलांसाठी राखीव ठेवल्या जातात.

(३) **महिला वर्ग :** राज्यातील एकूण जिल्हा परिषदांच्या अध्यक्षपदांपैकी १/३ पदे म्हणजे ३३ टक्के जागा महिला वर्गासाठी राखीव असतात; या १/३ जागांमध्ये अनुसूचित जाती-जमाती, इतर मागासवर्ग व खुल्या गटातील महिला या सर्वांचा समावेश असतो.

**अध्यक्ष व उपाध्यक्षाचा कार्यकाल :** जिल्हा परिषद अध्यक्ष आणि उपाध्यक्षांचा कार्यकाल राज्यशासन निश्चित कर[illegible]. आतापर्यंत अनेक वेळा त्यांच्या कार्यकलात बदल झाला. प्रारंभी अध्यक्ष व उपाध्यक्षाचा कार्यकाल पाच वर्षांचा होता. १९९७ मध्ये सेना-भाजप युती सरकारने तो एक वर्षाचा केला. काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस युती सरकारने हा कार्यकाल आता अडीच वर्षांचा केला आहे. अध्यक्ष व उपाध्यक्षाने पदभार स्वीकारल्यापासून तो कार्यकाल गणला जातो.

**अध्यक्ष व उपाध्यक्षाचा राजीनामा :** अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा कार्यकाल पदभार स्वीकारल्यापासून अडीच वर्षे असतो; परंतु कार्यकाल संपण्यापूर्वी स्वहस्ताक्षरात राजीनामा देऊन ते पदमुक्त होऊ शकतात. जिल्हा परिषद उपाध्यक्ष आपल्या पदाचा राजीनामा जिल्हा परिषद अध्यक्षाकडे देत असतो. अध्यक्ष आपला राजीनामा विभागीय आयुक्ताकडे देतो.

**अध्यक्ष व उपाध्यक्षावरील अविश्वास ठराव :** जिल्हा परिषदेचे निर्वाचित अध्यक्ष व उपाध्यक्ष हे शासकीय नियमाप्रमाणे कामकाज करीत नसतील तर त्यांच्यावर अविश्वास ठराव मांडण्याचा अधिकार जिल्हा परिषदेच्या निर्वाचित सभासदांना असतो. अध्यक्ष व उपाध्यक्षांवर अविश्वास ठराव मांडण्यासाठी व तो संमत करण्यासाठी लागणारे बहुमत किती असावे हे राज्य सरकार ठरविते. आतापर्यंत यात वारंवार बदल झाले आहेत. सध्या अध्यक्ष व उपाध्यक्षावर अविश्वासाचा ठराव मांडण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याकडे मागणी करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या १/३ निर्वाचित सभासदांचे बहुमत लागते. जिल्हाधिकारी अविश्वासाच्या ठरावाची मागणी आल्यापासून सात दिवसांच्या आत जिल्हा परिषदेची विशेष सभा बोलावतो. या सभेच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी किंवा त्याने नियुक्त केलेला उपजिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी असतो. जिल्हा परिषदेच्या या विशेष सभेत अध्यक्ष किंवा उपाध्यक्षांवरील अविश्वासदर्शक ठरावावर चर्चा व मतदान होते. जिल्हा परिषदेच्या एकूण निर्वाचित सभासदांपैकी २/३ सभासदांनी हा ठराव मंजूर केल्यास अध्यक्ष किंवा उपाध्यक्षाला पदत्याग करावा लागतो. तसेच

Scanned with OKEN Scanner

अध्यक्ष किंवा उपाध्यक्षावरील अविश्वासाचा ठराव फेटाळला गेल्यास परत बारा महिन्यांपर्यंत तो मांडता येत नाही. अध्यक्ष व उपाध्यक्षपदी महिला असल्यास त्यांच्यावरील अविश्वास ठराव संमत होण्यासाठी ३/४ बहुमत आवश्यक असते.

**अध्यक्ष व उपाध्यक्षाची पदच्युती :** जिल्हा परिषदेचा अध्यक्ष व उपाध्यक्ष तीस दिवसांपेक्षा अधिक काळासाठी जिल्हा परिषदेच्या परवानगीशिवाय गैरहजर असल्यास त्याचे पद संपुष्टात येते. तसेच त्यांनी गैरवर्तन, कर्तव्यपालनात कसूर केली असेल तर राज्य शासन त्यांना पदच्युत करू शकते. अशाप्रकारे पदच्युत झालेले अध्यक्ष व उपाध्यक्ष विनापरवानगी तीस दिवसांपेक्षा अधिक काळासाठी गैरहजर राहिल्यास त्यांच्या मानधनात कपात केली जाते.

**जिल्हा परिषद अध्यक्षाचे अधिकार व कार्ये :**

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम – १९६१ मध्ये अध्यक्षाच्या व जिल्हा परिषदेच्या कार्यासंबंधीचा उल्लेख आहे. ७३व्या घटनादुरुस्तीप्रमाणे महाराष्ट्र सरकारने जिल्हा परिषद कायद्यात सुधारणा करून अनेक नवीन विषयांची जबाबदारी जिल्हा परिषदांवर सोपविली आहे. यामुळे जिल्हा परिषदेबरोबरच जिल्हा परिषदेच्या अध्यक्षाच्या अधिकार व कार्यातही वाढ झाली आहे. अध्यक्षाचे प्रमुख अधिकारी पुढीलप्रमाणे –

(१) जिल्हा परिषदेच्या सभा बोलावणे व त्या सभांचे अध्यक्षस्थान भूषविणे.

(२) जिल्हा परिषदेच्या सभेची तारीख, वेळ व विषयपत्रिका निश्चित करणे व सभासदांना त्यासंबंधीची माहिती देणे.

(३) जिल्हा परिषदेच्या सभेच्या कामकाजाचे नियमन व नियंत्रण करणे.

(४) जिल्हा परिषदेचे अभिलेख व कागदपत्रे पाहणे किंवा त्याची तपासणी करणे.

(५) जिल्हा परिषद अधिनियमानुसार प्रदान केलेले अधिकार व कर्तव्ये पार पाडणे.

(६) जिल्हा परिषदेच्या वित्तीय आणि कार्यकारी प्रशासनांवर देखरेख व नियंत्रण ठेवणे.

(७) स्थायी समितीचा पदसिद्ध अध्यक्ष म्हणून जबाबदारी पार पाडणे.

(८) जिल्हा परिषदेने संमत केलेल्या ठरावांच्या अंमलबजावणीवर देखरेख व नियंत्रण ठेवणे.

(९) राज्य शासनाने जिल्हा परिषदेकडे सोपविलेल्या योजनांची अंमलबजावणी करणे.

(१०) जिल्हा परिषदेचे कर, बिल वसुलीसंबंधीचे अधिपत्र काढणे व त्यावर स्वाक्षरी करणे.

(११) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या कार्यावर देखरेख व नियंत्रण ठेवणे.

(१२) आणीबाणीच्या काळात स्थानिक लोकांच्या हितासाठी नवीन विकासकामे सुरू करणे अथवा जुनी कामे रद्द करण्यासंबधी निर्देश देणे.

(१३) जिल्हा परिषदेचे अंदाजपत्रक सर्वसाधारण सभेपुढे मांडण्यापूर्वी स्थायी समितीचा अध्यक्ष म्हणून त्याला मान्यता देणे.



**जिल्हा परिषदेचा अधिकारी – मुख्य कार्यकारी अधिकारी : (Chief Executive Officer) :**

महाराष्ट्र जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय प्रमुखास मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून ओळखले जाते. आय.ए.एस. दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक जिल्हा परिषदेवर तीन वर्षांसाठी केली जाते. तो संघ लोकसेवा आयोगाद्वारे निवडलेला आय.ए.एस. अधिकारी असतो. त्याच्या नेमणुकीचा व बदली-बढतीसंबंधीचा अधिकार राज्य सरकारला आहे. जिल्हा परिषदेतील एकूण निर्वाचित सभासदांपैकी २/३ सभासदांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या बदलीसंबंधीचा ठराव पास करून राज्य सरकारकडे मागणी केल्यास राज्य सरकार त्याची बदली करते.

श्री बलवंतराय मेहता समितीने जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय कार्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्याकडे सोपविण्याची शिफारस केली होती. यानुसार भारतातील अनेक राज्यांत जिल्हा परिषदेचा प्रशासकीय प्रमुख जिल्हाधिकारी आहे. महाराष्ट्रात नाईक समितीने जिल्हाधिकाऱ्याच्या नेमणुकीऐवजी त्याच दर्जाचा स्वतंत्र अधिकारी जिल्हा परिषदेचा प्रशासकीय प्रमुख म्हणून नेमण्याची शिफारस केली होती. यानुसार महाराष्ट्रात मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचे पद निर्माण झाले. महाराष्ट्रात जिल्हास्तरावरील महसूल प्रशासन जिल्हाधिकाऱ्याकडे तर विकास प्रशासन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे देण्यात आले आहे.

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला त्याच्या प्रशासकीय कार्यांत मदत करण्यासाठी एक किंवा दोन उपमुख्य कार्यकारी अधिकारी असतात. त्यांची निवड महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून केली जाते तर नेमणूक राज्य सरकार करते.

**मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचे अधिकार व कार्ये :**

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम – १९६१ मधील कलम –९५ नुसार मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला पुढील प्रमुख कार्ये करावी लागतात.

(१) जिल्हा परिषदेतील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कामकाजासंबंधीची कर्तव्ये व जबाबदाऱ्या निश्चित करणे.

(२) राज्यशासन किंवा जिल्हा परिषद कायद्यानुसार सोपविण्यात आलेल्या जबाबदाऱ्या पार पाडणे. यासाठी दिलेल्या अधिकारांचा वापर करणे.

(३) जिल्हा परिषदेच्या, जिल्हा परिषदेतील समित्यांच्या किंवा जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या सभांना हजर राहणे.

(४) जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली काम करणाऱ्या कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचाऱ्याकडून आवश्यक ती माहिती, खुलासा, स्पष्टीकरण, विवरणपत्र, हिशेब किंवा कार्याचा अहवाल मागवणे.

(५) जिल्हा परिषदेची सर्व कागदपत्रे, दस्तऐवज आणि सभेचा वृत्तांत असणारी कागदपत्रे सुरक्षित राहतील अशी व्यवस्था करणे.

(६) राज्य सरकारने जिल्हा परिषदेकडे वर्ग केलेल्या वर्ग-१ आणि वर्ग-२ श्रेणीतील अधिकाऱ्यांची निश्चित पदांवर नेमणूक करणे.

Scanned with OKEN Scanner

(७) जिल्हा परिषदेतील वर्ग-१ आणि वर्ग-२ श्रेणीच्या अधिकाऱ्यांची दोन महिन्यांपर्यंतची रजा मंजूर करणे व त्यांचा गोपनीय अहवाल लिहिणे.

(८) महाराष्ट्र लोकसेवा आयोग, प्रादेशिक निवड मंडळ किंवा जिल्हा निवड समितीने निवड केलेल्या वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे.

(९) जिल्हा परिषदेसाठी आवश्यक असणाऱ्या चतुर्थश्रेणीतील कर्मचाऱ्यांच्या नेमणुका करणे.

(१०) जिल्हा परिषदेतील प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्यावर देखरेख व नियंत्रण ठेवणे.

(११) जिल्हा परिषदेच्या विकास योजनांची व कामांची जलदगतीने अंमलबजावणी करण्यासाठी उपाययोजना करणे.

(१२) जिल्हा निधीतून रकमा काढणे व त्या विकासकार्यावर खर्च करणे.

(१३) राज्य शासनाने अधिकार दिलेल्या विशिष्ट मर्यादेपर्यंतच्या निविदा व करार मंजूर करणे.

(१४) राज्य सरकारने वेळोवेळी निर्देशित केलेल्या विहित शक्तीचा वापर करून सोपविलेली कर्तव्ये पार पाडणे.

(१५) जिल्हा परिषदेतील अधिकारी किंवा कर्मचारी रजेवर अथवा बदलीवर गेलेले असतील तर अशावेळी त्यांचा पदभार सांभाळण्यासाठी तात्पुरत्या कर्मचाऱ्यांची व्यवस्था करणे.

(१६) जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या गटविकास अधिकाऱ्याच्या कार्यावर नियंत्रण ठेवणे.

(१७) जिल्हा परिषदेने संमत केलेल्या ठरावांची विविध खाते किंवा विभागप्रमुखांच्या माध्यमातून अंमलबजावणी करणे.

(१८) जिल्हा परिषदेचे वार्षिक अंदाजपत्रक तयार करून ते स्थायी समितीपुढे आणि त्यानंतर जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीसाठी ठेवणे.

**जिल्हा परिषदेतील समिती व्यवस्था :**

केंद्र आणि राज्यशासनाचे कामकाज चालविण्यासाठी खाते (Department) पद्धतीचा अवलंब केला जातो. उदा. गृह खाते, अर्थ खाते, संरक्षण खाते, शिक्षण खाते, आरोग्य खाते इत्यादी. याच धर्तीवर जिल्हा परिषदेचे कार्य सुरळितपणे पार पाडण्यासाठी समिती पद्धतीचा अवलंब केला जातो. जिल्हा परिषदेत स्थायी समिती (Standing Committee) आणि विषय समित्या (Subject Committee) असतात. स्थायी समिती एकच असते. विषय समित्या नऊ असतात.

नवनिर्वाचित जिल्हा परिषदेला आपल्या पहिल्या सभेपासून एक महिन्याच्या आत या समित्यांचे गठन करावे लागते. स्थायी समिती आणि विषय समिती सभासदांची निवड जिल्हा परिषद नवनिर्वाचित सदस्य एकल संक्रमण प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या तत्त्वानुसार करतात.



यामुळे विरोधी पक्षांना त्यांच्या सभागृहातील संख्येच्या प्रमाणात या समित्यांमध्ये प्रतिनिधित्व मिळते. सध्या स्थायी समिती व विषय समित्यांच्या सभासदांचा कार्यकाल अडीच वर्षांचा आहे. सर्व समित्यांमध्ये स्थायी समिती ही सर्वात महत्त्वाची आणि एकूण सदस्य संख्या या दृष्टीने मोठी असते. सामान्यपणे प्रत्येक जिल्हा परिषद सदस्याला कोणत्या तरी किमान एका समितीचा सदस्य म्हणून काम करण्याची संधी मिळते. काही सदस्यांनी दोन समित्यांचे सदस्य म्हणून काम करण्याची संधी देखील मिळते. जिल्हा परिषदेतील समित्यांचे विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

**(१) स्थायी समिती (Standing Committee) :** जिल्हा परिषदेतील सर्वात महत्त्वपूर्ण समिती म्हणून या समितीचा उल्लेख होतो. या समितीत अध्यक्षांसह एकूण १४ सभासद असतात. यामध्ये अनुसूचित जाती-जमातीचे दोन सभासद असतात. विषय समित्यांचे सभापती स्थायी समितीचे पदसिद्ध सभासद असतात. जिल्हा परिषदेचा अध्यक्ष हा या समितीचा पदसिद्ध अध्यक्ष असतो तर उपमुख्य कार्यकारी अधिकारी पदसिद्ध सचिव असतो.

जिल्हा परिषदेच्या कामाचा आणि प्रगतीचा दैनंदिन आढावा घेणे, जिपच्या संस्थांवर देखरेख ठेवणे विविध विकास योजनांवर आणि कामांवर लक्ष ठेवणे आणि आर्थिक बाबींसंबंधी निर्णय घेणे, विविध निविदा मान्य करणे ही कार्ये स्थायी समिती करते.

**(२) विषय समित्या (Subject Committee) :** जिल्हा परिषदेत वेगवेगळ्या विषयांचे कामकाज करण्यासाठी एकूण नऊ विषय समित्या आहेत त्या पुढीलप्रमाणे –

**(१) शिक्षण समिती (Education Committee) :** शिक्षण समितीत एकूण नऊ सभासद असतात. यांची निवड जिल्हा परिषदेच्या निर्वाचित सभासदांकडून केली जाते. जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) या समितीचा पदसिद्ध सचिव असतो. प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची व्यवस्था ही समिती करते. उपाध्यक्ष हे या समितीचे सभापती असतात.जिल्ह्यात प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाचा प्रसार करणे, शाळेच्या इमारती बांधणे, शालोपयोगी साहित्याचे वाटप, अनुदान देणे आदी कार्ये ही समिती करते. ग्रामीण क्षेत्रात निरक्षरता दूर करण्यासाठी प्रौढ शिक्षणाचे कार्यक्रम ही समिती आयोजित करते.

**(२) आरोग्य समिती (Health Committee) :** आरोग्य समितीत एकूण नऊ सभासद असतात. यांची निवड जिल्हा परिषदेच्या निर्वाचित सभासदांकडून केली जाते. प्राथमिक आरोग्य केंद्राची स्थापना, दवाखाने काढणे, रोगप्रतिबंधक लसींचा पुरवठा, साथीच्या रोगांना आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे आदी कामे ही समिती करते.जिल्हा आरोग्य अधिकारी हा या समितीचा पदसिद्ध सचिव असतो. ग्रामीण भागासाठी सार्वजनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे या समितीचे कार्य असते.

**(३) वित्त समिती (Finance Committee) :** वित्त समितीत एकूण नऊ सभासद असतात. यांची निवड जिल्हा परिषदेचे निर्वाचित सभासद करतात. जिल्हा लेखा व वित्त अधिकारी या समितीचा पदसिद्ध सचिव असतो. जिल्हा परिषदेच्या वित्तीय व्यवस्थेची जबाबदारी या समितीवर असते. उपाध्यक्ष हे या समितीचे सभापती असतात.

Scanned with OKEN Scanner

(४) बांधकाम समिती (Public Work Committee) : बांधकाम समितीत एकूण नऊ सभासद असतात. जिल्हा परिषदेचे निर्वाचित सभासद त्यांची निवड करतात. कार्यकारी अभियंता या समितीचा पदसिद्ध सचिव असतो. जिल्हा परिषदेच्या बांधकाम व्यवस्थेची जबाबदारी या समितीवर असते. जिल्ह्यातील रस्ते, पूल, प्रशासकीय इमारती बांधणे आदी कार्ये ही समिती करते.

(५) कृषी समिती (Agriculature Committee) : कृषी समितीत एकूण अकरा सभासद असतात. जिल्हा परिषदेचे निर्वाचित सभासद त्यांची निवड करतात. जिल्हा कृषी अधिकारी या समितीचा पदसिद्ध सचिव असतो. जिल्हा परिषदेच्या कृषी व्यवस्थेची जबाबदारी या समितीवर असते. ही समिती शेती सुधारणा आणि प्रात्याक्षिके, पीक स्पर्धा, पीक मोहिम, पीकांचे रक्षण करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना, शेती अवजारांचे वाटप, खते व बियाणांचे वाटप आदी कार्ये करते.

(६) पशुसंवर्धन व दुग्धविकास समिती (Animal Husbund and Dairy Committee) : पशुसंवर्धन व दुग्धविकास समितीत एकूण नऊ सभासद असतात. जिल्हा परिषदेचे निर्वाचित सभासद त्यांची निवड करतात. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी या समितीचा पदसिद्ध सचिव असतो. जिल्हा परिषद क्षेत्रातील पाळीव प्राण्यांचे संगोपन व विकासासंबंधी ही समिती कार्य करते. ही समिती उच्च प्रतिच्या जनावरांची पैदास करणे, पशुवैद्यकीय दवाखाने स्थापन करणे, शेळी, मेंढी, कुक्कुट, वराह पालनास प्रोत्साहन देणे, गुरांचे प्रदर्शन भरविणे, दुग्ध व्यवसायाच्या वाढीसाठी प्रयत्न करणे आदी कार्ये करते.

(७) समाजकल्याण समिती (Social Welfare Committee) : समाजकल्याण समितीत एकूण अकरा सभासद असतात. जिल्हा परिषदेचे निर्वाचित सभासद त्यांची निवड करतात. या सभासदांमध्ये दोन सभासद अनुसूचित जाती-जमातीचे, चार सभासद इतर मागासवर्गाचे तर दोन महिला सभासद असतात. जिल्हा समाजकल्याण अधिकारी या समितीचा पदसिद्ध सचिव असतो. जिल्हा परिषद क्षेत्रातील शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गाच्या विकासाची जबाबदारी या समितीवर असते. जिल्हा परिषदेतील उपाध्यक्ष हे मागासवर्गीय असतील आणि सभापती पदासाठी जर कोणी उमेदवार संबंधित जातीचा नसेल तर उपाध्यक्ष या समितीचे सभापतीपद स्वतःकडे घेऊ शकतात. आदिवासी भागात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी आश्रम शाळा स्थापन करण्यास प्रोत्साहन देणे हे या समितीचे काम आहे.

(८) महिला व बालकल्याण समिती (Women and Child Welfare Committee) : महिला व बालकल्याण समिती १९९२ मध्ये अस्तित्वात आली. या समितीत एकूण नऊ सभासद असतात. ज्यांची निवड जिल्हा परिषदेचे निर्वाचित सभासद करतात. या समितीत किमान सत्तर टक्के महिला सभासद असावे लागतात. या समितीत जि.प.च्या निवडून आलेल्या सर्व महिला सदस्यांचा समावेश असतो. समितीच्या सभापतीपदी महिलेची निवड केली जाते. जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी या समितीचा पदसिद्ध सचिव असतो. जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील महिला व बालकल्याणाची जबाबदारी या समितीवर असते.



(९) जलसंधारण व पेयजल पुरवठा समिती : जिल्हा परिषदेसाठी या समितीची तरतूद १९९३ मध्ये नव्याने करण्यात आली. या समितीत एकूण आठ सभासद असतात. या आठपैकी पाच सभासद जिल्हा परिषद निर्वाचित सभासदांकडून निवडले जातात. दुसऱ्या दोन सभासदांमध्ये वित्त व बांधकाम समितींचा सभापती आणि कृषी व पशुसंवर्धन समितीचा सभापती यांचा समावेश असतो. जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी या समितीचा पदसिद्ध सभासद असतो. जि.प. अध्यक्ष हे या समितीचे पदसिद्ध सभापती असतात. जलसिंचनाचा कार्यकारी अभियंता या समितीचा पदसिद्ध सचिव असतो. जिल्हा परिषद क्षेत्रात जलसंधारणाची कामे व पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याची जबाबदारी या समितीवर असते. मृदसंधारण, जमिनीच्या धूप थांबवण्याच्या विविध उपाययोजना करणे, पाणीपुरवठा योजना आखणे व चालविणे आदी कार्ये ही समिती करते.

**समिती सभासदांचा कार्यकाल :**

विषय समितीच्या सभापतींचा कार्यकाल अडीच वर्षांचा आहे. हा कार्यकाल संपण्यापूर्वी जिल्हा परिषद अध्यक्षाकडे राजीनामा देऊन विषय समित्यांचे सभापती कार्यमुक्त होऊ शकतात. त्यांच्यावर अविश्वास ठराव संमत करूनसुद्धा त्यांना पदावरून दूर केले जाते.

**समित्यांचे अधिकार व कार्ये :**

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील कलम १०५ प्रमाणे स्थायी व विषय समित्यांचे अधिकार व कार्ये पुढीलप्रमाणे :

(१) प्रत्येक विषय समिती आपल्या विषयासंबंधी ध्येयधोरण व विकासयोजना अंमलात आणते.

(२) विषयाशी संबंधित विकास कार्यक्रमाचे पर्यवेक्षण करणे.

(३) प्रत्येक वर्षी अंदाजपत्रकात केलेल्या तरतुदीच्या खर्चाचे पर्यवेक्षण करते.

(४) प्रत्येक समिती आपल्या कामकाजाचा अहवाल जिल्हा परिषद परिषदेला देते.

(५) जिल्हा परिषद विकास कार्यक्रमाचे देखरेख व नियंत्रणासाठी अधिकाऱ्यांना आदेश देणे.

(६) स्थायी समिती जिल्हा परिषदेच्या उत्पन्न व खर्चाच्या हिशेबाचे परीक्षण करू शकते.

(७) स्थायी समिती कोणत्याही विषय समितीकडून कामकाज अहवाल मागू शकते.

(८) जिल्हा परिषदेच्या निधीची गुंतवणूक व विनिमय करण्याचा अधिकार स्थायी समितीला आहे.

**जिल्हा परिषदेचे अधिकार व कार्ये :**

**(Power and Functions of Zilla Parishad) :**

पंचायतराजच्या त्रिस्तरीय व्यवस्थेत सर्वोच्च शिखर संस्था म्हणून जिल्हा परिषद ओळखली जाते. १९९२ च्या ७३ व्या घटनादुरुस्तीनुसार राज्यघटनेत ११वे परिशिष्ट जोडण्यात आले. या परिशिष्टात एकूण २९ विषयांची यादी दिलेली आहे. घटकराज्यांनी राज्य विधिमंडळात

Scanned with OKEN Scanner

कायदा करून या २९ विषयांची जबाबदारी जिल्हा परिषदांकडे सोपवावी व ही जबाबदारी पार पाडण्यासाठी आवश्यक असणारे अधिकार त्यांना देण्यात यावे. महाराष्ट्र सरकारने एकूण १८ विषयांचे हस्तांतरण जिल्हा परिषदेकडे करण्याचा निर्णय २ ऑक्टोबर २००० रोजी घेतला. या १८ विषयांमध्ये कृषी, मृदसंधारण, लघुपाटबंधारे पाण्याचे व्यवस्थापनासह पाणलोट क्षेत्र विकास, पशुसंवर्धन, सामाजिक वनिकरण क्षेत्र वनिकरण, ग्रामीण गृहनिर्माण, पिण्याचे पाणी, अपारंपारिक ऊर्जा साधने, प्रौढ शाळा, सांस्कृतिक कामे, रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे व दवाखाने यांसह आरोग्य व स्वच्छता कार्यक्रम, कुटुंबकल्याण, महिला व बालकल्याण, समाजकल्याण, अपंग व दुर्बल मनस्क कल्याण यांचा समावेश होतो. या खात्यांचे एकत्रीकरण करून हे विभाग २ ऑक्टोबर २००० पासून जिल्हा परिषदेकडे सोपविण्यात आले आहेत. तसेच ११६ महत्त्वपूर्ण योजना या कृषी विभागाच्या आहेत. या विकास योजनांची जबाबदारी पार पाडण्यासाठी २९,००० कर्मचारी आणि राज्याच्या अर्थसंकल्पाचा ४० टक्के निधीही जिल्हा परिषदेकडे सोपविण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यामुळे जिल्हा परिषदांच्या अधिकारात वाढ होऊन त्यांना मंत्रालयाचे स्वरूप प्राप्त झालेले दिसून येते.

"महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१" मधील कलम-१०० मध्ये जिल्हा परिषदेचे प्रशासकीय अधिकार व कर्तव्ये दिली आहेत तर कलम-१०६ मध्ये जिल्हा परिषदेचे सर्वसामान्य अधिकार व कार्ये दिली आहेत. जिल्हा परिषद अधिनियमातील 'अनुसूची - १' मध्ये मूळ १२९ व सध्या १०८ विषय आहेत. या विषयानुसार जिल्हा परिषदेला आपल्या अधिकार व कर्तव्याचा वापर करावा लागतो. थोडक्यात, जिल्हा परिषदेचे अधिकार व कार्ये पुढीलप्रमाणे -

(१) जिल्हा यादीत नमूद केलेल्या विषयानुसार ग्रामीण विकासाच्या योजना अंमलात आणणे.

(२) विकास योजनांच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा निधीतून आवश्यक तेवढी खर्चाची तरतूद करणे.

(३) राज्य सरकारने हस्तांतरित केलेल्या विकास योजना अमलात आणणे.

(४) स्थानिक उपलब्ध संपत्तीचा उपयोग करून जिल्ह्याचा नियोजनबद्ध विकास करणे.

(५) पंचायत समित्यांनी तयार केलेल्या योजनांसह अल्प व दीर्घ मुदतीच्या विकास योजना तयार करणे व अंमलात आणणे.

(६) जिल्ह्यातील नागरिकांचे आरोग्य, शिक्षण, सुरक्षितता तसेच सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकासासंबंधीच्या उपाययोजना अंमलात आणण्यासाठी तरतूद करणे.

(७) जिल्हा परिषदेतील निर्वाचित सभासदांच्या २/३ बहुमताने ठराव संमत करून कोणताही जाहीर स्वागत समारंभ किंवा करमणुकीच्या कार्यक्रमाचे आयोजन करणे अथवा त्यासाठी अंशदान देणे.



(८) अनुसूचित जाती-जमाती आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांची स्थिती सुधारण्यासाठी राज्य शासनाच्या आदेशानुसार उपाययोजना करणे.

(९) अस्पृश्यता निर्मूलनासंबंधी राज्य शासनाच्या आदेशांची अंमलबजावणी करणे.

(१०) राज्य शासनाने वेळोवेळी सोपविलेल्या जबाबदाऱ्या पार पाडणे. तसेच शासकीय आदेशांचा अंमल करणे.

(११) जिल्हा परिषदेतील राजकीय पदाधिकारी अथवा प्रशासकीय अधिकाऱ्यांनी जिल्हा परिषद अथवा पंचायत समितीच्या कामकाजासाठी केलेला प्रवासखर्च त्यांना देण्यासंबंधी शासन नियमानुसार तरतूद करणे.

(१२) केंद्र, राज्य अथवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वतीने निश्चित केलेल्या नियमानुसार कोणतेही बांधकाम करणे. त्याची देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापन करणे. यासाठी जिल्हा निधीतून आर्थिक तरतूद करणे.

(१३) देशात कोणत्याही भागात नैसर्गिक आपत्ती ओढवल्यास त्याच्या निवारणासाठी शासनाने पुरस्कृत केलेल्या कोणत्याही निधीस अंशदान करणे.

(१४) गट अनुदानातून पंचायत समित्यांनी मंजूर करावयाच्या योजना वगळून जिल्ह्यातील इतर विकास परियोजनांना मंजूरी देणे.

(१५) पंचायत समित्यांना अनुदान व आर्थिक साहाय्यांचे वाटप करणे.

(१६) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या कामकाजांवर पर्यवेक्षण व नियंत्रण करणे.

(१७) आवश्यक तेव्हा स्थायी समिती अथवा कोणत्याही विषय समितीच्या कामकाजाचा वृत्तांत, हिशेब किंवा अहवाल मागविणे.

(१८) जिल्हा परिषदेतील कोणताही अधिकारी अथवा कर्मचाऱ्यास कोणत्याही सभेसाठी हजर राहण्यासंबंधी किंवा एखाद्या विषयावर सल्ला देण्यासंबंधी आदेश देणे.

(१९) जिल्हा परिषदेची जी कार्ये कायद्याद्वारे कोणाकडेही सोपविलेली नाहीत अशी कार्ये पार पाडणे.

(२०) स्थायी समिती, विषय समिती, पिठासीन अधिकारी अथवा कर्मचाऱ्याने घेतलेल्या कोणत्याही निर्णयात शासनाच्या निर्देशानुसार सुधारणा करणे.

(२१) जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली असलेले अधिकारपद धारण करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय कार्यावर नियंत्रण ठेवणे.

(२२) नैसर्गिक आपत्ती किंवा संकटकाळात शासन आदेशानुसार जुनी कामे बंद करणे अथवा नवीन कामे घेणे.

(२३) अधिनियमातील अधिकारानुसार कर, उपकर, फी आकारणे, त्यातील दरात बदल करणे, जमीन महसूल उपकरात वाढ करण्यासंबंधी राज्य शासनाला शिफारस करणे.

(२४) वार्षिक अंदाजपत्रक तयार करणे, आवश्यकतेनुसार त्यात सुधारणा करणे आणि त्यास मंजुरी देणे. यासंदर्भात जिल्ह्यातील पंचायत समित्यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकास स्वीकृती देणे.

Scanned with OKEN Scanner

(२५) पंचायत समित्यांच्या गटविकास अधिकाऱ्यावर देखरेख व नियंत्रण ठेऊन त्यांना आवश्यक ते मार्गदर्शन करणे.

(२६) जिल्हा परिषदेने कोणाविरुद्ध दावा केल्यास अथवा कोणी जि.प. विरुद्ध दावा केलेला असल्यास अशा दाव्यांमध्ये पुरेशा रक्कमेबाबत तडजोड करणे.

**पंचायतराज योजनेत जिल्हा परिषदेचे स्थान व महत्त्व :**

ग्रामीण स्वशासनाच्या तीन संस्थांमध्ये सर्वात जास्त अधिकारसंपन्न आणि आर्थिक बाबतीत सुदृढ अशी संस्था म्हणजे जिल्हा परिषद होय. जिल्ह्यातील ग्रामीण समाजाच्या विकासाला चालना देणारी आणि ग्रामीण विकासाच्या मार्गात असणारे अडसर दूर करणारी संस्था असे स्थान जिपला प्राप्त होईल अशी अपेक्षा होती. यामुळे जिल्हा परिषद या पंचायतराज संस्थेबद्दल जिल्ह्यातील ग्रामीण जनतेला आत्मियता व जिव्हाळा वाटू लागेल. जसे राज्यविधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील कामकाजाचे निरीक्षण करण्यासाठी लोक सभागृहांच्या दालनात (गॅलरीमध्ये) बसतात. तसेच जिल्ह्याच्या गामीण भागातील लोक जिल्हा परिषदेच्या सभांमधील कामकाजांचे निरीक्षण करण्यासाठी येतील आणि ते सभागृहाच्या दालनात बसतील अशी जिल्हा परिषद या पंचायत राज संस्थेच्या निर्मात्यांची अपेक्षा होती. परंतु ही अपेक्षा पूर्ण झालेली नाही हे बहुतांश जिल्हा परिषदांच्या सभागृहाच्या दालनातील उपस्थितीबाबतच्या रेकॉर्डवरून स्पष्ट होते.

जिल्हा परिषदेच्या सभांमधील कार्यवृत्ताच्या प्रती आणि वार्षिक अहवाल हे विधानसभा, विधानपरिषद व लोकसभा सदस्यांना पाठविले जातात. तरीही त्यांच्याकडून जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सभांमध्ये काही सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न झाले असल्याचे दिसून येत नाही. ग्रामीण विकासाची प्रक्रिया गतिमान करण्यासाठी म्हणजे विकासाच्या प्रक्रियेतील अडसर कसे दूर करता येतील? याबाबत पंचायत समिती, जिल्हा परिषद, विधानसभा, विधान परिषद लोकसभा सदस्यांमध्ये काही विचारविनिमय होत असल्याचे देखील दिसून येत नाही. विशेषतः विकास कार्यात लोकांचा सहभाग वाढविण्यासाठी पंचायत राज योजनेच्या तीनही संस्थांच्या जनप्रतिनिधींमध्ये समन्वय असणे ही २१ व्या शतकातील भारताची गरज झाली आहे असे म्हणता येईल.

## (४) ग्रामसभा

## (Gramsabha)

ग्रामसभा हा ग्रामपंचायत या स्थानिक स्वशासन संस्थेचाचा एक भाग आहे. परंतु पंचायतराज व्यवस्थेत विशेषतः ७३रावी घटनादुरुस्ती अंमलात आल्यापासून ग्रामसभेला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. कारण आता ग्रामसभेला स्वतंत्र असा सांविधानिक दर्जा प्राप्त झाला आहे. १९९३ पर्यंत म्हणजे ७३रावी घटनादुरुस्ती होईपर्यंतच्या कालखंडात ग्रामसभा आमंत्रित करणे हे ग्रामपंचायतीसाठी ऐच्छिक स्वरूपाचे कार्य होते. ग्रामसभेला फारसे अधिकारही नव्हते. पंचायतराज योजना सुरू झाल्यानंतर ३० वर्षे उलटून गेली तरीही खेड्यांचा म्हणावा तसा



विकास झाला नाही. याच्या अनेक कारणांपैकी एक कारण ग्रामसभांना व्यापक स्वरूपाचे अधिकार न देणे होय हे राष्ट्रीय नेते आणि राजकीय विचारवंतांच्या लक्षात आले.

आधुनिक तीर्थक्षेत्र म्हणून गौरविल्या गेलेल्या हिवरे बाजारने जागरूक व सतर्क ग्रामसभा असल्यास गावात आर्थिक क्रांतीबरोबरच सामाजिक क्रांतीही घडू शकते असा संदेश दिला आहे. काही वर्षांपूर्वी या गावातील लोकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत होते. ग्रामसभेच्या माध्यमातून जलसंधारण, वनीकरण, कुऱ्हाडबंदीने महत्त्व ग्रामस्थांच्या मनावर बिंबवून या गावाने कात टाकली. या घटनेमुळे ग्रामसभेचे महत्त्व अधोरेखांकित झाले.

आजच्या काळातील प्रातिनिधिक शासनपद्धतीच्या अथवा अप्रत्यक्ष लोकशाहीच्या युगात ग्रामसभा म्हणजे प्रत्यक्ष लोकशाहीचा अभिनव प्रयोग होय आणि तेही भौगोलिक व लोकसंख्यात्मक दृष्ट्या विशाल आकार असणाऱ्या भारतात या शब्दात ग्रामसभेचे केंळेपण वर्णन करता येईल.

भारतामध्ये फार प्राचीन काळापासून ग्रामसभेचे अस्तित्व आहे. पंचायतराज व्यवस्थेतील ग्रामपंचायत हा सर्वात खालचा घटक असून ग्रामसभेकडून ग्रामपंचायतीला सत्ता मिळते. ग्रामपंचायत ही ग्रामसभेची कार्यकारिणी आहे. म्हणूनच ती ग्रामसभेला जबाबदार आहे. ग्रामसभा ही ग्रामपंचायतीच्या सत्तेचे उगमस्थान आहे.

**ग्रामसभेची रचना :** महाराष्ट्रात १९५८ च्या ग्रामपंचायत कायद्यानुसार ग्रामसभांना मान्यता देण्यात आली होती. परंतु १९९२ साली झालेल्या ७३ राव्या घटनादुरुस्तीने तिला संवैधानिक दर्जा मिळाला. गावातील सर्व प्रौढ नागरिक हे ग्रामसभेचे सभासद असतात. गावातील १८ वर्षे पूर्ण करणारा प्रत्येक मतदार हा ग्रामसभेचा आपोआप सभासद होतो. ग्रामसभेला निवडणूक नसते. सैद्धांतिकदृष्ट्या ग्रामसभा ही विधानसभा आणि लोकसभेची जननी आहे असे म्हणता येते. कारण जनतेचे सार्वभौमत्व, विधिमंडळाचे म्हणजे संसदेचे सार्वभौमत्व या तत्वाचे पहिले उगमस्थान ग्रामसभा हेच आहे.

**ग्रामसभेची बैठक :** ग्रामसभेची बैठक बोलावण्याचा अधिकार सरपंचाला असतो. किंबहुना ग्रामसभेची बैठक बोलाविणे हे आता सरपंचावर बंधनकारक झाले आहे असे म्हणता येईल. ग्रामसभा बोलाविण्यात सरपंच अपयशी ठरल्यास सरपंचाला दोषी धरले जाणार आहे. सरपंचाच्या गैरहजेरीत उपसरपंचाला हा अधिकार प्राप्त होतो. ग्रामपंचायतीचे आर्थिक वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च हे असते. या आर्थिक वर्षात ग्रामसभेच्या किमान सहा बैठका बोलवाव्या लागतात. पूर्वी ही मर्यादा चार होती. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम-७ च्या उपबंधास अधीन राहून १५ ऑगस्ट व २६ जानेवारी रोजी ग्रामसभेच्या दोन बैठका होतात. राष्ट्रनिष्ठा वा राष्ट्राशी बांधिलकी हा बंध नागरिकांच्या मनात दृढ व्हावा हा उद्देश त्यामागे आहे. या सहापैकी कोणतीही एक सभा न घेण्याची कसूर केल्यास सरपंच व उपसरपंच त्या पदावर राहण्यास अपात्र ठरेल अशी वैधानिक तरतूद केली आहे. ग्रामसभा न बोलविण्यामध्ये ग्रामसेवक जबाबदार आहे असे आढळल्यास त्याला नोकरीतून निलंबित केले जाते. इतर बैठका ग्रामसभेच्या सोयीनुसार होतात.

Scanned with OKEN Scanner

ग्रामसभेच्या बैठका ग्रामपंचायत कार्यालयासमोरच्या पटांगणात किंवा सार्वजनिक ठिकाणीच होतात. खाजगी ठिकाणी बैठका घेता येत नाही. ग्रामसभेच्या बैठकीचा अध्यक्ष सरपंच असतो. सरपंचाच्या गैरहजेरीत तो अधिकार उपसरपंचाला प्राप्त होतो. ग्रामसभेच्या सदस्यांना ग्रामसभेच्या साधारण बैठकीची नोटीस किमान सात दिवस अगोदर द्यावी लागते तर असाधारण बैठकीची नोटीस किमान चार दिवस अगोदर द्यावी लागते. ग्रामसभेची सदस्य संख्या मोठी असल्याने प्रत्येकाच्या नावाने नोटीस देणे कठीण असते म्हणून ग्रामपंचायतीचे कार्यालय, चावडी किंवा इतर सार्वजनिक ठिकाणी चिकटवून ती प्रसिद्ध केली जाते. शिवाय कायद्याने ठरविलेल्या दोन दिवशी गावात दवंडी देऊन प्रसिद्ध केली जाते.

**ग्रामसभेची गणसंख्या :** ग्रामसभेची बैठक होण्यासाठी जी आवश्यक सभासद संख्या लागते तिला गणसंख्या म्हणतात. ग्रामसभेच्या बैठकीसाठी ग्रामपंचायत क्षेत्रातील एकूण मतदारांपैकी १५ टक्के किंवा १०० यापैकी जी संख्या कमी असेल तेवढे किमान मतदार हजर असणे आवश्यक असते. ग्रामसभेसाठी गणपूर्ती आहे किंवा नाही हे पाहण्याचा अधिकार ग्रामसभेच्या अध्यक्षाला म्हणजे सरपंचाला असतो. गणपूर्तीसाठी ग्रामसभेच्या निश्चित वेळेनंतर किमान पंधरा मिनिटे आणि जास्तीत जास्त तीन मिनिटे सभेला सदस्य येण्याची वाट पाहिली जाते. गणपूर्ती झाली नसेल तर त्यानंतर ग्रामसभा तहकूब केली जाते. तहकूब केलेल्या सभेसाठी गणपूर्तीचा नियम लागू नाही. आगामी काळात होणाऱ्या ग्रामसभेची तारीख, वेळ व ठिकाण तहकुब सभेतच ग्रामसभेचा अध्यक्ष जाहीर करीत असतो. अशाप्रकारे ग्रामसभेत लोकांना उपस्थित राहता यावे या उद्देशाने तहकूब ग्रामसभा पुन्हा घेऊन एक संधी दिली जाते.

**ग्रामसभेची पूर्वतयारी :**

८ जानेवारी २००३ आणि ८ ऑगस्ट २००३ च्या सुधारित नियमानुसार ग्रामसभेत काही बदल झाले आहेत. उदा. प्रत्येक ग्रामसभेच्या एक दिवस अगोदर महिलांची सभा घेणे आवश्यक झाले आहे. त्या सभेत पारित झालेले ठराव जसेच्या तसे ग्रामसभेत मान्य करण्यात यावे. तसेच महिलांच्या सभेपूर्वी ग्रामपंचायतीची मासिक सभा होऊन त्यात महिलांच्या सभेची विषयपत्रिका तसेच ग्रामसभेची विषयपत्रिका यावर चर्चा करण्यात यावी असे सुधारित नियमानुसार ठरले आहे.

**ग्रामसभेची विषयपत्रिका :**

ग्रामपंचायतीचे आर्थिक वर्ष १ एप्रिलला सुरू होते आणि ३१ मार्चला संपते. या आर्थिक वर्षात ग्रामसभेच्या चार साधारण व दोन विशेष बैठका भरतात. १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी या दोन दिवशी होणाऱ्या बैठका विशेष असतात. इतर साधारण चार बैठकांपैकी पहिली बैठक आर्थिक वर्षातील सुरुवातीच्या दोन महिन्यांत बोलावली जाते. पहिल्या बैठकीनंतर सहा महिने पूर्ण होण्याच्या आत ग्रामसभेची दुसरी बैठक होते. इतर दोन बैठका ग्रामपंचायतीच्या सोयीनुसार होतात. ग्रामसभेच्या पहिल्या बैठकीसमोर पुढील विषय चर्चेला व मान्यतेला ठेवले जातात.

(१) मागील वर्षात ग्रामपंचायतीने केलेल्या विकासकार्याच्या प्रशासकीय अहवालाचे वाचन.



(२) मागील वर्षात ग्रामपंचायतीने केलेल्या जमाखर्चाचे घटकवार वाचन.

(३) मागील वर्षातील लेखापरीक्षण अहवालाचे वाचन करणे आणि त्या वर्षात लेखा परीक्षण अहवालाला ग्रामपंचायतीने जी उत्तरे दिली असतील त्याचे वाचन.

(४) ग्रामपंचायतीने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकाचे वाचन आणि त्यानुसार चालू वर्षात होती घेतल्या जाणाऱ्या विकासकार्याची माहिती.

(५) पंचायत समिती किंवा जिल्हा परिषदेने सुचविलेले विषय.

(६) राज्य सरकारने सुचविलेले विषय.

वरील विषयांव्यतिरिक्त ग्रामपंचायतीला आवश्यक असणारे विषय ग्रामसभेत चर्चेला घेतले जातात. ग्रामसभेच्या दुसऱ्या बैठकीतील विषयपत्रिकेत पुढील विषयांचा समावेश होतो.

(१) सहा महिन्यांत ग्रामपंचायतीकडून झालेला जमाखर्च

(२) चालू वर्षात ग्रामपंचायतीने केलेली विकासकामे.

(३) चालू वर्षातील राहिलेल्या कालावधीत ग्रामपंचायतीकडून केली जाणारी विकासकामे

(४) ग्रामपंचायतीचे पुढील वर्षाचे अंदाजपत्रक

(५) वरील विषयांव्यतिरिक्त आवश्यक वाटणारे इतर विषय.

**ग्रामसभा अध्यक्षाचे अधिकार व कार्ये :**

ग्रामसभेची बैठक बोलावण्याचा अधिकार सरपंचाला असल्यामुळे तोच ग्रामसभेचा अध्यक्ष असतो. सरपंच गैरहजर असल्यास उपसरपंच ग्रामसभेचे अध्यक्षपद भूषवितो. सरपंच आणि उपसरपंच दोघेही गैरहजर असल्यास सदर बैठकीत एका ग्रामपंचायत सदस्याची ग्रामसभेच्या अध्यक्षपदी निवड केली जाते. ग्रामसभेच्या अध्यक्षाचे प्रमुख अधिकार पुढीलप्रमाणे –

(१) ग्रामसभेची बैठक बोलावणे व बैठकीचे अध्यक्षस्थान भूषविणे.

(२) ग्रामसभेची नोटीस काढणे व ती प्रसिद्ध करणे.

(३) ग्रामसभेपुढे चर्चेला घ्यावयाच्या विषयाला ग्रामपंचायतीच्या बैठकीत मान्यता देणे.

(४) ग्रामसभेची गणपूर्ती पाहणे आणि ग्रामसभेसाठी आवश्यक तेवढे सभासद हजर नसल्यास ग्रामसभा तहकूब करणे.

(५) ग्रामसभेच्या बैठकीत चर्चेसाठी ग्रामसभा सदस्यांनी सुचविलेल्या विषयांना विषयपत्रिकेत समाविष्ट करणे किंवा नाकारणे.

(६) ग्रामसभेला ग्रामपंचायतीच्या केलेल्या व केल्या जाणाऱ्या कार्याची माहिती देणे.

(७) ग्रामसभेच्या सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे.

(८) ग्रामसभेच्या नोटीसमध्ये समाविष्ट असलेले विषय क्रमवार चर्चेस घेऊन त्यावर निर्णय घेणे.

(९) ग्रामसभा सदस्यांना एखाद्या विषयावर त्याचे मत मांडण्यास परवानगी देणे.

(१०) ग्रामसभेच्या अधिकारक्षेत्रात न येणाऱ्या विषयांवर चर्चेस परवानगी नाकारणे.

(११) ग्रामसभेच्या बैठकीतील विषयावर चर्चा करताना गरज भासल्यास ठरावावर मतदान घेणे.

Scanned with OKEN Scanner

(१२) ग्रामसभेच्या बैठकीतील कामकाजाचे नियमन व नियंत्रण करणे.

(१३) ग्रामसभेत भाग घेण्यावरून एखाद्या सदस्याबाबत निर्माण झालेल्या वादावर निर्णय देणे.

**ग्रामसभेचे अधिकार व कार्ये :**

महाराष्ट्र शासनाने मुंबई ग्रामपंचायत अधिनियम - १९५८ मध्ये सुधारणा करून १६ ऑक्टोबर २००२ च्या अध्यादेशानुसार ग्रामसभेच्या अधिकारात वाढ केली आहे. राज्याच्या विधानसभेसारखे कार्य ग्रामसभेने गावासाठी करावे या अपेक्षेने ग्रामसभेचे अधिकार वाढविण्यात आले आहेत. ग्रामसभेचे प्रमुख अधिकार पुढीलप्रमाणे :

(१) ग्रामपंचायतीच्या विकास कार्यक्रमांना मान्यता देणे.

(२) शासनाच्या विकास योजनांसाठी लाभधारकांची निवड करणे.

(३) ग्रामपंचायतीला मार्गदर्शक सूचना करणे.

(४) मागील ग्रामसभेतील कार्याचा वृत्तांत वाचून दाखविणे व त्याला मंजुरी देणे.

(५) ग्रामपंचायतीचा वार्षिक लेखा अहवालास मान्यता देणे.

(६) ग्रामपंचायतीने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकाचे वाचन करणे.

(७) ग्रामपंचायतीने चालू वर्षात केलेल्या विकास कार्यक्रमांचा आढावा घेणे.

(८) पुढील वर्षासाठी ग्रामपंचायतीला कराव्या लागणाऱ्या विकास कार्याक्रमांची दिशा निश्चित करणे.

(९) ग्रामपंचायात कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या गैरप्रकारासंबंधीचा अहवाल गटविकास अधिकाऱ्यास देणे.

(१०) ग्रामपंचायतीवर नियंत्रण ठेवणे.

(११) ग्रामपंचायतीला मार्गदर्शक सूचना करणे.

(१२) राज्य सरकारने वेळोवेळी सोपविलेल्या जबाबदाऱ्या पार पाडणे.

(१३) पुढील ग्रामसभेच्या दिनांक, वेळ व ठिकाण अगोदरच्या सभेत निश्चित करणे.

(१४) ग्रामपंचायतीशी विचारविनिमय करून ग्रामविकास समित्या गठित करणे.

**ग्रामसभेचे स्थान व महत्त्व :**

आता गावच्या विकासाचे निर्णय ग्रामसभेत होणार आहेत. विकास योजनांचे अंदाजपत्रक तयार करणे, त्यास मान्यता देण्याबरोबरच जवाहर रोजगार योजना, संजय गांधी योजना, इंदिरा आवास योजना, समाजकल्याण खात्याच्या विविध योजनांचे लाभार्थी (लाभधारक) निवडण्याचे अधिकार ग्रामसभेला मिळाले आहेत. यशवंत ग्रामसमृद्धीसारख्या योजनांमुळे गावाचा विकास करण्यासाठी कोणताही विकास योजना आखायच्या, याचे अधिकारही ग्रामसभेस मिळाले आहेत. गावातील किंवा गावाच्या परिसरातील दारूची दुकाने बंद करण्याबाबतचे अधिकारही शासनाने ग्रामसभांना दिले आहेत, त्यामुळे साहजिकच ग्रामसभांचे महत्त्व वाढलेले आहे.



ग्रामसभांचे महत्त्व वाढल्याने आणि त्यांना व्यापक अधिकार मिळाल्याने यापुढे ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांना आणि ग्रामसभेच्या सदस्यांना डोळसपणे काम करावे लागणार आहे. खेड्यातील जनता अशिक्षित असल्याने त्यांचा गैरफायदा याआधी घेण्यात आला. हे चित्र बदलण्यासाठी आता ग्रामस्थांना जागरूक बनवायला हवे. यासाठी गावातील पुढाऱ्यांनी, समाजसेवकांनी, शासकीय अधिकाऱ्यांनी व्यापक प्रयत्न करून समाजात जागृती निर्माण करायला हवी. ग्रामसभा जागृत झाल्यास राळेगणसिद्धी, हिवरेबाजार या गावांप्रमाणेच इतरही गावांचाही विकास होईल आणि ग्रामस्वराज्याचे महात्मा गांधी यांचे स्वप्न साकार होऊ शकेल. शासकीय योजनांचा लाभ खऱ्या अर्थाने लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवून त्यांचा आर्थिक विकास साधण्याबरोबर सामाजिक क्रांतीचे ध्येयही जागरूक ग्रामसभा असल्यास साध्य होऊ शकेल.

**ग्रामपंचायत बरखास्तीचा ग्रामसभेला अधिकार :** आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे आढळून आल्यास अशी ग्रामपंचायत बरखास्त करण्याचे अधिकार ग्रामसभेला देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी ग्रामसभेला असे अधिकार देण्याची मागणी केली होती. राज्य सरकारने ती मान्य करण्याची लेखी हमी दिल्यानंतर हजारे यांनी उपोषण मागे घेतले होते.

आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या ग्रामपंचायती, सरपंच आणि उपसरपंच यांच्याविरुद्ध अविश्वास ठराव मांडून ग्रामपंचायत बरखास्त करण्याचे अधिकार नवीन तरतुदीमुळे ग्रामसभेला मिळाले आहेत. यामुळे आर्थिक व्यवहारावर ग्रामसभेचे नियंत्रणही प्रस्थापित झाले आहे. ७३ व्या घटनादुरुस्तीनंतर ग्रामसभेचे अधिकार व कर्तव्य यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. गावातील विकासकामे सुरू करणे; तसेच त्याच्या खर्चाला मान्यता देण्याचे अधिकार यापूर्वीच ग्रामसभेला देण्यात आले आहेत. खर्चाला पूर्वपरवानगी देण्याचे अधिकारही ग्रामसभेला देण्यात आले आहेत. तथापि, ग्रामपंचायत अथवा सरपंच, उपसरपंचाकडून होणाऱ्या आर्थिक व्यवहारावर ग्रामसभेचे नियंत्रण ठेवण्याची कायद्यात तरतूद नव्हती. यासाठी पुढील निर्णय घेण्यात आले.

(१) प्रत्येक खर्चाचे विवरण ग्रामपंचायतीने प्रत्येक ग्रामसभेपुढे ठेवले पाहिजे.

(२) ग्रामपंचायत किंवा सरपंच किंवा उपसरपंच यांच्याकडून अनियमितता अथवा गैरव्यवहार झाल्याचे ग्रामसभेच्या निदर्शनास आल्यास ग्रामसभा अशा प्रकरणात गटविकास अधिकाऱ्यांकडून चौकशी करण्याचा ठराव मंजूर करेल. गटविकास अधिकारी त्याबाबतचा अहवाल एका महिन्यात ग्रामसभेला सादर करतील.

(३) अधिकारांचे उल्लंघन करून ग्रामपंचायतीने कोणताही खर्च केलेला असल्यास अशा ग्रामपंचायतीविरुद्ध अविश्वास ठराव दाखल करून ग्रामसभेच्या एकूण सदस्यांच्या किमान दोन तृतीयांश बहुमताने तो संमत करण्याचे अधिकार ग्रामसभेला राहतील.

(४) अशा आर्थिक अनियमितेस फक्त सरपंच अथवा उपसरपंच जबाबदार असल्यास अविश्वास ठराव केवळ सरपंच अथवा उपसरपंच यांच्याविरुद्ध किंवा दोघांविरुद्ध [illegible] येईल.

SMT. A… …GONDA PATIL
…VIDYALAYA,
…LIBRARY
ACC.No.

अविश्वास ठरावावर चर्चा करण्यासाठी आयोजित केलेल्या विशेष सभेचा पीठासीन अधिकारी किमान तहसीलदार दर्जाचा अधिकारी असेल. ग्रामपंचायतीविरुद्ध संमत झालेला अविश्वास ठराव तहसीलदार दहा दिवसांत विभागीय आयुक्तांकडे सभेच्या इतिवृत्तासह सादर करतील. ठराव मिळाल्यानंतर एक महिन्यात विभागीय आयुक्त अशी ग्रामपंचायत बरखास्त करतील. या आदेशानंतर १५ दिवसांत शासनाकडे अपील करता येईल आणि शासन त्यावर दोन महिन्यांत निर्णय घेईल.

राज्यसरकारने ग्रामसभेस, आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी ग्रामपंचायत बरखास्त करण्याचा अधिकार देवून ग्राम स्वराज्याच्या दिशेने एक आश्वासक पाऊल पुढे टाकले असले तरी या निर्णयाचे दूरगामी परिणाम पुढील काळात होणार आहेत. या अधिकाराचा दुरुपयोग होवू नये यासाठी आता ग्रामीण नागरिकांनाच दक्ष रहावे लागणार आहे.

७३ राव्या घटनादुरुस्तीमुळे ग्रामसभांना व्यापक अधिकार मिळाले आहेत. ग्रामसभेला अधिकार देऊन तिला सक्षम करणे हीच ७३व्या घटनादुरुस्तीमधील सर्वात महत्त्वाची तरतूद आहे.गावातील विकासकामांचा प्राधान्यक्रम ठरविण्याचा, लाभार्थी निवडण्याचा, आर्थिक ताळेबंदास मान्यता देण्याचे अधिकार या आधीच बहाल करण्यात आले आहेत. मात्र त्या सर्व अधिकाराच्या तुलनेत भ्रष्टाचार करणारी ग्रामपंचायत बरखास्त करण्याचा अधिकार फारच महत्त्वपूर्ण आहे.

लोकशाही शासनव्यवस्थेत अकार्यक्षम व **भ्रष्ट जनप्रतिनिधींना त्यांची मुदत संपण्यापूर्वी परत बालविण्याचा अधिकार** (recall चा अधिकार) अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. कारण या अधिकारातून जनतेचे म्हणजे मतदाराचे सार्वभौमत्व स्पष्ट होते. स्वित्झर्लंडसह युरोपातील काही देशांमधील नागरिकांना प्रतिनिधी परत बोलाविण्याचा म्हणजे Recall चा अधिकार मिळाला आहे. सरपंच, उपसरपंच यांच्याविरुद्ध अविश्वासाचा ठराव मंजूर करण्याचा आणि ग्रामपंचायतीला बरखास्त करण्याचा अधिकार ग्रामसभेला देणे हे जवळपास प्रतिनिधी परत बोलाविण्याच्या अधिकारासारखेच आहे. म्हणूनच भारतासारख्या विशाल लोकसंख्या आणि अनेक बाबतीत विविधता असणाऱ्या देशात प्रत्यक्ष लोकशाहीचा अभिनव प्रयोग असे ग्रामपंचायतीला बरखास्त करण्याच्या ग्रामसभेच्या अधिकाराच्या संदर्भात म्हणता येईल.

## ग्रामीण विकासात ग्रामीण स्वशासनाची भूमिका

## (Role of Rural Local Self Government in Rural Development)

ग्रामीण विकास ही १९५० च्या दशकातील भारताची तातडीची गरज होती. कारण सुमारे १५० वर्षांच्या ब्रिटिश राजवटीत ग्रामीण अर्थव्यवस्था पूर्णतः मोडकळीस आली होती. ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या व्यापारी व औद्योगिक धोरणामुळे ग्रामीण कुटीर उद्योग वा ग्रामोद्योग पार बुडाले होते. रोजगारासाठी शेतीवरचा भार अतोनात वाढला होता. शेतीला पाणीपुरवठ्याच्या सोयींचा अभाव असल्यामुळे हंगामी बेरोजगारीचा प्रश्न उग्र झाला होता. व्यापार वृद्धीला सर्वोच्च महत्त्व देणाऱ्या ब्रिटिश राज्यकर्त्यांनी ग्रामीण विकासाकडे पूर्णतः दुर्लक्ष केले होते.



असंख्य खेड्यांमध्ये आधुनिक शिक्षण देणाऱ्या शाळा देखील नव्हत्या. ग्रामीण भागात निरक्षरतेचे प्रमाण ६० टक्क्यांपेक्षाही अधिक होते. खेड्यात राहणारी फारच थोडी मुले तालुक्याच्या ठिकाणी राहून आपले शालेय शिक्षण पूर्ण करीत असत. दवाखान्यांच्या कोणत्याही सोयी बहुतांश खेड्यांमध्ये नव्हत्या. यामुळे प्रसुती काळातील मृत्यूच्या प्रमाणात वाढ झालेली होती. बालमृत्यूचे प्रमाणही वाढले होते. ग्रामीण जनतेच्या सार्वजनिक आरोग्याची अबाळ होत असल्यामुळे सरासरी आयुर्मान २९-३० वर्षापर्यंत घटले होते. ग्रामीण भागात पक्क्या रस्त्यांचा अभाव होता. यामुळे ग्रामीण-नागरी दळणवळणाची व्यवस्था फारच कमकुवत झाली होती. थोडक्यात ग्रामीण क्षेत्र मोठ्या प्रमाणावर उद्ध्वस्त करून ब्रिटिशांनी भारत सोडला होता. यामुळे ग्रामीण क्षेत्राची घडी नव्याने बसविण्यासाठी विकास कार्यक्रमांची आखणी व अंमलबजावणी करणे ही १९५० च्या दशकातील भारताची तातडीची गरज होती.

### प्रास्ताविक :

स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने नियोजन आयोग निर्माण करून त्याचेवर विकासासाठीच्या पंचवार्षिक योजना तयार करण्याची जबाबदारी सोपविली. १९५२ मध्ये पहिल्या पंचवार्षिक योजनेचा प्रारंभही झाला. २ ऑक्टोबर १९५२ रोजी म्हणजे गांधी जयंतीच्या मुहूर्तावर सामुदायिक विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरू झाली. प्रारंभी सामुदायिक विकास कार्यक्रमांची अंमलबजावणी देशाच्या काही निवडक भागांमध्ये करण्यात आली. वर्ष-दोन वर्षानंतर मात्र सामुदायिक विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचे क्षेत्र देशव्यापी झाले. १९५२ ते १९५७ या पाच वर्षाच्या कालावधीत सामुदायिक विकास कार्यक्रम राबविण्यावर करोडो रुपये खर्च करण्यात आले. परंतु त्याचे फारसे सुपरिणाम दिसत नव्हते. म्हणून केंद्र सरकारने ग्रामीण विकास कार्यक्रमाचे मूल्यांकन करून त्यावर योग्य शिफारशी करण्यासाठी बलवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीने केलेल्या शिफारशींना मंजुरी देण्यामधूनच पंचायतराज व्यवस्थेची निर्मिती व प्रारंभ झाला आहे. अशाप्रकारे जिल्हा परिषद पंचायत समिती आणि ग्रामपंचायत या **ग्रामीण स्थानिक स्वशासन संस्थांचा उदय ग्रामीण विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीतून झाला आहे**. विकासात ग्रामीण स्वशासनाच्या भूमिकेचे अध्ययन करण्यासाठी सर्वप्रथम विकासाचा अर्थ समजून घेणे आवश्यक ठरते.

### विकासाचा अर्थ :

विकास हा ग्रामीण क्षेत्रातील असो वा नागरी क्षेत्रातील असो विकास म्हणजे केवळ काही यांत्रिक स्वरुपाचे (Mechanical) बदल नव्हे. दुधदुभत्याचे पदार्थ आणि अन्नधान्ये यांच्या उत्पादनात वाढ, दळणवळणाच्या साधनांमध्ये वाढ, शिक्षण व आरोग्य रक्षणाच्या सोईसुविधांमध्ये वृद्धी या सर्व गोष्टींचा विकासाशी जवळचा संबंध आहे. परंतु केवळ विमानतळ व उड्डानपुलांची निर्मिती, खत, किटकनाशके आणि अन्नधान्य यांच्या उत्पादनातील वाढ म्हणजे विकास नव्हे. कारण अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ झाल्यानंतरही भूकबळी पडत असतील किंवा दुधदुभत्याच्या पदार्थांचे उत्पादन वाढल्यानंतरही कुपोषणाची समस्या कायमच असेल तर त्याला

Scanned with OKEN Scanner

विकास असे संबोधणे योग्य होणार नाही. विकास ही मूलतः मानवी प्रक्रिया आहे. सर्वसामान्य मनुष्य हा विकासाच्या प्रक्रियेचा केंद्रबिंदू आहे.

संख्यात्मक वाढीपेक्षा गुणात्मक बदलांशी विकासाचा अधिक निकटचा संबंध आहे. भूकबळी पडत नसतील, शिक्षण घेण्याच्या हक्कापासून कोणीही वंचित नसेल आणि सर्वसामान्य लोकांच्या आयुर्मानात आणि सुखसमाधानात वाढ झालेली असेल तर त्याला खऱ्या अर्थाने विकास असे संबोधणे योग्य होईल. अशाप्रकारे विकास ही मूलतः मानवी प्रक्रिया आहे. विकास ही गुणात्मक स्वरूपाचे बदल घडवून आणणारी प्रक्रिया आहे. विकासप्रक्रिया म्हणजे शेती, उद्योग, दळणवळण, शिक्षण, आरोग्य व अन्य संलग्न क्षेत्रात झालेली प्रगती म्हणजे गुणात्मक सुधारणा होय. थोडक्यात समाजजीवनाच्या विभिन्न क्षेत्रात दर्जात्मक म्हणजे गुणवत्तात्मक सुधारणा होणे हे विकासामध्ये अपेक्षित असते. म्हणूनच विकास घडवून आणणे हे काम वाटते तितके सोपे नाही असे म्हणता येते. त्यासाठी कठोर परिश्रम, समर्पण आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांची गरज असते. शासनव्यवस्थेतील राजकीय आणि प्रशासकीय अशा दोन्ही प्रकारच्या पदधारकांमध्ये प्रतिसादक्षमता आणि उत्तरदायित्वाची प्रवृत्ती असल्याशिवाय खऱ्या अर्थाने विकास घडून येऊ शकत नाही.

विकासाचा संबंध एखाद्या विशिष्ट स्थिती अथवा अवस्थेशी नाही. कारण विकास ही सतत सुरू असणारी प्रक्रिया आहे. केवळ भौतिक वस्तु वा संपत्तीमध्ये वाढ झाली म्हणजे विकास झाला असे सरळ व साधे समीकरण देखील मांडता येत नाही. विकासाचा संबंध सर्वसामान्य व्यक्तीच्या भौतिक सुखाप्रमाणेच मानसिक सुखाशी देखील आहे. बाजारपेठीय अर्थव्यवस्थेमुळे एकीकडे विभिन्न प्रकारच्या वस्तूंची उपलब्धता वाढली आहे. तसेच दुसरीकडे स्पर्धात्मक स्थितीला तोंड देण्यामधून मानसिक ताणतणावातही प्रचंड वाढ झालेली आहे. अशा स्थितीत सर्वसामान्य व्यक्तीला सामाजिक सुरक्षा मिळण्याची स्थिती असल्यास तिच्या ताणतणावात घट होऊन मानसिक समाधानात वाढ होऊ शकते. सामाजिक सुरक्षा मिळण्याची शाश्वती (खात्री) ही व्यक्तीला मानसिक सुखसमाधान मिळवून देणारी असते. म्हणूनच विकासाच्या प्रक्रियेत सामाजिक सुरक्षेमध्ये वाढ होणे देखील अपेक्षित आहे. थोडक्यात विकास ही एक जटील वा गुंतागुंतीची प्रक्रिया आहे असे म्हणता येईल.

**ग्रामीण विकासाचे प्रश्न :**

'इच्छित किंवा हेतूपूर्वक दिशेने होणारे परिवर्तन', (directed change) हा संपूर्ण भारतात सुरू असलेल्या विकास कार्यक्रमाचा महत्त्वपूर्ण पैलू आहे. ग्रामीण लोकांच्या जीवनशैलीत काही गुणात्मक स्वरूपाचे बदल वा परिवर्तन घडवून आणणे हे ग्रामीण विकास कार्यक्रमाचे ध्येय आहे. ग्रामीण विकासाच्या ध्येयाचे (उद्दिष्टाचे) स्वरूप लक्षात घेऊन त्यांना विशिष्ट नावाने संबोधिले जाते. उदा. 'सामुदायिक विकास कार्यक्रम', 'अंतोदय कार्यक्रम', 'ग्रामीण पुनर्रचना कार्यक्रम', 'एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम' (IRDP) इत्यादी. अशाप्रकारे एका विशिष्ट नावाने संबोधिल्या जाणाऱ्या ग्रामीण विकास कार्यक्रमांची एकूण संख्या २० पेक्षा अधिक आहे. ग्रामीण



विकास कार्यक्रम हे ग्रामीण समाजाच्या विकास प्रश्नांशी अथवा सामाजिक समस्यांच्या निर्मूलनाशी निगडित असणार हे उघड आहे. म्हणून ग्रामीण विकास कार्यक्रम समजून घेण्यासाठी सर्वप्रथम ग्रामीण विकासाचे प्रश्न समजून घेणे आवश्यक ठरते असे म्हणता येईल.

कृषी, पाटबंधारे, कुटीरउद्योग (ग्रामोद्योग) यांचा विकास होण्यावरच ग्रामीण विकास अवलंबून आहे. शेती व्यवसायातील उत्पादित माल व ग्रामोद्योगातील उत्पादित माल बाजारपेठेत पोहचणे, त्यांच्या विक्रीसाठीची सुलभ आणि ग्रामवासियांच्या हिताचे रक्षण करणारी व्यवस्था निर्माण होणे आवश्यक आहे. म्हणून दळणवळणाचे आधुनिक मार्ग ग्रामीण भागात निर्माण होणे आवश्यक ठरते. असे ग्रामीण विकासाचे व्यापक स्वरूप आहे. ग्रामीण विकासाच्या काही ठळक प्रश्नांचे स्वरूप पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**(१) कृषिविकासाचे प्रश्न :** खेड्याचे व ग्रामीण विकासाचे प्रश्न हे प्रामुख्याने कृषिविकासाशी निगडित आहेत. दुष्काळ व महापूर या नेहमीच्या नैसर्गिक आपत्तीमधून ग्रामवासियांची सुटका करण्यासाठी पाटबंधाऱ्याच्या सोयी अधिक प्रमाणात निर्माण होणे आवश्यक आहे. अधिक उत्पादन देणारी बी-बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, कृषीविषयक आधुनिक तंत्रज्ञान या सर्व गोष्टी उपलब्ध होण्यावर कृषी विकास अवलंबून आहे. शेतीत पिकणाऱ्या अन्नधान्याच्या मागणीला एक मर्यादा असते. उदा. गहू किंवा तांदुळाची एकूण मागणीच ५ कोटी टन असेल आणि कृषी विकासामुळे गव्हाचे उत्पादन ८ कोटी टनांपर्यंत वाढले तरीही समस्या निर्माण होतात. शेतकऱ्यांचा सर्व गहू विकल्या जात नाही. आज अन्नधान्याच्या उत्पादनाबाबत अशी अवस्था जवळपास निर्माण झाली आहे. म्हणून फळबागा, फुलांची शेती, वनऔषधी शेती, दूधाचा महापूर या सर्वांना कृषी विकासाचे किंवा ग्रामीण विकासाचे प्रश्न असे स्वरूप प्राप्त झाल्याचे आपल्या अनुभवास येत आहे. अशाप्रकारे कृषी विकासाच्या प्रश्नांचे स्वरूप आज अत्यंत विशाल झाले आहे.

**(२) ग्रामोद्योगांच्या विकासाचे प्रश्न :** शेतीव्यवसायासाठी पूरक अशा उद्योगांचा विकास होण्यावरच ग्रामीण विकास अवलंबून आहे. कारण कृषीउद्योगापेक्षा बिगर शेती उद्योगामध्ये अधिक लोकांना सामावून घेण्याची क्षमता असते. खेड्यामधील गृहउद्योग, कुटीर उद्योग, हस्तकलेच्या वस्तू व खादीची निर्मिती यांच्या विकासांवर गेल्या ५० वर्षात करोडो रुपये खर्च झाले आहेत. या सर्व अनुभवातून त्यांच्या वाढीच्या मर्यादा स्पष्ट झाल्या आहेत असे वस्तुनिष्ठपणे म्हणता येईल. म्हणून आता कृषिमालावर प्रक्रिया करणारे उद्योग, डेअरी उद्योग आदींना ग्रामीण विकासात अधिक महत्त्व प्राप्त झाले असल्याचे दिसून येते. अधिक दूध देणाऱ्या जनावरांच्या जाती, दूध देणाऱ्या जनावरांचे (पशूधनाचे) आरोग्य, त्यांच्यासाठी सकस चारा, फळ प्रक्रिया उद्योग या सर्वांना ग्रामीण उद्योगाच्या (Village Industry) विकासाचे प्रश्न असे स्वरूप प्राप्त झाले आहे. या सर्व ग्रामीण उद्योगांचा विकास तसेच कृषीमालाच्या विक्रीची योग्य व्यवस्था या दृष्टीने 'सहकारी संस्था' महत्त्वपूर्ण ठरतात. सहकारी संस्थांच्या निर्मितीमुळे (सहकार चळवळीमुळे) पश्चिम महाराष्ट्रातील ग्रामीण विकासाला चालना प्राप्त झाल्याचा अनुभव आहे.

Scanned with OKEN Scanner

आता राजकीय स्वार्थविरहित वा प्रामुख्याने भ्रष्टाचारविरहित सहकारी संस्था निर्माण करणे हा ग्रामीण विकासाचा प्रश्न झाला आहे.

(३) **ग्रामीण सार्वजनिक आरोग्य स्तराच्या विकासाचे प्रश्न :** खेड्यामध्ये शुद्ध जलपेयाची सोय उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट आपण गेल्या ५० वर्षात गाठू शकलो नाही हे वास्तव आहे. भारतात वैद्यकीय शिक्षणाचा विस्तार झाला आहे. डॉक्टरांची व पारिचारिकांची संख्या पूर्वीपेक्षा प्रचंड वाढली आहे. हे सत्य असले तरीही भारतीय खेड्यांमध्ये सार्वजनिक आरोग्यकेंद्रे पुरेशा संख्येत नाहीत. जी आहेत त्यामध्ये प्रशिक्षित डॉक्टर व अन्य वैद्यकीय सोयी नाहीत. म्हणून बहुतांश ग्रामवासियांना आपल्या आरोग्यविषयक प्रश्नांसाठी जवळपासच्या शहरांकडे धाव घ्यावी लागते. काही निर्धन ग्रामवासियांना आरोग्यविषयक प्रश्नांसाठी शहरामध्ये जाणे शक्य होत नाही. त्यांच्यावर अप्रशिक्षित व अकुशल 'वैदू' कडून औषध घेऊन स्वतःचे आरोग्य बिघडवून घेण्याची पाळी येते. ग्रामीण शालेय विद्यार्थ्यांना सकस आहाराची सोय उपलब्ध करून देणे हा ग्रामीण विकासाशी निगडित असणारा प्रश्न आहे.

(४) **शैक्षणिक विकासाचे प्रश्न :** अद्यापही प्राथमिक शिक्षणापासून वंचित असणारी मुले अनेक खेड्यांमध्ये आहेत. निरक्षरतेचे प्रमाण नागरी समाजापेक्षा ग्रामीण समाजात अधिक आहे. ग्रामीण भागात शालेय शिक्षणातील गळतीचे प्रमाण (शिक्षण सोडून देणे) अधिक आहे. अनेक खेड्यात ज्या प्राथमिक शाळा आहेत त्यात एकतर विद्यार्थी नसतात नाहीतर शिक्षक नसतात. खेड्यामध्ये एक शिक्षकी शाळा आहेत, खडू व फळ्याची सोय नसणाऱ्या शाळा आहेत, पक्क्या इमारती नसणाऱ्या शाळा आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ग्रामीण भागातील शिक्षणाचा दर्जा खालावलेला आहे अशी अनेक ग्रामवासियांची भावना आहे. म्हणून ते आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी शहराकडे धाव घेत असल्याचे दिसून येते. ग्रामीण समाजात साक्षरतेचे, शिक्षणाचे प्रमाण वाढल्याशिवाय ग्रामवासियांमधील अंधविश्वास वा श्रद्धांचा प्रभाव कमी होणे, गामीण स्त्रियांचा दर्जा उंचावणे शक्य नाही असे अभ्यासकांना वाटते.

(५) **ग्रामीण भागात रोजगार संधीच्या विकासाचे प्रश्न :** शेती व्यवसायात हंगामी स्वरूपाची रोजगारसंधी असते. तीही पुरेशा प्रमाणात नाही हे खेड्यातील आजचे वास्तव आहे. खेड्यामधील युवकांना स्वयंरोजगाराच्या संधी मिळवून देणे, त्यांच्यासाठी प्रशिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून हे ग्रामीण विकासाचे प्रश्न आहे.

(६) **राहणीमानाच्या दर्जात सुधारणा घडवून आणण्याचे प्रश्न :** आजही भारतात तीन चतुर्थांश लोक भागात राहतात. दारिद्र्य निर्मूलन हा ग्रामीण विकासाचा प्रश्न ठरतो. ग्रामीण व्यक्तींच्या घरांचा प्रश्न, निराधार ग्रामीण व्यक्तींच्या पालनपोषणाचा प्रश्न यासारखे सर्व प्रश्न हे ग्रामीण विकासाचे प्रश्न आहेत. खेड्यामधील अनुसूचित जाती, जमाती, अन्य मागासवर्गीय जाती आणि स्त्रिया या सर्वांना अन्य समाजघटकांच्या बरोबरीचे अधिकार वा स्थान प्राप्त झाल्याशिवाय सामाजिक न्याय प्रस्थापित होऊ शकत नाही. खेड्यातील अस्पृश्यता संपुष्टात येणे, ग्रामीण समाजातील जातीयवाद किंवा जाती-जातीमधील ताणतणाव कमी होणे, अंधश्रद्धाचे निर्मूलन होणे



हे सर्व ग्रामीण विकासाचे प्रश्न ठरतात. थोडक्यात ग्रामवासियांच्या जीवनशैलीत सुधारणा घडवून आणण्यासाठी संबंधित असणारे सर्व प्रश्न हे ग्रामीण विकास प्रश्न आहेत असे म्हणता येते.

**ग्रामीण विकास योजनांची निर्मिती व अंमलबजावणी :**

ग्रामीण विकास योजना अथवा कार्यक्रमाचा तपशीलवार आराखडा तयार करणे ही पहिली अवस्था आहे. त्यानंतर त्यांची अंमलबजावणी करणे ही दुसरी अवस्था आहे. विकास कार्यक्रमाच्या अथवा ग्रामीण विकास योजनांच्या या दोन्ही अवस्थांमध्ये स्थानिक स्वशासन संस्थांचा सहभाग असतो. ग्रामीण विकासाच्या योजना केंद्र सरकार, राज्यसरकार, नियोजन आयोग, ग्रामीण विकास मंत्रालय (खाते) अशा स्तरांवर तयार होतात. अशा योजना तयार करण्यासाठी आवश्यक असणारी माहिती अथवा प्राथमिक तथ्ये ही स्थानिक स्वशासन संस्थांद्वारेच पुरविली जातात. ग्रामीण विकास योजना अथवा कार्यक्रम तयार करणे हे त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञांचे कार्य आहे. तज्ज्ञांनी तयार केलेल्या विकास योजनांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ग्रामीण स्वशासन संस्थांवर असते. म्हणूनच ग्रामीण विकासात स्थानिक स्वशासन संस्थांची भूमिका महत्त्वपूर्ण असते असे म्हणता येते. तिचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.

(१) **केंद्र सरकार :** संपूर्ण भारतात ग्रामीण विकासाचे काही प्रश्न समान स्वरूपाचे आहेत. उदा. ग्रामीण भागात बागायती शेतीपेक्षा कोरडवाहू शेतीचे प्रमाण अत्याधिक आहे. म्हणून बेरोजगारी, हंगामी बेरोजगारी, गरीबी वा दारिद्र्य यासारखे प्रश्न हे ग्रामीण भागातील मुख्य प्रश्न आहेत. त्यांचे निराकरण करण्यासाठी ग्रामीण रोजगार हमी योजना, स्वर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना, इंदिरा आवास योजना यासारख्या विविध योजनांची म्हणजेच ग्रामीण विकास कार्यक्रमांची निर्मिती केंद्र सरकारद्वारे झालेली आहे. या योजनांच्या अंमलबजावणीसाठीचा मोठा आर्थिक भार केंद्रसरकारद्वारे उचलला जातो. अशा ग्रामीण विकास कार्यक्रमावर केंद्र सरकारद्वारे करोडो रुपये खर्च केले जातात. केंद्र सरकारमध्ये ग्रामीण विकास खाते (मंत्रालय) आहे. त्या खात्याचे ग्रामीण विकास योजना वा कार्यक्रमावर नियंत्रण असते. राज्यसरकार ग्रामीण विकास कार्यक्रमासाठी केंद्र सरकारने दिलेला पैसा विशिष्ट मुदतीत खर्च करू शकले नाही तर त्यांना तो पैसा केंद्र सरकारला परत करावा लागतो. ग्रामीण विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना राज्यसरकारने काही आर्थिक घोटाळे केल्यास ते उजेडात आणण्याचे कार्य केंद्र सरकार, कॅग आदींद्वारे केले जाते.

केंद्र सरकारने तयार केलेल्या ग्रामीण विकासाच्या काही कार्यक्रमांची अंमलबजावणी जिल्हा परिषद करते. मात्र केंद्र सरकारच्या काही ग्रामीण विकास योजना अधिक चांगल्या रीतीने राबविल्या जाव्यात यासाठी जिल्हा परिषदेला पर्यायी अशी **जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा** उभारण्यात आली आहे. सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमाखाली या यंत्रणेचे अस्तित्व पूर्णतः स्वतंत्र असून केंद्र शासनाच्या ग्रामीण विकासाच्या योजना राबविणे हेच या यंत्रणेचे प्रमुख कार्य आहे. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेची रचना पुढीलप्रमाणे असते.

**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेची रचना :** अध्यक्ष : या संस्थेचे अध्यक्षपद जिल्हा पालक मंत्र्याकडे असते. विभागीय आयुक्त हे संस्थेचे उपाध्यक्ष असतात. आता या संस्थेचे अध्यक्षपद जिल्ह्यातील खासदाराला द्यावे असा शासनाचा विचार आहे.

Scanned with OKEN Scanner

सदस्य : जिल्ह्यामधील विधानसभा व विधान परिषद सदस्य जिल्हा परिषद अध्यक्ष, पंचायत समिती अध्यक्ष, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, जिल्हाधिकारी, जिल्हाधिकाऱ्यांनी नामनिर्देशित केलेला समाजकार्यातील तज्ज्ञ, अनुसूचित जाती, जमाती, महिला आणि अल्पसंख्यांक समाज यांचा प्रत्येकी एक प्रतिनिधी. जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी हे सर्व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे सदस्य असतात. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा ही अशी संस्था आहे की जी जिल्हा पातळीवर ग्रामीण भागात दारिद्र्य निर्मूलनाचे काम करते. या संस्थेस केंद्र सरकार व राज्यसरकार यांचेकडून ७५:२५ या प्रमाणात अनुदान प्राप्त होते. स्वर्ण जयंती, ग्राम स्वयंरोजगार योजना, जवाहर ग्राम समृद्धी योजना, इंदिरा आवास योजना इत्यादी योजनांद्वारे ग्रामीण दारिद्र्याचे निर्मूलन करणे हे या संस्थेचे मुख्य उद्दिष्ट आहे.

(२) राज्य सरकार : केंद्राप्रमाणे घटकराज्यांमध्ये योजना आयोग (नियोजन मंडळ) आहे. घटकराज्यातील ग्रामीण भागाच्या महत्त्वपूर्ण गरजा लक्षात घेऊन राज्ययोजना आयोग ग्रामीण विकासाच्या योजना तयार करतो. त्यांच्या अंमलबजावणीवर राज्यसरकारमधील ग्रामीण विकास मंत्रालयाचे (खात्याचे) नियंत्रण असते. स्थानिक स्तरावर राज्यसरकारच्या ग्रामीण विकास योजनांची अंमलबजावणी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत यांच्याद्वारे केली जाते. राज्याच्या ग्रामीण विकास योजनांचा आर्थिक भार प्रामुख्याने राज्यसरकारवर असतो.

महाराष्ट्र राज्य शासनाने अलीकडच्या काळात ग्रामीण विकासासाठी राबविलेल्या दोन प्रमुख योजना म्हणजे जलस्वराज्य योजना आणि संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान होय.

जलस्वराज्य प्रकल्प : महात्मा गांधीच्या स्वप्नातील 'स्वयंपूर्ण गाव' आणि 'शुद्ध पाणी स्वच्छ गाव' या दोन्ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ही योजना तयार केली आहे. जलस्वराज्य प्रकल्पात ग्रामपंचायतीला केंद्रबिंदू तर ग्रामसभेला केंद्रस्थानी मानले जाते. ग्रामस्थांमध्ये स्वमालकीची जाणीव निर्माण व्हावी यासाठी लोकवर्गणीची संकल्पना या प्रकल्पात स्वीकारण्यात आली आहे. गावातील लोकांना एकूण प्रकल्प खर्चाच्या १० टक्के रक्कम लोकवर्गणी म्हणून जमा करून या प्रकल्पाची मागणी करता येते. या प्रकल्पात पाणी पुरवठा सुरू झाल्यानंतर तिच्या देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी गावाचीच असते. ग्रामपंचायतीने ही जबाबदारी स्वतः पार पाडावी अथवा स्वयंसेवी संस्था वा महिला बचत गटाच्या माध्यमातून पार पाडावी असे अपेक्षित आहे. महाराष्ट्रात या प्रकल्पांतर्गत २ हजार ५०० ग्रामपंचायतींच्या क्षेत्रात पाणीपुरवठा योजनांचा प्रारंभ झाला आहे.

ग्रामीण स्वच्छता : ग्रामीण स्वच्छता आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण असल्याने शोषखड्डे, घनकचरा व्यवस्थापन, संपूर्ण हागणदारी मुक्त होणाऱ्या गावासाठी निर्मलग्राम पुरस्कार योजना यासारखे कार्यक्रम हे जलस्वराज्य प्रकल्पाशी निगडित भाग आहेत.

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान : ग्रामस्थांचे जीवनमान व आरोग्यमान उंचावण्याच्या उद्देशाने २ ऑक्टोबर २००० रोजी महाराष्ट्रात या अभियानाला सुरुवात झाली. स्वच्छतेतून समृद्धीकडे ही संकल्पना मूर्त स्वरूपात आणण्यासाठी या अभियानांतर्गत विविध उपक्रम राबविले जातात.



उदा. स्वच्छताविषयक साहित्याचे प्रदर्शन, प्रचार, प्रसिद्धी व प्रात्यक्षिके, ग्रामसफाई, कचरा मुक्ती, घनकचरा व्यवस्थापन इत्यादी. या अभियानांतर्गत केलेल्या कामाचे रेकॉर्ड ठेवणे हे ग्रामपंचायतींना अनिवार्य आहे. ग्रामपंचायतीने राबविलेल्या अभियानाची तपासणी केली जाते. जिल्हा परिषद मतदारसंघ स्तर, पंचायत समिती स्तर, जिल्हा स्तर, विभाग स्तर, राज्यस्तर यासारख्या विभिन्न स्तरावरून बक्षिसेही या अभियानांतर्गत दिली जातात.

(३) जिल्हा परिषद : जिल्हा परिषदेच्या विविध विभागामार्फत अनेक लोकोपयोगी योजना राबविल्या जातात. यात काही योजना ठराविक काळानंतर बंद होतात तर काही नवीन योजना येतात. तसेच या योजनेच्या अंतर्गत देण्यात येणाऱ्या अनुदानासंबंधी नियम आणि देण्यात येणारी रक्कम यातही फेरबदल होत असतात. जिल्हा परिषदेच्या विविध विभागांद्वारे राबविल्या जाणाऱ्या काही योजनांचा ठळक तपशील पुढीलप्रमाणे

कृषी विभाग : केंद्र आणि राज्य शासन शेतीच्या विविध योजना आखत असते. त्या गावपातळीवरील शेतकऱ्यापर्यंत पोहचविण्याची जबाबदारी ही जिप आणि पंचायत समितीमधील कृषी विभागाची (खात्याची) आहेत. उदा. तृणधान्य उत्पादन वाढीसाठी प्रोत्साहन दिले जाते. भात, मका, गहू यांच्या प्रमाणित बियाणांसाठी २०० रुपये तर ज्वारी, बाजरी, रागीसाठी प्रतिक्विंटल ४०० रुपये अनुदान दिले जाते. तुषार सिंचनासाठी अनुदान दिले जाते. बायोगॅस प्रकल्पास प्रोत्साहन दिले जाते. अधिकाधिक तृणधान्याचे उत्पादन घेणाऱ्याला राज्यशासनातर्फे 'आदर्श शेतकरी' हा पुरस्कार देऊन गौरविले जाते. ट्रॅक्टर खरेदीसाठीही अनुदान दिले जाते.

लघु पाटबंधारे विभाग : शासनाने पाझर तलावासाठी जि.प. ला ४ लाख ५८ हजार रुपयांचे अनुदान देण्याचे निश्चित केले आहे. कोल्हापूर पद्धतीचे बांधारे बांधण्यासाठीही अनुदान दिले जाते. पाझर, तलाव, गावतळी, वळण बंधारे इत्यादी योजना राबविण्यासाठी जि.प. ला निधी उपलब्ध करून दिला जातो.

आरोग्य विभागाच्या योजना : एकही मुलगा नसताना एक अथवा दोन मुलींच्या जन्मानंतर जी जोडपी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करून आपल्या कुटुंबाचा आकार लहान ठेवतात अशा जोडप्यांकरिता व त्यांच्या मुलींसाठी 'सावित्रीबाई फुले कन्या कल्याण पारितोषिक योजना' राज्य शासनाने १ एप्रिल १९९५ पासून सुरू केली आहे. मूत्रपिंड, हृदयविकार, कॅन्सर यासारख्या रोगांशी निगडीत मोफत शस्त्रक्रिया करण्यासाठी गरजूंना सहाय्य दिले जाते. माता-बालसंगोपन कार्यक्रम राबविले जातात. या कार्यक्रमांतर्गत प्रसूतीपूर्व आणि प्रसुतीनंतरही सेवा पुरविली जाते. बालकांसाठी लसीकरणाचा कार्यक्रम राबविला जातो. याशिवाय या विभागातर्फे कुटुंब कल्याण कार्यक्रम, गलगंड नियंत्रण कार्यक्रम, एडस् प्रतिबंधक कार्यक्रम यासारखे विभिन्न कार्यक्रम राबविले जातात.

समाजकल्याण विभाग : आपद्ग्रस्तांना मदत दिली जाते. शालेय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. तसेच विद्यार्थ्यांना सायकलीही पुरविल्या जातात. शिलाई मशीन, चारचाकी हातगाडी मोफत वा नाममात्र किंमतीवर पुरविल्या जातात. हरिजन वस्तीत गटारे बांधण्यासाठी एक लाख

Scanned with OKEN Scanner

रुपयांपर्यंतचा खर्च करण्याचा अधिकार पंचायत समितीला आहे. मागासवर्गीयांना घरदुरुस्तीसाठी अनुदान दिले जाते. मागासवर्गीय मुलांसाठी संगणक प्रशिक्षणाची सोय केली जाते. याशिवाय आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन, दलित वस्तीत सुधारणा, मागासवर्गीय मुलांना वस्तीगृहात प्रवेश यासारख्या कामांसाठी आर्थिक सहाय्य दिले जाते.

जिल्हा परिषदेतील महिला व बाल कल्याण विभाग, शिक्षणविभाग, पशुसंवर्धन खाते यांच्यातर्फे देखील ग्रामीण विकासाचे कार्य राबविले जातात.

(४) **प्रभाग समिती :** प्रभाग म्हणजे जिल्हा परिषदेचा मतदारसंघ होय. त्यात ग्रामीण विकासाचे कार्यक्रम राबविण्यासाठी समितीची स्थापना केली जाते. अहमदनगर जिल्हा परिषद ही प्रभाग समित्या स्थापन करणारी महाराष्ट्रातील पहिली जिल्हा परिषद आहे. अन्य जिल्हा परिषदांनी अहमदनगर जि.प. चा आदर्श ठेऊन प्रभाग समितीची स्थापना केली आहे.

**प्रभाग समितीची स्थापना :** स्थानिक नागरिक तसेच लोकप्रतिनिधींचा नियोजनामध्ये सक्रीय सहभाग घेण्याबरोबरच कार्यक्रमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी प्रशासनामार्फत योग्यरितीने होते किंवा नाही यावर ग्रामस्थांनी तसेच लोकप्रतिनिधींनी लक्ष ठेवणे आवश्यक आहे. ग्रामपंचायतीवर अनेक प्रकारच्या विकास कामांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. यामध्ये ग्रामीण शौचालये, प्राथमिक शाळांच्या खोल्या, समाज मंदिरे, रस्त्यालगतची गटारे इ. व्यापक प्रमाणात राबविण्यात येणाऱ्या विकास कामांचाही समावेश होतो. अशा विविध प्रकारच्या योजना राबविताना ग्रामपंचायतींनी आपला कारभार चोख ठेवणे, कामाचा दर्जा उत्तम ठेवणे व आर्थिक गैरप्रकार होणार नाहीत. याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. ग्रामस्थांना तसेच कर्मचाऱ्यांना त्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या यांची जाणीव करून देऊन त्यांचा सक्रीय सहभाग होण्यासाठी प्रायोगिक तत्वावर लोकप्रतिनिधी, प्रशासनातील अधिकारी/कर्मचाऱ्यांची प्रभाग समिती गठित करावी. समिती गठित करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी काढावेत. प्रभाग समिती स्थापनेची उद्दिष्टे, रचना व कार्ये खालीलप्रमाणे राहतील.

**प्रभाग समितीची उद्दिष्ट्ये :** (१) प्रत्यक्ष नियोजनामध्ये लोकप्रतिनिधींचा सहभाग वाढविणे (२) ग्रामपातळीवरील नाविन्यपूर्ण योजनेचे प्रस्ताव तालुकास्तरावर पाठविणे. (३) गावपातळीवरील अडी-अडचणी ग्रामस्तरावरच सोडविणे. (४) लोकप्रतिनिधींशी अधिकाऱ्यांनी समन्वय साधणे. (५) उद्दिष्ट्यपूर्तीसाठी मार्गदर्शक सूचनांप्रमाणे नियोजन करणे. (६) नियमित सभा घेऊन प्रभाग पातळीवरील अडचणी सोडविणे. (७) प्रशासनात पारदर्शकता व गतिमानता आणणे. (८) सुलभ नियंत्रण या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी प्रभाग समितीची स्थापना केली जाते.

(५) **ग्रामसभा व ग्रामपंचायत :** ग्रामपंचायतीचा वार्षिक कृती आराखडा ग्रामसभा मंजूर करते. यानंतर तो ग्रामपचांयत आणि पंचायत समितीमार्फत ग्रामीण विकास यंत्रणेकडे मंजूरीसाठी पाठविला जातो. मंजुरी मिळाल्यानंतर ग्रामपंचायतीद्वारे कार्यक्रमाची अंमलबजावणी केली जाते. यात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत कामांचा प्रारंभ गावामध्यें केला जातो.



ग्रामस्थांच्या गरजा विचारात घेऊन मूलभूत सुविधांची निर्मिती करणे आणि ग्रामीण बेरोजगारांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे हा या योजनेचा उद्देश आहे. गावातील मागासवर्गीयांच्या स्वयंरोजगारासाठी दुकान वा गाळे यांचे तसेच गोठ्याचे बांधकाम करणे, सिंचनासाठी विहिर वा विंधणविहिर तयार करणे ही कामे केली जातात. गावामध्ये सार्वजनिक मालमत्ता तयार होईल अशी कामे हाती घेतली जातात. अनुसूचित जाती व जमातीच्या वस्त्यांना मूलभूत सुविधा पुरविणे स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेला सहाय्यभूत ठरणाऱ्या मूलभूत सुविधा निर्माण करणे अशा कामांचा यामध्ये समावेश होतो. या ग्रामीण विकास कार्यक्रमासाठीच्या खर्चात केंद्राचा वाटा ७५ टक्के तर राज्याचा वाटा २५ टक्के आहे.

**काही महत्त्वाच्या ग्रामीण विकास योजना अथवा कार्यक्रम :**

लोकसहभागाला प्राधान्य देऊन ग्रामीण विकासाचे अनेक कार्यक्रम शासनाने सुरू केलेले आहेत. त्यापैकी काही महत्त्वाचे कार्यक्रम पुढीलप्रमाणे.

(१) **स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना :** ग्रामीण भागातील जनतेचे दारिद्र्य दूर करण्यासाठी एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, ट्रायसेम, ग्रामीण कारागीरांसाठी सुधारित हत्यारसंच पुरविण्याची योजना यासारखे अनेक कार्यक्रम शासनाने राबविले. परंतु त्यात समन्वय न राहिल्यामुळे या योजना फारशा यशस्वी ठरल्या नाहीत. परिणामी शासनाने १ एप्रिल १९९९ पासून ग्रामीण भागातील दारिद्र्य निर्मूलनासाठी स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना सुरू केली. आता एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, ट्रायसेम आदी योजना स्वर्ण जयंती ग्राम योजनेत समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

या योजनेनुसार आगामी पाच वर्षात दारिद्र्य रेषेखालील एकूण कुटुंबापैकी ३० टक्के कुटुंबांना दारिद्र्य रेषेच्या वर आणण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. या योजनेत स्वयवसायांच्या समूहांवर भर देण्यात आला आहे. प्रत्येक तालुक्याने काही निवडक व्यवसायावर लक्ष केंद्रीत करावे. व्यवसायांची निवड करताना स्थानिक साधनसामुग्री, कच्च्या मालाची उपलब्धता, स्थानिक लोकांचे कौशल्य, बाजारपेठ इत्यादी घटकांचा विचार करावा. कायम स्वरूपाचे उत्पन्न मिळू शकेल असा व्यवसाय निवडावा. वर उल्लेखित सर्व घटकांचा विचार करून आणि सर्व संस्थांशी विचारविनिमय करून तालुका स्तरावरची स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार समिती तालुक्यासाठी ८ ते १० व्यवसायांची निवड करेल. सदर यादी पंचायत समितीच्या शिफारशींसह अंतिम निर्णयासाठी जिल्हा स्वर्ण जयंती ग्रामीण स्वरोजगार समितीकडे पाठविली जाईल. आलेल्या प्रस्तावांची छाननी करून जिल्हा समिती प्रत्येक तालुक्यासाठी ४ ते ५ व्यवसायांची निवड करेल. निवड केलेल्या प्रत्येक व्यवसायाचा प्रकल्प अहवाल तयार करणे आवश्यक आहे.

स्वरोजगारींचे स्वयं सहाय्यता गट आणि वैयक्तिक स्वरोजगारी गट अशा दोन गटांमध्ये विभाजन करण्यात येईल. प्रत्येक तालुक्यातील किमान ५० टक्के गट केवळ महिलांचे असतील. प्रत्येक गटाने नियमित सभा घेणे आवश्यक आहे. हजेरीपत्रक, कार्यवृत्तांत पुस्तक, कर्ज नोंदवही,

सामान्य लेजर बँक पासबुक हे सर्व रेकॉर्ड ठेवणे आवश्यक आहे. अशा गटांना बँकेमार्फत २५ हजार रुपये खेळते भांडवल म्हणून दिले जाईल. या योजने अंतर्गत अनुसूचित जाती व जमातींना स्वरोजगारी प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त दहा हजार रुपये अनुदान दिले जाईल. इतर स्वरोजगाराना प्रकल्प खर्चाच्या ३० टक्के किंवा जास्तीत जास्त ७५०० रुपये अनुदान दिले जाईल. सदर योजने अंतर्गत स्वरोजगारीला कर्ज मंजूर झाल्यानंतर कर्ज वाटपाच्या अगोदर तालुक्याच्या मुख्यालयी व्यवसायासाठी आवश्यक असणारे मूलभूत तसेच कौशल्यवाढ प्रशिक्षण दिले जाते. तालुका आणि जिल्हा स्तरावरच्या स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार समित्यांमार्फत या योजनेच्या प्रगतीचा आढावा घेतला जातो.

**(२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा – २००५ (Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee Act 2005) मनरेगा MGNREGA :** महाराष्ट्रात ग्रामीण रोजगार हमी योजना सुरू होती. या योजनेमुळे प्रामुख्याने ग्रामीण भागातील हंगामी बेरोजगारीच्या समस्येची तीव्रता बऱ्याच प्रमाणात कमी झाली. तसेच ग्रामीण भागात दारिद्र्याचे काही प्रमाणात निर्मूलन करण्यामध्ये हा योजनेचा वाटा होता. या योजनेचे महाराष्ट्रात राज्यातील दृश्य सकारात्मक परिणाम लक्षात घेऊन केंद्र शासनाने ही योजना संपूर्ण देशात राबविण्यासाठी २००५ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा मंजूर करून अंमलात आणला.

ही योजना फक्त ग्रामीण भागासाठीच आहे. या योजनेद्वारे अथवा या कार्यक्रमातून ग्रामीण कुटुंबातील एका सदस्याला एक वर्षातून किमान १०० दिवसांसाठी रोजगार दिला जातो. विकास कार्यक्रमाची मागणी असणारी (demand-based) ही ग्रामीण विकासाची योजना आहे. ग्रामसभा ठराव मंजूर करून रोजगार हमी कार्यक्रम सुरू करण्याची मागणी करते.

गावामधील बेरोजगार व्यक्तींना अथवा रोजगार मिळविण्याची इच्छा असणाऱ्या व्यक्तींना त्या त्या गावामधील ग्रामपंचायतीच्या कार्यालयात नोंदणी करावी लागते. यानंतर त्याला रोजगार पुस्तिका (कार्ड) दिले जाते. या योजनेअंतर्गत कोणती कामे करावयाची याचे नियोजन व त्याची अंमलबजावणी करण्याचे अधिकार पंचायतराज संस्थांनाच आहे. या योजनेअंतर्गत ५० टक्के कामांची अंमलबजावणी ग्रामपंचायतीद्वारेच केली जाते. रोजगार पुस्तिकेमुळे पाच वर्षामध्ये ग्रामीण व्यक्तीला दरवर्षी किती दिवस रोजगार मिळाला याची व्यवस्थित नोंद राहते. रोजगार प्राप्तीसाठी अर्ज केल्यापासून १५ दिवसांच्या आत रोजगार पुरविण्याची तरतूद या कायद्यात करण्यात आली आहे. काही कारणाने १५ दिवसांच्या मुदतीनंतरही रोजगार देता आला नाही तर अशा व्यक्तीला बेरोजगारी भत्ता मिळावा अशी तरतूद या कायद्यात करण्यात आली आहे. किमान मजुरी निर्धारणामुळे जीवन जगण्याची हमी गरीबांना मिळाली आहे.

या योजनेसाठी केंद्र सरकार ७५ टक्के आणि राज्यसरकार २५ टक्के आर्थिक भार उचलते. गट विकास अधिकारी अथवा त्यांच्या दर्जाचा अन्य अधिकारी हा रोजगार हमी कार्यक्रमाची अंमलबजावणी करणारा प्रमुख कार्यक्रम अधिकारी असतो. कार्यक्रम अधिकारी आणि ग्रामपंचायत या दोहोंवर ग्रामीण व्यक्तींना रोजगार देण्याची जबाबदारी आहे. गावाच्या पाच



मैलांच्या परिसरात हा कार्यक्रम राबविण्याचे बंधन आहे. कामाच्या ठिकाणी स्वच्छ पिण्याचे पाणी, प्राथमिक स्वरूपाचे औषधोपचार आदी सुविधा उपलब्ध करून देण्याचे बंधन आहे. या योजने अंतर्गत ग्रामीण व्यक्तीला गामीण भागातील कामासाठीचे शासनाने निर्धारित केलेले किमान वेतन दिले जाते. या योजनेमुळे ग्रामीण भागातील हंगामी बेरोजगारीच्या प्रश्नाची तीव्रता कमी झाली आणि ग्रामीण विकासाला चालना मिळाली हे सर्वांनाच मान्य करावे लागते.

२०१२ मध्ये शंकरपूर गावाने युनिसेफचा आदर्श गावाचा पुरस्कार पटकावला आहे. गडचिरोली जिल्ह्यामधील शंकरपूर या गावाने मनरेगा योजना राबवून ते गाव पाच वर्षांत आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण झाले आहे. मनरेगा योजनेतून शंकरपूर व डोंगरमाया या जोडगावांनी आतापर्यंत एक कोटी रुपयाची कामे केली आहेत. मनेरगाच्या माध्यमातून १०० दिवसांपेक्षा जास्त रोजगार देणारे ते देशामधील एकमेव गाव होते.

**(३) इंदिरा आवास योजना :** ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना हक्काचा निवारा मिळावा यासाठी केंद्र सरकारने सुरू केलेली योजना म्हणजे इंदिरा आवास योजना होय. प्रारंभी जवाहर रोजगार योजनेची उपयोजना म्हणून ती राबविण्यात आली. १ जाने. १९९६ पासून ही योजना स्वतंत्रपणे राबविण्यात येत आहे. या योजनेत ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना घरकूल बांधून देण्यात येते. गरीब कुटुंबांना त्यांच्या हक्काचे घर मिळावे यासाठी सुरू करण्यात आलेल्या या योजनेत प्रत्येक कुटुंबाला ७० हजार रुपयांचे घर बांधून दिले जाते. जिल्ह्यासाठी देण्यात आलेल्या घरांच्या कोट्यामध्ये सर्वाधिक गरजू कुटुंबाला घरकूल बांधून देण्यासाठी प्राधान्य दिले जाते.

यां योजनेच्या अंमलबजावणीसाठी दारिद्र्यरेषेखालील कुटुंबीयांचे सर्वेक्षण करून एक यादी तयार करण्यात येते. या योजनेतंर्गत सशस्त्र दलातील लढाईमध्ये मारल्या गेलेल्या सैनिकांचे कुटुंब व विधवा यांना उत्पन्नाची अट शिथिल करून घरकूलाचा लाभ देण्यात येतो. तसेच दारिद्र्य रेषेखालील विकलांग वा अपंग व्यक्तींसाठी तीन टक्के आरक्षण ठेवण्यात आले आहे.

ही वैयक्तिक लाभाची योजना आहे. या योजनेत प्रत्येक जिल्ह्यासाठी घरांचा एक कोटा निश्चित केला जातो. त्या कोट्यानुसार प्रत्येक गावातील गरजु कुटुंबाला घर बांधून देण्यासाठी प्राधान्य दिले जाते. गावात दोन–चार घरे तयार झाली तर दृश्य परिणाम दिसून येत नाही. असे कारण पुढे करून सरकारने लाभधारकांची सर्वात छोटी यादी ज्या गावाची आहे अशा गावामधील सर्व कुटुंबांना घरे बांधून देण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेचा ८० टक्के आर्थिक भार केंद्र सरकार उचलते तर उर्वरित २० टक्के खर्च राज्यसरकारद्वारे केला जातो.

२०१३–१४ या वर्षात महाराष्ट्र राज्याने १ लाख ९० हजार ९५० घरकुलांच्या बांधणीचे उद्दिष्ट समोर ठेवले. पुणे जिल्ह्यात लाभार्थींची संख्या बरीच कमी असल्याने अतिरिक्त ठरलेली घरकूले ही सहा जिल्ह्यांमध्ये विभागून देण्यात आली. त्याचा लाभ विदर्भातील गोंदिया आणि यवतमाळ जिल्ह्यांना मिळाला असून गोंदिया जिल्ह्यात २ हजार ४३४ तर यवतमाळ जिल्ह्यात ५०० घरकुले अतिरिक्त मिळाली आहेत. या योजनेत ग्रामसभेने ठरवलेल्या गुणानुक्रमे प्रतीक्षा

Scanned with OKEN Scanner

यादीनुसार लाभार्थींची निवड केली जाते. नंतर लाभार्थींना घरकूल बांधण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला जातो.

या योजनेत लाभार्थींचा सहभाग अनिवार्य आहे. लाभार्थींला बांधकामाचे साहित्य विकत घेण्यापासून ते कुशल मजुराकडून आणि कुटुंबातील सदस्यांच्या मदतीने घराचे बांधकाम करावे लागते. या योजनेमध्ये कच्च्या घराचे पक्क्या घरात रूपांतर करण्यासाठी अर्थसहाय्य दिले जाते. परंतु अशा लाभार्थींची संख्या अत्यल्प असते. या योजनेत घरकुलासाठीचे उद्दिष्ट ठरवण्यापासून ते आर्थिक नियोजनापर्यंत सर्व कामे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेची आहे.

## ग्रामीण विकासात पंचायतराज संस्थांची भूमिका

ग्रामीण विकास कार्यक्रम विभिन्न प्रकारचे आहेत. प्रत्येक कार्यक्रमाचे लाभार्थी कोण हे ठरविण्यासाठीचे निकषही (मापदंड) वेगवेगळे आहेत. उदा. तुषार सिंचन अथवा ट्रॅक्टर खरेदीसाठी काही अनुदान कोणत्या शेतकऱ्यांना मिळू शकेल याचे निकष आणि कोणाला इंदिरा आवास योजनेअंतर्गत घरकूल बांधून मिळेल याचे निकष वेगवेगळे असे स्वाभाविक ठरते. कोणत्याही विकास कार्यक्रमाचे लाभार्थी कोण असावेत? यासाठीचे निकष तो विकास कार्यक्रम तयार करणारे तज्ज्ञ ठरवितात किंवा निश्चित करतात. त्या निकषांच्या आधारे लाभार्थी कोण? म्हणजे प्रत्यक्षात लाभार्थ्यांच्या नावाची यादी तयार करण्याचे अधिकार पंचायतराज संस्थांना आहेत. दारिद्र्य रेषेखालील लोकांच्या यादीमध्ये कोणाचा समावेश असावा हे निश्चित करण्याचा अधिकार ग्रामसभा आणि पंचायत समितीला प्राप्त झालेला आहे. ग्रामीण विकासाच्या बहुतांश वा विभिन्न कार्यक्रमांची अंमलबजावणी ही पंचायतराज संस्थांमार्फतच होते. म्हणून ग्रामीण विकास कार्यक्रमात पंचायतराज संस्थांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे असे म्हणता येते.

### ग्रामीण विकास कार्यक्रमाचे टीकात्मक परीक्षण :

१९५० च्या दशकाच्या तुलनेत आज ग्रामीण क्षेत्रात विविध प्रकारचे सकारात्मक बदल घडून आले आहेत हे सर्वप्रथम मान्य करावे लागते. उदा. ग्रामीण भागात निरक्षरतेच्या प्रमाणात बरीच घट झालेली आहे. तसेच प्रसुती काळातील मृत्यू व बालमृत्यू यांचे प्रमाणही घटले आहे. सरासरी आयुर्मान वाढले आहे. शालेय शिक्षणापासून महाविद्यालयीन शिक्षणापर्यंतच्या सोयी ग्रामीण भागात उपलब्ध झाल्या आहेत. हे सर्व ग्रामीण विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचे सकारात्मक स्वरूपाचे दृश्य परिणाम आहेत.

ग्रामीण विकासाच्या विभिन्न योजनांवर केंद्रशासन आणि राज्यशासनाद्वारे करोडो रुपये खर्च केले जातात. प्रत्येक गावात या योजना राबविण्यासंबंधीचे काही विशिष्ट नियम वा अटी असतात. त्या अटींची पूर्तता केल्याशिवाय गावामध्ये विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे शक्य नसते. या अटींची पूर्तता करणे व तो विकास कार्यक्रम कार्यक्षमतेने आणि प्रामाणिकपणे अंमलात आणणे ही गावामधील नेत्यांची म्हणजे प्रामुख्याने पंचायतराज संस्थांमधील राजकीय पदाधिकाऱ्यांची कसोटी असते. काही पंचायतराज संस्थांमधील युवक, महिला आणि



मागासवर्गीय गटातील राजकीय पदाधिकाऱ्यांनी ग्रामीण विकासाच्या योजनांची आपआपल्या गावात प्रामाणिकपणे अंमलबजावणी करून गावाचा कायापालट घडवून आणल्याची उदाहरणे आहेत. ती अधूनमधून वृत्तपत्रातून अथवा अन्य प्रसारमाध्यमातून प्रसिद्ध होत असतात. अर्थात गावाचा कायापालट शासकीय विकास कार्यक्रमातून घडवून आणल्याची उदाहरणे फार तुरळक म्हणजे फार कमी आहेत हे देखील मान्य करावे लागते.

सरकारने ग्रामीण जनतेच्या कल्याणासाठी आणि ग्रामीण क्षेत्राच्या विकासासाठी निर्माण केलेल्या विविध योजना जनतेपर्यंत पोहचविणे ही पंचायतराज संस्थांची जबाबदारी आहे. परंतु या योजना खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहचत नाही. जात, पक्ष, नातेगोते यासारखे घटक खरे लाभार्थी निश्चित होण्याच्या मार्गात अडसर म्हणून उभे राहतात. लोकप्रतिनिधींची उदासिनता, लालफितीचा कारभार, ग्रामीण जनतेचे अज्ञान यासारख्या कारणांमुळे ग्रामीण विकास योजनांचे खरे लाभार्थी त्यापासून वंचित राहतात. ग्रामीण विकासाबाबत शासनाची उद्दिष्टे साध्य होत नाही. थोडक्यात ग्रामीण विकासाची प्रक्रिया सुरू झालेली आहे. तिचे काही दृश्य स्वरूपाचे सकारात्मक परिणामही दिसत आहेत. तरीही ग्रामीण विकासाची प्रक्रिया गतिमान झालेली नाही. रखडत-रखडत ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेची वाटचाल सुरू आहे असे म्हणता येईल.

## अभ्यासार्थ प्रश्न

**दीर्घोत्तरी प्रश्न :**

(१) ग्रामसभेची कार्ये व महत्त्व यांचे वर्णन करा.
(२) जिल्हा परिषदेची रचना स्पष्ट करून कार्ये लिहा.
(३) पंचायत समितीची रचना स्पष्ट करून कार्ये लिहा.
(४) ग्रामपंचायतीची रचना स्पष्ट करून कार्ये लिहा.
(५) ग्रामीण विकासात पंचायतराज संस्थांची भूमिका विशद करा.

**लघुत्तरी प्रश्न :**

(१) ग्रामपंचायतीच्या सभा
(२) जिल्हा परिषदेच्या सभा
(३) जिल्हा परिषद अध्यक्षाचे अधिकार व कार्ये
(४) जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची कार्ये व अधिकार
(५) गटविकास अधिकाऱ्याची कार्ये व अधिकार
(६) ग्राम सचिवाची कार्ये व अधिकार
(७) सरपंचाची कार्ये व अधिकार
(८) जिल्हा परिषदेतील आरक्षण
(९) ग्रामसभेची पूर्वतयारी
(१०) पंचायत समितीच्या सभापतीचे अधिकार व कार्ये
(११) जिल्हा परिषद निवडणूक पद्धती

Scanned with OKEN Scanner

संक्षिप्त प्रश्न :

(१) पंचायतराज योजनेत ग्रामपंचायतीचे स्थान व महत्त्व
(२) ग्रामपंचायत सदस्यत्वासाठी पात्रता व अटी
(३) पंचायत समितीच्या सभा
(४) पंचायतराज योजनेत ग्रामसभेचे स्थान व महत्त्व
(५) पंचायतराज योजनेत जिल्हा परिषदेचे स्थान व महत्त्व
(६) सरपंच व उपसरपंचावरील अविश्वासाचा ठराव
(७) जिल्हा परिषद अध्यक्षावरील अविश्वासाचा ठराव
(८) ग्रामीण विकासाचा अर्थ
(९) जिल्हा परिषदेतील स्थायी समिती
(१०) जिल्हा परिषदेतील महिला व बालकल्याण समिती

# ३.
# नागरी स्थानिक स्वशासन
## (Urban Local Self Government)

***प्रास्ताविक :*** *भारतातील नागरी स्थानिक स्वशासन संस्थांची ऐतिहासिक पार्श्वभूमी, नगरांची निर्मिती आणि नागरीकरणाची प्रक्रिया. स्वातंत्र्योत्तर काळात नागरी स्थानिक स्वशासनाची स्थिती.*

*(१)* ***नगर पंचायत :*** *स्थापना, स्थापनेसाठीचे निकष, रचना, सदस्य संख्या, सदस्यांचे प्रकार, आरक्षण व्यवस्था, सदस्यत्वासाठीच्या पात्रता, कार्यकाल, पदाधिकारी, नगर पंचायत व्यवस्थेतील अधिकारी व नोकरवर्ग, नगर पंचायतच्या उत्पन्नाची साधने, नगरपंचायतीची कार्ये.*

*(२)* ***नगर परिषद :*** *स्थापना, स्थापना करण्यासंबंधीचे निकष, महाराष्ट्र राज्यात नगर परिषदेचे वर्गीकरण, नगरपरिषदेची रचना, सदस्यसंख्या, सदस्यांचे प्रकार, सदस्यांसाठीची आरक्षण व्यवस्था, निवडणूक पद्धती, सदस्यत्वासाठीच्या पात्रता, कार्यकाल, नगर परिषदेची व सदस्यांची बरखास्ती, सभा, पदाधिकारी, अध्यक्ष, निवड, आरक्षण, अध्यक्षावर अविश्वासाचा ठराव, राजीनामा आणि त्यांची बडतर्फी, नगराध्यक्षाची कार्ये, उपाध्यक्ष व त्याची कार्ये, नगर परिषदेचा मुख्य अधिकारी व त्याची कार्ये, समिती व्यवस्था, नगर परिषदेची कार्ये, नगर परिषदेवरील नियंत्रण.*

*(३)* ***महानगरपालिका :*** *स्थापना, स्थापना करण्यासंबंधीचे निकष, रचना, एकूण सभासद संख्या, सभासदाचे प्रकार, सभासदांसाठीची आरक्षण व्यवस्था, निवडणूक पद्धती, सभासदासाठी पात्रता, कार्यकाल, महानगरपालिकेची बरखास्ती व सदस्यांची बरखास्ती, महापौर व उपमहापौर, मनपा आयुक्त, महानगरपालिकेची समिती व्यवस्था, महानगरपालिकेची कार्ये व अधिकार*

*(४)* ***छावणी मंडळ (Cantonment Board) :*** *प्रास्ताविक, छावणी मंडळाची स्थापना, वैशिष्ट्ये, रचना, कार्यकाल, छावणी मंडळीची कार्ये.*

***नागरी विकासात नागरी स्थानिक स्वशासनाची भूमिका :*** *नागरी विकासाचा अर्थ, नगर नियोजनाचे स्वरूप, नागरी विकासाचे प्रश्न, नागरी विकास कार्यक्रम, नागरी विकास कार्यक्रमात नागरी स्थानिक स्वशासन संस्थांची भूमिका, नागरी विकास कार्यक्रमाचे टीकात्मक परिक्षण*

*अभ्यासार्थ प्रश्न.*